सोलापूर तरुण भारत
आसमंत



# अमेरिकेला शिंक आणि जगाला सर्दी

**अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्षपदी विराजमान झाल्यापासूनच जगभरात त्याचे गंभीर पडसाद उमटू लागले. मागील काही दिवस भारतीय शेअर बाजारांतून परकीय गुंतवणूकदारांनी हात आखडते घेतल्याने पडझड दिसून आली, तर सोमवारी मंदीच्या सावटाखाली अमेरिकी शेअर बाजारही कोसळला आणि गुंतवणूकदारांचे तब्बल चार लाख कोटी बुडाले. त्यानिमित्ताने ट्रम्प यांच्या टोकाच्या, बदलत्या भूमिकांचे परिणाम आणि जागतिक स्थैर्याची गरज अधोरेखित करणारा हा लेख...**

**लक्ष्यवेध**

**अनय जोगळेकर**

अमेरिकेत आर्थिक मंदी येऊ शकते का? तर या प्रश्नावर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, 'नाही' असे ठामपणे उत्तर न दिल्याने तेथील शेअर बाजारांमध्ये प्रचंड घसरण झाली. दि. १० मार्च रोजी अमेरिकेतील गुंतवणूकदारांचे सुमारे चार लाख कोटी डॉलर्स धुपले. एलॉन मस्क यांच्या 'टेस्ला' या कंपनीचा समभाग एका दिवसात १५ टक्के पडला. हा समभाग डिसेंबर २०२४ साली ४८८ डॉलर्सच्या वर गेला होता. अवघ्या तीन महिन्यांमध्ये तो २२२ डॉलर्सच्या आसपास आला आहे. अशीच परिस्थिती अमेरिकेतील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या समभागांबाबत झाली आहे. यामुळे ट्रम्प यांना ज्या वर्गाने मतदान केले तो चिंतित आहे.

शेअर बाजारातील संपत्तीची सकल राष्ट्रीय उत्पादनाशी तुलना होऊ शकत नसली, तरी हा आकडा भारताच्या अर्थव्यवस्थेच्या आकाराएवढा आहे. अमेरिकेतील शेअर बाजारांमध्ये जागतिक शेअर बाजारांच्या सुमारे ५५ टक्के पैसा असून, त्यातील घसरणीचे संपूर्ण जगावर परिणाम होणार आहेत. ट्रम्प यांना त्यांच्या व्यापार धोरणाबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. आम्ही अमेरिकेत संपत्ती परत आणत आहोत. ही स्थित्यंतराची अवस्था आहे, असे त्यांनी सांगितले. ट्रम्प अध्यक्ष झाल्यावर आयातीवर कर वाढवतील याची कल्पना सगळ्यांनाच असली, तरी त्यांच्या धरसोड वृत्तीमुळे गुंतवणूकदारांच्या मनात गोंधळ निर्माण झाला आहे. मेक्सिको आणि कॅनडाविरुद्ध दोन वेळा सुमारे २५ टक्के आयात शुल्क लावल्यानंतर ते मागे घेण्यात आले. अन्य देशांविरोधातही एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासून ते जेवढे आयात शुल्क लावतात, तेवढेच आयात शुल्क लावणार असल्याचे ट्रम्प यांनी घोषित केले. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प जाणीवपूर्वक धोरणामध्ये अनिश्चितता ठेवत आहेत. त्यामुळे आयात शुल्क न वाढवता, शेजारी देशांत उत्पादन करून अमेरिकेला निर्यात करणाऱ्या कंपन्यांना गाशा गुंडाळायला लावून अमेरिकेत आणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अमेरिकेत जो बायडन अध्यक्ष असताना महागाईचा आगडोंब उसळला होता. 'कोविड-१९' काळात चीनच्या पुरवठा साखळ्या तुटल्या. बायडन सरकारच्या स्वच्छ ऊर्जेच्या अट्टाहासामुळे खनिज तेल आणि नैसर्गिक वायू क्षेत्रातील गुंतवणूक कमी झाली.

युक्रेन युद्धामुळे रशियावर लादलेले निर्बंध आणि आखातातील अमेरिकेच्या मित्रदेशांनी तेलाचे कमी केलेले उत्पादन, याला बायडन सरकारने लोकानुनयाची जोड दिल्यामुळे महागाई नियंत्रणाबाहेर वाढली. २०२४ साली निवडणुकांचे वर्ष अमेरिकेच्या सरकारने प्रयत्न करून महागाई दर तात्पुरता आटोक्यात आणला, तरी लोकांच्या मनातून त्याबद्दलचा रोष कमी झाला नाही. युरोपातील अनेक देश मंदीच्या तडाख्यात सापडले असताना, अमेरिका मात्र यातून सहीसलामत बाहेर येईल, असा अंदाज होता. त्यामुळेच अमेरिकेतील शेअर बाजारांनी विक्रमी उंची गाठली होती. ट्रम्प निवडून आल्यावर अमेरिकेतील कॉर्पोरेट विश्वाने त्यांच्या सुरात सूर मिसळून बोलायला सुरुवात केल्यामुळे गुंतवणूकदारांच्या अपेक्षादेखील मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या. जानेवारीमध्ये अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर, ट्रम्प यांनी एकापाठोपाठ एक मोठे निर्णय घ्यायला सुरुवात केली, तेव्हाही शेअर बाजारांनी आपला विश्वास गमावला नव्हता. पण, ट्रम्प यांच्या दुसऱ्या टर्मला दोन महिने पूर्ण होत असताना, त्यांच्या तोंडून मंदीबाबत आश्वस्त न करणारे वक्तव्य न आल्याने, अमेरिकेचे शेअर बाजार कोसळू लागले आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयांमागे तर्कसंगती आणि अमेरिकेच्या हिताचा विचार असला, तरी त्याचे जागतिक परिणाम ओळखणे अवघड झाले आहे. कॅनडामध्ये जस्टिन ट्रुडो यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला, तेव्हा ते आपल्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा तब्बल २४ टक्के मतांनी मागे होते. पण, ट्रम्प यांनी सातत्याने कॅनडाचा उल्लेख 'अमेरिकेचे ५१वे राज्य' असा करायला सुरुवात केल्यानंतर, ट्रुडो यांनी त्याबाबत ठाम भूमिका घेतली आणि त्यांच्या पक्षापाठी तेथील जनता एकवटायला लागली. नुकतीच ट्रुडो यांच्या जागी 'बँक ऑफ कॅनडा'चे माजी गव्हर्नर मार्क कार्नी यांनी शपथ घेतली. कॅनडामध्ये दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी पूर्वी निवडणुका होणे अपेक्षित आहे. आजच्या तारखेला डाव्या लेबर आणि उजव्या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षामधील अंतर मोठ्या प्रमाणावर कमी झाले असून काही अंदाजांनुसार, परिस्थिती अशीच राहिली तर लिबरल पक्ष विजयी होऊ शकतो. तीच गोष्ट मेक्सिकोच्या बाबतीतही घडताना दिसत आहे. सुरुवातीला ट्रम्प यांच्याशी जुळवण्याचा प्रयत्न केल्यानंतर मेक्सिकोच्या अध्यक्ष क्लॉडिया शेनबम यांनी सुमारे साडे तीन लाख लोकांची सभा घेऊन डोनाल्ड ट्रम्प यांना, आपण आपल्या देशाचे सार्वभौमत्व गहाण टाकलेले नाही, असे सुनावले. चीनने एवढ्यावरच न थांबता, अमेरिकेतून आयात केल्या जाणार्या सोया, चिकन आणि मका इत्यादी कृषी उत्पादनांवर आयात शुल्क लावले.

अमेरिकेतील जी राज्ये कृषिमालाची निर्यात करतात, तेथे मुख्यतः रिपब्लिकन पक्षाची सत्ता असल्यामुळे चीनने थेट ट्रम्प (पान ४ वर)

**कै. आप्पांच्या, कै. अण्णांच्या मानसकन्या.. ज्ञान प्रबोधिनीच्या पूर्ण वेळ कार्यकर्त्या , स्वरूपयोग परिवाराच्या ज्येष्ठ साधिका लेखिका, कवयित्री, संवादिका, जीवन-समुपदेशिका ही आणि अशी अनेक रूपे ज्यांच्यात एकवटली अशा लताताई.**



# वाचस्पती कै. स्वर्णलता भिशीकर

## चैतन्याची अद्भुत खाण!

**श्रद्धांजली**

**डॉ. अनघा लवळेकर**

ज्ञानाचा अभिजात वारसा, अध्यात्माचा स्वयंभू पिंड आणि जीवनाप्रति करुणेचा सहजभाव, ही त्रिपुटी असलेल्या दुर्मीळातील दुर्मीळ व्यक्तींपैकी एक म्हणजे वाचस्पती स्वर्णलता भिशीकर. सर्वांच्या आत्मीय 'लताताई' दि. ४ मार्च रोजीच्या रात्री हे लौकिक जग सोडून, अलौकिकाच्या प्रवासाला निघून गेल्या. परंतु, त्यांच्या समृद्ध चिंतनाचा, लेखनाचा, अध्यात्म साधनेचा, अर्थगर्भ काव्यलेखनाचा आणि प्रखर राष्ट्रसेवेचा आदर्श त्यांनी, आपल्या सर्वांसमोर उलगडून ठेवला आहे.

चंद्रशेखर परमानंद तथा बापूसाहेब भिशीकर या संघप्रेरित कार्यकर्त्याच्या घरात, १९५१ साली त्यांचा जन्म झाला. महाविद्यालयीन काळात ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पा पेंडसे यांच्या परीस-स्पर्शाने, लताताईंच्या मूळ कुशाग्र प्रज्ञेला राष्ट्रअर्चनेचे व्यापक उद्दिष्ट मिळाले. त्यानंतरचे संपूर्ण आयुष्य त्यांनी, ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून विविध प्रकारचे शैक्षणिक, सामाजिक व आध्यात्मिक कार्य करण्यात व्यतीत केले.

महाविद्यालयीन काळामध्ये ज्ञानप्रबोधिनीच्या युवती विभागाच्या उभारणीत, त्यांचा मोलाचा सहभाग होताच; परंतु एकीकडे 'विद्यावाचस्पती पदवी'साठीचे संशोधन करताना, ज्ञानप्रबोधिनीच्या कन्यका प्रशालेच्या पायाभरणीची जबाबदारीही त्यांनी पेलली. त्याचवेळी कै. आप्पांच्या स्वीय साहाय्यकाच्या भूमिकेतून, त्यांच्या संपर्काचा प्रचंड विस्तार लताताईंनी संपूर्ण समर्पित वृत्तीने केला आणि जोपासलाही! कै. आप्पांच्या निधनानंतर ज्ञान प्रबोधिनीचे द्वितीय संचालक कै.व.सी. तथा अण्णा ताम्हनकर यांच्याही कामात, त्या बरोबरीने उभ्या राहिल्या. १९९० साली ज्ञान प्रबोधिनीने सोलापूर येथे, कै. अवंतिकाबाई व कै. जनुभाऊ केळकर यांनी स्थापन केलेली 'बालविकास मंदिर' ही प्रस्थापित शाळा चालविण्याचा व वाढवण्याचा पत्कर घेतला, तेव्हा कै. अण्णा ताम्हनकर यांच्यासोबत लताताई आणि गायत्रीताई सेवक या सोलापुरात नुसत्या गेल्याच नाहीत, तर सोलापूरकरच झाल्या. लताताई तर गेल्या ३५ वर्षांत, त्यांच्या विविधांगी कार्यामुळे सोलापूरवासीयांच्या आदराची आणि विश्वासाची जागा बनल्या.

१९९३ सालचा किल्लारी भूकंप, हा एका मोठ्या सामाजिक शैक्षणिक उलथापालथीचा कारण बनला. त्यावेळी हराळीसारख्या छोट्या गावात प्राथमिक शिक्षणाच्या वर्गापासून, सुरुवात करून आज शेकडो विद्यार्थ्यांना सामावून घेणारी निवासी शाळा प्रकल्प संकुल उभारण्यामध्ये, अण्णा आणि लताताईंचे अथक परिश्रम शिंपले गेले आहेत.

लताताईंचे सामाजिक काम केवळ शिक्षणाला पुढावा देणे एवढेच मर्यादित राहिले नाही, तर अक्षरशः 'जे का रंजले गांजले-त्यांसी म्हणावे आपुले' या उक्तीनुसार, त्यांनी शेकडो जणांच्या व्यथांवर हळूवार फुंकर घालत, सहज अशा संवादातून त्यांना आयुष्याची उभारी पुन्हा दिली. 'वज्रादपी कठोराणि-मृदुनि कुसुमादपि' असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. अत्यंत रसाळ आणि प्रेरक लेखन, ही तर त्यांची एक खास अशी ओळख आहे. त्यांची ग्रंथसंपदा अत्यंत आशयसमृद्ध आणि अक्षर वाङ्मय ठरावे अशी आहे. कविता हा तर त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. 'देवचाफे' हा त्यांचा वयाच्या विशीत लिहिलेला कवितासंग्रह. त्याला लाभलेले कुसुमाग्रजांसारख्या ऋषी-कवीचे, आशीर्वादपर प्रास्ताविक आणि राज्य सरकार पुरस्कारही मिळावा, ही त्यांच्या स्वयंभू प्रतिभेला मिळालेली महत्त्वाची पावतीच आहे. (पान ४ वर)

**नोंद**

**प्रतिनिधी**

**'विकसित महाराष्ट्रा'कडे वाटचाल करण्याच्या दिशेने राज्याने मोठे पाऊल उचलले आहे, असे महायुती सरकारच्या पहिल्या पूर्ण अर्थसंकल्पातील तरतुदींकडे पाहिल्यास म्हणता येईल. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी यात विशेषत्वाने काळजी घेतली गेली आहे. अर्थसंकल्पातील घोषणा आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम करणाऱ्या ठरतात. या दृष्टीने विचार केला, तर महाराष्ट्रातील महायुती सरकारने जाहीर केलेला अर्थसंकल्प हा 'विकसित महाराष्ट्रा'कडे वाटचाल करण्याच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे, असेच म्हणावे लागेल. केवळ एका क्षेत्राचा विचार न करता, राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी यात ठोस तरतुदी केल्या आहेत.**

# समृद्धीचे अर्थसोपान



देशाची आर्थिक राजधानी म्हणून ज्या मुंबईचा लौकिक आहे, त्या मुंबईपासून ते गडचिरोलीसारख्या नक्षलवादाचा प्रभाव असलेल्या प्रदेशाचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठीही अर्थसंकल्पात विशेष तरतुदी केल्या गेल्या आहेत. राज्यातील जनतेने महायुतीला जे ऐतिहासिक, विक्रमी असे संख्याबळ दिले आहे, त्याचाच परिणाम म्हणून महायुती सरकारने ठोस निर्णय घेतलेले दिसून येतात.

पायाभूत सुविधांचा विकास झाला, तरच आर्थिक विकासाला चालना मिळते, हे गेल्या दहा वर्षांत केंद्र सरकारच्या धोरणांवरून स्पष्ट झाले आहे. म्हणूनच, केंद्र सरकारच्या धोरणांना देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने चालना दिल्याचे अर्थसंकल्पातून स्पष्ट होते. राज्यातील रस्ते तसेच, बंदर यांच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद म्हणूनच करण्यात आली आहे. राज्य सरकारने अर्थसंकल्पात विविध उपक्रमांद्वारे पायाभूत सुविधा, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यावर लक्ष केंद्रित केलेले दिसते. संपूर्ण राज्यात औद्योगिक तसेच लॉजिस्टिक पायाभूत सुविधांच्या विकासाचा समावेश असून, त्याद्वारे कनेक्टिव्हिटी सुधारणे आणि निर्यातीला प्रोत्साहन देणे, यावर प्रामुख्याने भर दिलेला दिसून येतो. तसेच, अक्षय ऊर्जा आणि किनारपट्टी व्यवस्थापनात गुंतवणूक करून, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाची वचनबद्धतादेखील यातून दिसून येते. गडचिरोलीसारख्या भागात आर्थिक विकासाला चालना देत तसेच, कापड आणि हातमाग यांसारख्या क्षेत्रांना बळ देत, संपूर्ण राज्यात समावेशक विकास सुनिश्चित करण्याचे काम केले गेले आहे. यातूनच, प्रादेशिक असंतुलन दूर करण्याचा सरकारचा हेतू स्पष्ट होतो.

अर्थसंकल्पात अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या गेल्या आहेत. त्यानुसार, पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच, रोजगार वाढीसाठी विशेष प्रयत्न केले गेलेले दिसून येतात. धोरणात्मक गुंतवणूक, पायाभूत सुविधा विकास आणि रोजगार निर्मितीद्वारे आर्थिक वाढीवर देण्यात आलेला भर हे याचे वैशिष्ट्य ठरावे. विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे, प्रादेशिक संतुलन वाढवणे तसेच, संपूर्ण राज्यात कनेक्टिव्हिटी सुधारणे, यावर विशेषत्वाने लक्ष केंद्रित केलेले दिसून येते. प्रमुख उपक्रमांमध्ये औद्योगिक कॉरिडॉरची स्थापना, लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांचा विकास करणे, सुधारित वाहतुकीद्वारे पर्यटनाला चालना देणे आणि विशेषतः महिलांसाठी कौशल्य विकासाला प्राधान्य देणे यांचा समावेश आहे. महाराष्ट्राला आघाडीचे जागतिक आर्थिक केंद्र बनवणे, हा त्यामागील उद्देश आहे. पर्यावरणीय प्रकल्प तसेच हरित ऊर्जेला प्रोत्साहन देत, शाश्वत विकासाची वचनबद्धतादेखील अर्थसंकल्पात प्रतिबिंबित होते.

महाराष्ट्रासाठीचे नवीन औद्योगिक धोरण हे अर्थसंकल्पाचे विशेष ठरावे. येत्या पाच वर्षांत, या धोरणाचे उद्दिष्ट ४० लाख कोटींची गुंतवणूक आकर्षित करणे, तसेच ५० लाख रोजगार निर्माण करणे हे आहे. या औद्योगिक धोरणासोबतच, सर्वच क्षेत्रांच्या शाश्वत विकासासाठी नवीन धोरणे आखली जात आहेत. महाराष्ट्र हा नेहमीच औद्योगिक विकासात आघाडीवर राहिला आहे आणि देशात, थेट विदेशी गुंतवणुकीच्या बाबतीतही त्याने पहिले स्थान राखले आहे. जानेवारी महिन्यात, मुख्यमंत्री फडणवीस यांनी विक्रमी गुंतवणूक राज्यात आणली आहे. तेच धोरण अर्थसंकल्पात पुढे नेण्यात आले आहे. त्यातूनच, येणाऱ्या कालावधीत राज्यात १५.७२ लाख कोटींची गुंतवणूक होईल, तसेच अंदाजे १.६ दशलक्ष इतके विक्रमी रोजगार निर्माण होतील, अशी अपेक्षा आहे.

राज्यात सर्वत्र सुविधांचा विकास करतानाच, त्यातून रोजगार निर्मितीलाही चालना देण्याकडे सरकारने लक्ष दिले आहे. तसेच, सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी, विशेषतः मेट्रोसाठी तरतूद करण्यात आली आहे. सरकारचा विकासावरील खर्च हा रस्ते, पूल, रेल्वे, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देतो. याचा आर्थिक वाढीवर सकारात्मक प्रभाव पडतो. यातून रोजगार निर्मिती होते आणि त्याचबरोबर स्पर्धात्मकता वाढते. अर्थसंकल्पातील आर्थिक दृष्टिकोन आणि ध्येय ही महत्त्वाची अशीच आहेत. (पान ४ वर)

राष्ट्रक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

# मराठी साहित्य आणि भारताची सुरक्षा

## चिनी हायब्रीड वॉर, ग्रे झोन वॉर, अनरिस्ट्रिक्टेड युद्धावर मराठी साहित्य जरूरी

नवी दिल्ली येथील ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेकरिता मला 'मराठी साहित्य आणि भारताची सुरक्षा' या विषयावर लेख लिहिण्यात सांगण्यात आला. दुसरा भाग खालील प्रमाणे होता.

**पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धावर फारसे लिखाण नाही**

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धामध्ये २५ ते ३५ लाख भारतीय सैनिकांनी भाग घेतला आणि त्यांनी युरोपच्या वेगवेगळ्या रणभूमीवर महापराक्रम गाजवले. या विषयावर फारसे लिखाण झालेले नाही. मात्र, भारतीय सैन्याच्या वेगवेगळ्या रेजिमेंट्स आपल्या इतिहासामध्ये या युद्धांचे वर्णन करतात. उदाहरणार्थ मराठा रेजिमेंटने दुसऱ्या युद्धात गाजवलेला महापराक्रम हा त्यांच्या रेजिमेंटल हिस्ट्रीमध्ये लिहिण्यात आलेला आहे. भारतीय उपखंडामध्ये स्वातंत्र्यापूर्वी हजार वर्षांमध्ये शेकडो युद्ध लढली गेली. अनेक परकीयांनी भारतावर आक्रमण केले. काही वेळा भारतीय जिंकले आणि अनेक वेळा हरले. या काळात वापरलेल्या भारतीय युद्ध पद्धतीचा किंवा परदेशी आक्रमण करणाऱ्या शत्रूंच्या युद्ध पद्धतीचा पुरेसा अभ्यास केला गेला नाही. आता भारतीय सैन्य भारतीय उपखंडामध्ये लढल्या गेलेल्या सगळ्या युद्धाचा अभ्यास करून, त्याचे विश्लेषण करून येणाऱ्या काळामध्ये या डावपेचांचा कसा वापर करता येईल, यावर विचार करीत आहे. खरे म्हटले तर हे या आधीच व्हायला पाहिजे होते. आता भारतीयांनी हरलेल्या किंवा जिंकलेला युद्धाचा अभ्यास केला जात आहे, हे महत्त्वाचे आहे. कारण प्रत्येक विजयातून किंवा पराभवातून आपल्याला काहीतरी शिकता येते. आता मौर्य, अशोक, पहलव, गुप्त, चालुक्य, होयसळ, पांड्य, चोला, मोगल आणि ब्रिटिश यांच्या युद्ध पद्धतीचा अभ्यास केला जात आहे. भारतीय लष्कर, त्यांच्या प्रकल्प उद्भव अंतर्गत भारताच्या समृद्ध लष्करी वारसा महाभारतातील लढाया, वेद, पुराण, उपनिषदे आणि अर्थशास्त्र यासारख्या प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करीत आहे. अशा अनेक विषयांवर मराठी साहित्य नवीन पुस्तकांची निर्मिती करू शकते.

१९४७ नंतर भारत पाकिस्तान आणि चीन बरोबर चार युद्धे लढला.

**१९४७-४८ च्या भारत-पाकिस्तान युद्धावर मराठी भाषेत प्रकाशित झालेली मराठी साहित्य**

१९४७-४८ चे भारत-पाकिस्तान युद्ध भारताच्या इतिहासातील एका महत्त्वाच्या टप्पा होता. या युद्धामुळे भारताच्या सुरक्षेवर मोठा परिणाम झाला आणि त्याचे परिणाम आजही जाणवतात. या युद्धावर नवीन मराठी साहित्य प्रकाशित होणे जरूरी आहे; ज्यातून या संघर्षाचे विविध पैलू समजू शकू.

**१९६२ च्या भारत-चीन युद्धावर मराठी भाषेत प्रकाशित झालेली मराठी साहित्य**

भारत-चीन युद्ध हे भारताच्या ईशान्य आणि उत्तर सीमेवर २० ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर १९६२ च्या दरम्यान झाले. त्यात भारतीय नेत्रुत्वाचा पराभव झाला; ते अनेक कारणांनी भारतीय लष्कराला धडा देणारे ठरले. या विषयावर अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. यामध्ये काही आहेत, जनरल पित्रे यांचे 'न सांगण्याजोगी गोष्ट : ६२ च्या पराभवाची शोकांतिका', सतीश अंभईकर लिखित, संकल्पना सुधाताई नाटेकर, 'शूरा मी वंदिले' ही १९६२ च्या भारत-चीन युद्धामध्ये वीरगती प्राप्त झालेल्या माझा मावस भाऊ लेफ्टनंट विष्णू आठले याची शौर्यगाथा आत्ताच आम्ही प्रकाशित केली. 'आव्हान चिनी ड्रॅगनचे' हे माझे पुस्तक २०१२ साली प्रकाशित झाले होते.




**१९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धावर मराठी भाषेत प्रकाशित झालेली मराठी साहित्य**

या विषयावर अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. यामध्ये काही आहेत, ज्यातून आपण या संघर्षाचे विविध पैलू समजून घेऊ शकतो.यात लढायांचे तपशीलवार वर्णन, सैन्य रणनीती आणि युद्धाचे राजकीय परिणाम यांचा समावेश आहे. 'भारत-पाकिस्तान युद्ध १९६५: एका सामान्य सैनिकाची कहाणी': हे पुस्तक एका भारतीय सैनिकाच्या दृष्टिकोनातून युद्धाचे अनुभव सांगते. 'ताश्कंद करार : १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धाचा परिणाम' (लेखक: सुनील धानवते): हे पुस्तक ताश्कंद कराराची पृष्ठभूमी, वाटाघाटी आणि त्याच्या परिणामांचे विश्लेषण करते. 'भारत आणि पाकिस्तान : १९४७ ते १९६५ पर्यंतचे संबंध' (लेखक: विजय केशव): हे पुस्तक भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधांची ऐतिहासिक पृष्ठभूमी प्रदान करते आणि १९६५ च्या युद्धाचा कसा परिणाम झाला, याचे विश्लेषण करते.

**१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धावर मराठी भाषेत प्रकाशित झालेली मराठी साहित्य**

या युद्धावर बरेच मराठी साहित्य प्रकाशित झाले आहेत, जी या संघर्षाचे विविध पैलू समजून घेण्यास मदत करतात. काही पुस्तके वरिष्ठ भारतीय सैन्य अधिकाऱ्याच्या दृष्टिकोनातून युद्धाचे वर्णन करतात. यात लढायांचे तपशीलवार वर्णन, सैन्य रणनीती आणि युद्धाचे राजकीय परिणाम यांचा समावेश आहे. काही भारतीय सैनिकाच्या दृष्टिकोनातून युद्धाचे अनुभव सांगतात. यात रणगाडे लढाया, सैनिकांचे धैर्य आणि बलिदान आणि युद्धाचा मानसिक परिणाम यांचा समावेश आहे. या पारंपरिक युद्धामध्ये भारताचे सैन्य हे चीन, पाकिस्तानच्या सैन्याशी लढत होते. या युद्धांशी देशातील जनतेच फारसा संबंध नव्हता. पारंपरिक युद्धमध्ये भारतीय सैन्याने पाकिस्तानचा नेहमीच पराभव केला.

**ऑपरेशन काराकोरममध्ये पाकिस्तानचा पराभव**

१९७१ सालचे युद्ध हरल्यानंतर पाकिस्तानला कळाले की, पारंपरिक युद्धात भारताशी लढून जिंकणे शक्य नाही. म्हणून त्यांनी एक नवीन प्रकारचे युद्ध १९७२ नंतर सुरू केले; ज्याचे नाव होते 'ऑपरेशन काराकोरम.' या काराकोरम युद्धाचे तीन भाग होते. काराकोरम एक म्हणजे खलिस्तानी दहशतवाद, काराकोरम दोन म्हणजे काश्मीरमध्ये छुपे युद्ध किंवा दहशतवाद आणि काराकोरम तीन म्हणजे देशाच्या इतर भागात दहशतवाद.

भारतीय सैन्याने 'ऑपरेशन काराकोरम'मध्ये पाकिस्तानचा जवळजवळ पराभव केलेला आहे. खलिस्तानी दहशतवादाचे कंबरडे मोडले गेले आहे. मात्र त्यापेक्षा भयानक अफू, गांजा, चरसचा दहशतवाद (नार्को टेररिझम), पंजाब आणि सीमावर्ती भागात सुरू आहे. आज पंजाब आणि सीमावर्ती भागातील जवळपास ५० टक्के युवक हे नशेच्या आहारी गेले आहेत. या युवकांना जर वाचवायचे असेल तर बॉर्डर सिक्युरिटी फोर्सला सीमा सील कराव्या लागतील. राजकीय पक्ष, पोलिस, सामाजिक संस्था आणि समाज यांना अफू, गांजा, चरस दहशतवादाच्या लढाईमध्ये एकत्रित लढावे लागेल. काश्मीरमध्ये दहशतवादाचे कंबरडे मोडण्यात आले आहे. काश्मीरच्या खोऱ्यामध्ये आज १५० दहशतवादी असावेत.

भारतीय सैन्य अविरत ऑपरेशन्स लाँच करून त्यांना मारत असते. मात्र पाकिस्तान भारतात दहशतवाद वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून दहशतवादाच्या लढाईकरिता भारतीय सैन्याला अजून रक्त सांडण्याकरिता तयार राहावे लागेल. भारताच्या इतर भागात दहशतवादी हल्ले करण्यापासून थांबवण्यामध्ये आपल्याला यश मिळालेले आहे. मात्र समुद्राकडून तस्करी, बेकायदेशीर व्यापार आणि बांगलादेशी घुसखोरी सुरू आहे. येत्या काळात नौदल, तटरक्षक दल आणि सागरी पोलिसांना डोळ्यात तेल घालून सागरी सुरक्षा मजबूत करावी लागेल. भारताच्या जमिनी सीमांच्या सुरक्षा शिवाय सागरी सुरक्षा, महासागरी सुरक्षा, हवाई किंवा आकाश किंवा अवकाशाची सुरक्षा या विषयांवर कुठलीच पुस्तके नाहीत. या विषयांवर अभ्यास करून मराठी वाचकांकरिता पुस्तके लिहिणे जरूरी आहे.

भारताच्या सागरी सुरक्षेवर लिहिलेली माझी मराठीमधील पुस्तके एप्रिल २०२४ मध्ये प्रकाशित झाली. भारतात नक्षलवाद/डावा दहशतवाद/माओवाद संपवण्याकरिता अर्धसैनिक दले आणि पोलिसांना दंडकारण्य, अबुझमाड जंगल आणि सरंदा जंगलांमध्ये घुसून माओवाद्यांचे ट्रेनिंग, इतर कॅम्प आक्रमक कारवाई करून उद्ध्वस्त करावे लागतील. 'काश्मीर माओवाद दहशतवाद' या विषयावर अनेक पुस्तके प्रकाशित झाली असून याच विषयावर माझी नक्षलवादावर दोन पुस्तके २०१२ आणि सुधारित आवृत्ती २०१९ मध्ये प्रकाशित झाली.

'आव्हान काश्मीरमधील छुप्या युद्धाचे' हे पुस्तकसुद्धा मराठीमध्ये प्रकाशित झाले आहे. १९६१ चे गोवा मुक्ती आंदोलन, १९४८ चे हैदराबाद मुक्ती संग्राम यावरही बरेच मराठी साहित्य प्रकाशित झालेले आहे. मात्र, हैदराबादचे सैन्याने लढलेले 'ऑपरेशन पोलो' व गोवा मुक्ती संग्राममध्ये सैन्याने १९६१ लढलेले ऑपरेशन विजय प्रकाशझोतात नाही. मराठीमध्ये जर यावर पुस्तके प्रकाशित झाली तर जास्त चांगले होईल. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

# संतांची विश्वात्मक दृष्टी

संतांनी ईश्वराला विश्वात्मक स्वरूपामध्ये पाहिले आहे. त्याची विश्वात्मक दृष्टी ही प्रत्येक जीवमात्रावरती पडलेली आहे. संत हे प्रत्येक प्राणिमात्रामध्ये ईश्वराचा अंश पाहतात. त्याला विश्वात्मा समजून त्याची पूजा करतात. इतकेच नव्हे, तर प्रत्येक जीवमात्र व भूतलावरील प्रत्येक जीवाला ते आपले स्वरूप मानतात. **तुका म्हणे जें जें भेटे। तें तें वाटे मी ऐसे।।** संत तुकारामांनी आपल्या जीवनकार्यामध्ये विश्वभाव जोपासलेला आढळतो. त्यांची प्रत्येक कृती, उक्ती ही विश्वात्मकतेचे दर्शन देणारी आहे. त्यांचा विचार हा स्वत:पुरता मर्यादित नव्हता, तर त्यामध्ये प्रत्येक जीवाच्या कल्याणाचा सद्विचार सामावलेला दिसतो.



प्रत्येक जीव हा त्या सर्वशक्तिमान ईश्वराचाच अंश असल्याने 'सर्वाभूती भगवंत' या न्यायाने त्यांनी भूतलावरील विश्वात्मक दृष्टीचा आत्मस्थिती भाव प्रकट केलेला आहे. **अणु रेणू या थोकडा। तुका आकाशा एवढा।।१।। गिलनि सोडीले कलिवर। भवभयाचा आकार।।धृ।। सांडिली त्रिपूटी। दीप उजळला घटी ।। तुका म्हणे आता उपकारापुरता।। अणारणायान् महता माहयान्। आत्मास्य जन्तानिहता गुहायाम।।** संत तुकाराम सांगतात, जीवब्रह्मैक्य ज्ञानाने मी अणूप्रमाणे सूक्ष्म व आकाशाप्रमाणे व्यापक झालो. त्या ब्रह्मज्ञान प्राप्तीमुळे शोक आणि मोहाच्या पलीकडे माझी वृत्ती गेलेली आहे. देहभ्रमाचा आकार मावळल्यामुळे आणि देहतादात्म्य नाशामुळे मला संसाराची व जन्ममरणाची भीती वाटत नाही.

जीवच परब्रह्माचा अविभाज्य घटक झाल्यामुळे 'ज्ञाता- ज्ञान- ज्ञेय' व 'ध्याता- ध्यान- ध्येय' या त्रिपुटींच्या पलीकडे माझ्या वृत्ती निमाल्या. प्रस्तुतच्या आत्मस्थिती भावामुळेच त्यांच्या हृदयात परमात्म ज्योतीचे लाखो दीप प्रकटले व त्या परमप्रकाशाने प्रकाशमय झाल्याचे दिसतात. त्यामुळेच तुकोबा कर्तव्यभाव स्थितीने या भूतलावर लोकोपकाराकरिता उरलेले दिसतात.

प्रत्येक जीवामध्ये माझा आत्मा सामावलेला आहे, असा आत्मप्रत्ययाचा भाव अभंगवाणीतून प्रकट केला आहे. **अवधी भूतें साम्या आली। देखिली म्यां कैं होती।। विश्वास तो खरा मग। पांडुरंग कृपेचा ।।धु।। माझी कोणी न धरो शंका। हो का लोंका निवव्द।।२।। तुका म्हणे जें जें भेटे। ते ते मी ऐसे।।३।।** संत ज्ञानेश्वरांनीही अशाच विश्वात्मकतेचे दर्शन ज्ञानेश्वरीमधून घडविलेले आहे. त्यांना हे संपूर्ण विश्व स्वतःचे घरच आहे, असे वाटते. नव्हे नव्हे चराचरातील प्रत्येक जीवामध्ये ते स्वत:ला पाहतात. **हे विश्वचि माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला।।** अवघे विश्वच एका ईश्वराच्या प्रकाशाने ओतप्रोत व्यापलेले असताना प्रकृती गुणधर्माप्रमाणे भूतमात्रात भिन्नत्व असले, तरी ईश्वर व्यापकत्वाने सृष्टीच्या आदि-अंती अथवा स्थिती-काळी एकाच ईश्वराची प्रचीती येते. त्यामुळे 'जीवजगत-देव' यांच्यात कुणीही भेद करणे हे अज्ञान होईल. **पावलें पावलें तुझे आम्हां सर्व। दुजा नको भाव होऊ देऊ ।।१।। जेथें तेथे तुझींच पाउलें। त्रिभुवन संचले विठ्ठला गा ।।धु।। भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद। आम्हा नको वाद त्यांशी देऊ।।२।। तुका म्हणे अणु तुजविण नाही। नभाहूनी पाही वाढ आहे।।३।।** सर्व प्राणिमात्र ब्रह्मत्वाने साम्यावस्थेला आल्याचा अनुभव माझ्या ज्ञानदृष्टीला जेव्हा येईल, तेव्हा परमेश्वराने पूर्ण कृपा केली, असे मी समजतो. सर्व प्राणिमात्र आपपर भावरहित व्हावेत. माझ्या बद्दल कोणीही शंका घेऊ नये. माझ्या दृष्टीला पडणारा प्रत्येक प्राणी माझा आत्मा आहे, असा विश्वात्मक भाव संतांच्या वृत्तीत सामावलेला दिसतो. **अवघे जन मज जाले लोकपाळ। सोईरे सकळ प्राणसखे।।३।। तुका म्हणे आता खेळतो कौतुके। जाले तुझे सुख अंतर्बाहीं।।४।।**

**संतांची विश्वात्मक दृष्टी**

संत तुकारामांनी अवघे विश्वच आपल्या सृष्टीचा पसारा मानून त्याला त्यांच्या दृष्टिक्षेपात आणले. अद्वैतावस्थेमध्ये ज्ञानस्वरूप द्रष्ट्यापेक्षा दृश्य हे वेगळ्या प्रकारचे नसते. ज्ञानस्वरूप असणारा द्रष्टा परमात्माच दृश्य झालेला असतो. चिन्मात्र ब्रह्म वस्तूवर अनेक प्रकारचे नामरूपात्मक दृश्य वस्तूंचे समुदाय एकामागून एक उमटत असले, तरी त्याच्या तळाशी एकमेव तत्त्व असते. या ब्रह्मस्वरूपाची अनुभूती तुकारामांनी भक्तिमार्गाने घेतली. निर्गुण असणारा परमात्मा व त्याचे सगुण रूप म्हणजे हे विश्व आहे. तेव्हा सगुण साकार पांडुरंग हा सर्वात्मक व विश्वात्मक आहे. हाच तुकारामांचा **जे जे देखे तेथे तुझीच पाऊलें। विश्व अवघे कोंदाटले।। रूप गुणनाम अवघा मेघश्याम। वेगळे ते काय उरले ।।** सारे विश्वच ईश्वररूपाने व्यापलेले असल्याने नामरूपात दिसणारे विश्व हे अवघे कृष्णमय झालेले आहे. त्यामुळे मी ज्या काही जीवनरथ चालविणाऱ्या क्रिया करतो, त्या सर्व तुलाच अर्पण केलेल्या आहेत. झोपेत जरी मी लोळत असलो तरी ते तुला घातलेले दंडवत किंवा लोटांगणच आहे. त्यामुळे मला दिसणारा भेटणारा प्रत्येक जीव, प्रत्येक मनुष्य तुझेच रूपे आहे. या दृष्टीला तुझ्या रुपाशिवाय मला काहीही दिसणे शक्य नाही. **वंदिन मी भूलें। आता अवधीची समस्ते ।।१।। तुमची करीन भावना। पदोपदी नारायणा ।।धृ।। गाळुनीयां भेद । प्रमाण तो ऐसा वेद।।२।। तुका म्हणे मग । नव्हे दुजयाचा संग।।३।। सर्वांभूती भगवंत अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्र: करूण एवं च। निर्ममो निरहंकार: समदु:खसुख: क्षमी ।।**

सर्वव्यापक चैतन्याला ज्याप्रमाणे कधीही आपपर भाव नसतो. अगदी त्याचप्रमाणे मुक्तात्मा असणाऱ्या विभूतींनाही आपला व परक, असा भेद नसतो. त्यांच्याकडून कोणत्याही प्राण्याचा द्वेष किंवा मत्सर घडत नाही. त्यांची वृत्ती ही उत्तमाचा स्वीकार करणारी, तर अधमाचा त्याग करणारी असते, असे गीता सांगते. सर्व भूतमात्राशी त्यांची मैत्री असते. मी-तू ची भाषा त्यांच्या मुखात वा मन:पटलामध्ये कधीही वास करीत नाही. सुखदु:खाची जाणीव त्यांना नसते. तो मुक्तात्म्याचा परिणाम असतो. प्रस्तुतची सर्व लक्षणे संत तुकारामांनी आपल्या कृती-उक्तीतून अंगीकृत केलेली होती. त्यामुळे तेसुद्धा जीवनमुक्त होते. त्यांची धारणा सर्वाभूती भगवंत अशीच होती.

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि। ईक्षवर्त योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शन:।। ज्याच्या ठायी प्राणिमात्रांमध्ये आपण आहोत. आपल्या ठिकाणी प्राणिमात्र आहेत, असा भाव असतो. तो सर्वत्र समदृष्टीने पाहतो. अशी समदृष्टी ठेवण्याची शिकवण संत तुकारामांनी आपल्या अभंग वाङ्मयातून दिलेली आहे.

**भूति भगवद्भाव। मात्रा सहित जीव।। अव्दैत तो ठाव। निरंजन एकला ।।१।। ऐसी गर्जती पुराणे । वेदवाणी सकळजन।। संत गर्जतील तेणे। अनुभवे निर्भर।।२।। माझे तुझे हा विचार। निरसता एककार।। न लगे काही फार विचारची करणे। तुका म्हणे दूजे हे तो नाही सहजे।।** जीवनात सर्वाभूती परमेश्वर पाहण्याची ही संतांची वृत्ती त्यांना संतत्वापर्यंतच्या अवस्थेला घेऊन जातात, याची जाणीव होते.

---

कथा

सुचित्रा बाकरे

# व्यथा

'छुन... छुन... छुन...' असा पैंजणाचा आवाज, चेहऱ्यावर थोडसं हसू, डोळ्यात शंकेची दरी, चेहऱ्यावर जणू चूक केल्याची भावना घेऊन सविता कामावर निघाली. घराच्या गल्लीतून निघताना लोकांच्या नजरा तिच्यावर खिळल्या. तसा तिच्या पावलांचा ताल कमी झाला. पायातल्या पैंजणांचा आवाज कमी झाला, मनाला खिळ घालत दबकत दबकत गल्लीतून बाहेर पडली. अचानक तिच्या कानावर एका बाईचे झणझणीत वाक्य आले, ''हिने बी रंग दाखवाले सुरू केले बापा!'' ती घराकडे झर्रकन वळली खरी; पण एक क्षणभर थबकली आणि पुन्हा कामावर जायला निघाली.

तिच्या मनात विचार आला, 'आज नाही तर कधीच नाही. माझा धनी जाऊन दोन वर्षे झाली. म्या काय चूक केली? माझ्या मनातल्या भावनांना कुचलून समाज काय मिळवणार हाय, माहीत नाही?' रस्त्यावर भरगर्दीत चालताना तिचा करकचून घातलेला अंबाडा आणखीच घट्ट वाटायला लागला. जणू विचारांची कुठेतरी सैल पडलेली वीण तिने घट्ट केली होती... सावळा रंग, बारीक लाल टिकली आणि साडीचा घट्ट खोचलेला पदर, सडपातळ पण ताठ बांधा घेऊन समाजरूपी युद्धावर निघाली होती.

माझ्या घरात येताच मी म्हणाले, ''काय, सविता आज लवकर आलीस?'' ती डोळ्यांच्या ओल्या कडा पुसत म्हणाली, ''जी मॅडम जी, आज थोडी बाजारात जाईन जी.. पोरींना फराक घ्यायचे म्हनते... हळदी-कुंकू आलंय ना जी!'' हे म्हणताना डोळ्याच्या सागरात सर्द भावनांच्या लाटांवर हेलकावे घेत होती. मनात विचार चक्र सुरू झाले. खरंच अजूनही स्त्री इतकी अबला आहे का? तिला होणारा घरातला त्रास.. स्त्रीनेच स्त्रीची केलेली अवहेलना..अजून का थांबत नाही आहे? सविताचं वय अवघे ३१ वर्षे. नवरा दोन वर्षांपूर्वी गेल्याचे कळले. फार प्रामाणिक होती ती. पण सवितासारखी खुद्दार बाई जगाला काय कळणार होती? नव्हे, त्यांना समजूनच घ्यायची नव्हती.

कवच नसलेल्या एका स्त्रीकडे बोट उंचावण्याची समाजाची फार जुनी सवय होती. तिच्या डोळ्यात आलेल्या धारांनी मला सारं काही सांगितलं. काही वर्षांपूर्वी पोटभर अन्न मिळू शकेल असे तिचे कुटुंब होते. मुलगा होईल या आशेवर पाच मुली झाल्या. सविता कधीही घराच्या बाहेर पडली नव्हती. नवऱ्याने कमवायचं आणि तिने संसार सांभाळायचा, एवढंच तिला माहीत होते. अचानक नवऱ्याची साथ संपल्यामुळे पदरात पाच मुलींचं ओझं घेऊन तिला घराबाहेर पडावं लागलं. तिने घराबाहेर पडणे स्वीकारले आणि त्यासोबत आघातही...! तिची तारेवरची कसरत सुरू होती. घरात होणारा जाच तर समाजापेक्षाही भयंकर होता... सासऱ्याची करडी नजर, सासूचे भेदक डोळे आणि सततचे टोमणे! पण सविता खंबीर होती. परिस्थितीशी जुळवून घेणे शिकली होती. असे जीवन चालले असताना तिच्या दोन मुलींची लग्नं झाली. त्या मुलींचा संसार फुलताना पाहून हिच्याही मनातील शृंगाररस कधी कधी जागायचा. एकटी असताना आरशासमोर नटायची, मुरडायची. पण पुन्हा समाजाच्या भीतीने आपल्या जीवन पुस्तकातील आनंदाचे पान चुरगळून मनात दडवून ठेवायची. तिला कळतच नव्हते या अन्यायाला कसे उत्तर द्यायचे ते? पुन्हा पुन्हा आक्रंदत होती. टपोऱ्या डोळ्यात भरून आलेले अश्रू मला सांगताना ओघळायला लागले... ''काय गुन्हा केला जी, म्या पायात चाळ घातले, तर सासूबाई, गल्लीतील बाया मले बोलायला लागल्या. नवरा नसताना मायावरती खिळणाऱ्या नजरा मले खूप काही सांगत असत्यात...!'' नकळत बांध फुटला... जणू मनाच्या तुरुंगाचे दार तिने स्वत:च उघडले होते. ती पुढे म्हणाली, ''धनी गेले तवा माझं वय २९ वरस होतं. मला वाईट तर लय वाटलं जी... पण त्यांनी असेपर्यंत जीवनात आनंदाचा एक क्षणही दिला न्हाय. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागला. या सगळ्या दु:खाचा निचरा होत थोडी त्यातून बाहेर पडायचं म्हनलं, फुलपाखरावानी उडायच म्हनलं तरी पदरात पाच पोरींची जबाबदारी हायच की. असंच हे जीवन निघून जाणार. लहानपणापासून सपान पाहिलं होतं. शिकेल, नोकरी करीन आणि घराले सांभाळीन. या जगण्याची आशाच संपली हाय जी. सासू-सासऱ्यांचा तरास, मुलींची जबाबदारी, पैशांचा प्रश्न, समाजाच्या नजरा आणि शरीराची हेळसांड...!'' बोलता बोलता आवंढा गिळला तिने. मला वाटलं, या समाजातील विचारांचे विरविरीत झालेले वस्त्र अंगावर पांघरून अंग झाकण्याऐवजी, तिने पदर खोचून झाशीची राणी व्हावे. मी तिला हळूच खाली बसवले, म्हणाले, ''आज काम असू दे सविता. आपण छान गप्पा करू. मी चहा ठेवते. गरम चहा पी. मग बरं वाटेल तुला.'' चहा घेत घेत आमचा विषय सुरू झाला. ती म्हणाली, ''आजच्या जगात महिलेची पूजा कराची म्हने. जी सासू आपल्याला तरास देते, समाजातील बायका रडवते.. त्यांची काहून पूजा कराची? अन् म्हने का, 'पोरगी शिकली प्रगती झाली.' पण जाणीव विसरली ना जी... आणि हा समाज तर खाचखळग्यातून जाणाऱ्या गाडीले खिळ लावाले बसला हाय. स्त्रीची होणारी होळी बघत मजा घेत बसला हाय.'' एका श्वासात तिच्या डोळ्यातील समाजाप्रती असलेली घृणा, आग तिने ओकली. या तिच्या सगळ्या विचारांचे मी गाठोडे बांधून बाजूला ठेवले आणि तिला निक्षून सांगितले की... ''ऐक... तूच आता दुर्गा हो आणि घे हातात त्रिशूळ... तूच हो लक्ष्मी आणि दे हिसका पैशाचा. तूच धरणी अन् तूच दामिनी हो. अगं फुलेंची सावित्री ना तू... मग शिकव साऱ्या जगाला... हो लढणारी झाशीची राणी... आणि जिंकून घे सारं जग... लढवय्या आहेस तू या जगाची... तू कर संहार या जगतात... तू जीवनाचे सहाण केलेस, झाली खोड चंदनाची, दरवळला सुगंध पण आता हो लखलखते त्रिशूळ... घे विकृतीच्या नरड्याचा घोट... कर नष्ट ही विकृती आणि हो मोकळी जगायला. तू स्वयंप्रकाशी तारा आहेस... कधीही न ढळणारा... दे संजीवनी प्रत्येक महिलेला.. घे पोटात त्यांचे दु:ख.. हो झालर वाऱ्याची... दाखव नव्या वाटा त्यांना... आणि घे उंच उंच भरारी...''

खरं तर हे बोलताना मीही थरथरत होते. नकळत माझ्याही जीवनात आलेल्या प्रसंगाचे तर हे पडसाद नसावेत ना? पण मी हा विचार झटकून टाकला आणि भिंत होऊन तिला आधार दिला. ''काही लागलं तर आम्ही आहोत सगळ्या तुझ्या पाठीशी.'' हे ऐकून तिला जरा हुशारी आली होती. तिने डोळे पुसले. महिला दिन साजरा करणाऱ्या सासूला जाब विचारणार म्या. या घरात तूच मला आनलं न...अन् कायले हा तमाशा? तू काय साजरा करते महिला दिन? मीच तूले घरातून बाहिर काढते. मग अक्कल येईल. समाजाला बी लाज नाही, एक दिवस बाईची बैलावाणी पूजा कराची, वरसभर तिला तरास द्यायचा. हे का व्हय जी महिला दिनाचे परकरन?'' ''अगं सविता...'याला जीवन ऐसे नाव...' ही सगळी मानसिक विकृती आहे. त्यासाठी शिक्षणाचा अभाव हे मुख्य जरी कारण आहे तरीही आपल्या मनाची घडी आपणच बसवली पाहिजे. प्रत्येक स्त्रीने हे बघायला पाहिजे की, ८ मार्चला महिला दिन साजरा करण्यात येतोय त्यासाठी खरंच आपण पात्र आहोत का? आपण महिला म्हणून काय काय करतो? आपल्या घरासाठी, आपल्या समाजासाठी... तरच आपले महिला दिन साजरा करण्याचे ध्येय पूर्ण होईल. आपल्या सवयी, आचार विचार, वेळेचे महत्त्व, वाचनाचे महत्त्व, मुलांवरती संस्कार, दुसऱ्याशी चांगले, नम्र वागणे, समाजाचे आपण काही देणे लागतो याचे भान ठेवणे, कोणाचे मन न दुखावणे, लोकांना नावे न ठेवणे इ... आपल्या घरात खड्डा पडला असताना, दुसऱ्यांना ज्ञान शिकवण्यात कसला आलाय मोठेपणा?

(पान ६ वर)

# चीड अन्यायाची, परीक्षा धैर्याची!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. पहाटेचे ५ वाजून १७ मिनिटे झाली होती. आपली पायलटची आटोपशीर स्मार्ट बॅग घेऊन सिनियर कॅप्टन मोना डौलात विमानाच्या कॉकपीटकडे चालत गेली. या नवीन नोकरीत ही तिची पहिलीच फ्लाईट होती. तसा कमर्शियल पायलट म्हणून वयाच्या ३७ व्या वर्षी कॅप्टन मोनाचा अनुभव २० वर्षे व १५ हजार तासांचा झाला होता. वयाच्या १७ व्या वर्षांपासूनच ती पायलट झाली होती. लोक तिच्याबद्दल म्हणत की, जणू जन्मजातच एका पक्ष्यासारखी सराईतपणे ती विमान चालवते.

लोकांना तिच्याशी बोलताना तिचा दुर्दम्य आत्मविश्वास जाणवायचा. ती प्रत्येकच काम अतिशय काटेकोरपणे करायची. जुनी नोकरी बदलून अमेरिकेच्या एका सुप्रसिद्ध जुन्या व मोठ्या एअरलाईन कंपनीत सिनियर कॅप्टन म्हणून ती रुजू झाली. पण ती



विमानाच्या दाराजवळ पोहोचताच तिच्या कानावर मागून शब्द पडलेत. ''तुम्ही जरा बाहेर थांबा!'' असे बोलून एअर लाईन्सच्या साधारण कामगार स्त्रीने पुढे येऊन तिचा मार्ग अडवला व नोकरीच्या पहिल्याच दिवशी तिचा जाणूनबुजून अपमान केला.

अमेरिकेत वंशवादाचा त्रास या पूर्वीसुद्धा तिला झाला होता. तिने डोकं शांत ठेवले. तेवढ्यात मागून एक तिच्यापेक्षाही वयाने व अनुभवाने मोठे असलेल्या रिचर्ड नावाच्या गोऱ्या वैमानिकाचे आगमन झाले. त्याला काळे लोक आवडत नाहीत, हे तिला माहीत होते. त्याने तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले व आपल्या सीटवर जाऊन बसला. नंतर आणखी एक गोरा अधिकारी थॉमस आला व तिला म्हणाला, ''तू इथे नवीन आहेस त्यामुळे मी रिचर्डला या फ्लाईटचा प्रमुख नेमले आहे.'' मनातून ती प्रचंड चिडली होती, पण शांत राहिली व म्हणाली, ''या प्रकारचे विमान याच रुटवर मी ७३ वेळा उडवले आहे. मी नवीन वैमानिक नाही, तर सिनियर कॅप्टन आहे.'' त्याने त्यावर उत्तर दिले- नाही. तिला मुद्दाम त्रास देण्यासाठीच हे सगळे चालले होते.

तेवढ्यात फर्स्ट ऑफिसर म्हणजे एक तरुण कनिष्ठ वैमानिक जेम्स तिथे पोहोचला. तिला असा त्रास देणे त्याला आवडत नव्हते. ती प्रमुख असूनसुद्धा तिला सहप्रमुखाच्या जागी बसवण्यात आले. आधी सखोल माहिती गोळा करून मग त्यांना पद्धतशीर प्रतिकार करायचा, असे तिने ठरवले. तिच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यात येतंय, हे तिला जाणवले. ती फ्लाईट लॅण्ड करताना रिचर्डला त्याची एक चूक तिने लक्षात आणून दिली; ज्यामुळे त्याला धक्का बसला. नंतर अनेकदा आराम करायला तिला वेळ मिळू नये या पद्धतीने पायलटचे काम देण्यात आले. रात्री तिला तिच्या वकील असलेल्या बहिणीचा फोन आला. तिने तिचा सगळा अनुभव तिला सांगितला. तिला माहीत होते की, मोना सहजासहजी हार मानणारी नाही. मोनाने पद्धतशीर विविध प्रकारची माहिती गोळा करताना एक अत्यंत महत्त्वाची माहिती तिला मिळाली.

प्रत्येक फ्लाईट लॅण्ड झाल्यावर पुढच्या प्रवासाला निघण्यापूर्वी विमानाची देखरेख करणारी चमूद्वारे विमानाची पूर्ण तपासणी करणे आवश्यक असते. अशी तपासणी झाल्याचे कागदपत्र वैमानिकाला पाहण्याचा पूर्ण अधिकार असतो. तिला एक नुकतेच आलेले विमान दुसऱ्या रुटवर घेऊन जायला सांगण्यात आले. तिने देखरेख करणाऱ्यांना तपासणीचे कागदपत्र मागितले असता आधी त्यांनी टाळाटाळ केली. कारण एवढ्या कमी वेळात तपासणी पूर्ण होत नाही, हे तिला माहीत होते. नंतर ते कागद हातात आल्यावर काही तपासण्या झाल्याच नसल्याचे स्पष्ट झाले. तिने त्या तपासण्या पूर्ण झाल्याशिवाय विमान पुढे न्यायला मनाई केली. शेवटी त्या तपासण्या पूर्ण झाल्यावर त्या फ्लाईटला अर्धा तास उशीर झाला. लागलीच एक कमिटी बनवण्यात आली व तिच्यावर फ्लाईटला उशीर केल्यामुळे कंपनीचे नुकसान झाल्याचा ठपका ठेवण्यात आला. त्या तपासण्या केल्या नसत्या तर प्रवाश्यांच्या जिवाला धोका झाला असता हे तिने सिद्ध केले. त्यामुळे निरुपायाने ते शांत राहिले. तिने पुढे तपास सुरू ठेवला असता विमानाच्या जास्त फेऱ्या करून जास्त नफा घेण्याच्या प्रयत्नात ही कंपनी लोकांच्या जिवाशीच खेळतेय हे तिला कळले. अनेक वैमानिकांना पुरेसा आराम मिळत नाही हेही कळले. म्हणजे विमान आणि वैमानिक दोन्हींवर ताण जास्त वाढल्यामुळे अपघात होण्याची शक्यता होती.

आवश्यक ती पूर्ण माहिती गोळा करताना तिने विमानाच्या कॉकपिटमधील बिघाड दाखवणाऱ्या यंत्रांचे फोटो घेतले. त्याच वेळी विमान ठीक आहे, असे दाखवणाऱ्या खोट्या रिपोर्टचे फोटो घेतले. कंपनीचे बिंग फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका व्यक्तीचा संशयास्पद परिस्थितीत अपघाताने मृत्यू झाल्याचे तिला कळले. म्हणजे तिच्याही जिवाला धोका होता. ती सावध राहून स्वत:ची योग्य काळजी घेऊ लागली.

अपेक्षेनुसार त्यांनी तिला नोकरीतून काढण्याचा निर्णय घेतला. हे तिला सांगण्यासाठी तिला ऑफिसात बोलावण्यात आले. तेव्हा ती अतिशय शांत होती. कारण तिला असे होऊ शकते याची आधीच कल्पना असल्यामुळे तिने पण जय्यत तयारी केली होती. त्याच दिवशी ऑफिसात जाण्याच्या आधीच तिने या संपूर्ण प्रकरणाचा भांडाफोड करणारा एक रिपोर्ट तयार करून अमेरिकेतील मोठ्या वृत्तपत्रांना पाठवला व अमेरिकेतील विमान कंपन्यांवर लक्ष ठेवणाऱ्या शासकीय विभागाला पाठवला. त्याचा उपयोग करून तिच्या वकील बहिणीने कोर्टात केस टाकली. या सगळ्या रिपोर्टची एक कॉपी तिने त्या कंपनीच्या लोकांना देण्यासाठी तिने सोबत ठेवली.

त्या शेवटच्या मिटिंगमध्ये 'तू स्वत:च नोकरी सोड नाहीतर आम्ही तुला नोकरीतून काढले तर तुला कुठेच नोकरी मिळणार नाही' अशी तिला धमकी देण्यात आली. त्याच दरम्यान तिला तिच्या बहिणीचा तिला फोन आला की, लगेच टीव्ही लाव! प्रवाश्यांचा जीव वाचवण्यासाठी तू किती धडपड करते आहेस ते पूर्ण अमेरिकेला कळले आहे. तसेच त्या कंपनीच्या सर्व विमानांना सरकारतर्फे पूर्ण तपासणी केल्याशिवाय एकही फ्लाईट उडवता येणार नाही असे कळले. तेवढ्यात तिला धमकावणाऱ्यांना फोन येऊ लागले. कुणीतरी तिथला टीव्ही सुरू केला आणि तिला त्रास देणाऱ्यांचे गोरे चेहरे भीतीने लाल झाले. मग तिने त्यांना त्याची कॉपी दिली व सांगितले की, ज्याचा त्यांनी आधी खून केला आहे त्याचीही तपासणी होणार आहे. तिला काही इजा किंवा जिवाचा धोका झाल्यास त्यांना लगेच अटक होईल. अक्षरश: एक आठवड्यात पूर्ण कंपनी बंद झाली. त्या कंपनीतील चांगल्या लोकांना इतर कंपन्यांनी नोकऱ्या दिल्या. मोनासाठी तर अनेक विमान कंपन्या घ्यायला उत्सुक होत्या. कारण मोना म्हणजे प्रवाश्यांच्या सुरक्षेची पूर्ण हमी अशी तिची छबी तयार झाली. मग तिने योग्य विचार करून एका चांगल्या कंपनीत सिनियर कॅप्टन म्हणून नोकरी स्वीकारली. अनेक ठिकाणी तिचा सत्कार करण्यात आला. एकटी म्हणून तिने घाबरून न जाता धैर्याने आपले कार्य केले व यशस्वी झाली.

२. भारतातील टॉपच्या मोठ्या औषधी कंपनीत १४ वर्षे काम केल्यानंतर शेखर एका कंपनीत एरिया मॅनेजर म्हणून रुजू झाला. लहान असली तरी महाराष्ट्रात कंपनीचे चांगले नाव होते. शेखरची टीम पण छान होती. त्यामुळे लवकरच त्याचे चांगले बस्तान बसले. पण चार वर्षांनी एका मोठ्या परदेशी कंपनीतील एक अख्खी टीमच या मराठी कंपनीत रुजू झाली. सर्वोच्च पदावर व्हाईस प्रेसिडेंट, त्या खाली झोनल मॅनेजर, त्या खाली रिजनल मॅनेजर व त्या खाली एरिया मॅनेजर आणि सर्वात शेवटी वैद्यकीय प्रतिनिधी अशा सगळ्या स्तरावर त्या परदेशी कंपनीतील मराठी मंडळी रुजू झाली. या पूर्ण नवीन टीमला ते आधीच्या लोकांपेक्षा कसे वरचढ व लायक आहेत, हे कसेही करून दाखवायचे होते. त्यामुळे त्यांनी आधीच्या लोकांना कंपनीकडून मार्केटिंगसाठी येणाऱ्या साधनांमध्ये कपात केली तसेच जास्त मागणी असलेला माल नवीन आलेल्या लोकांना देण्यासाठी प्राधान्य दिले.

राष्ट्रीय स्तरावर उत्तम काम व्हावे म्हणून विविध स्तरावरील प्रत्येकाचे किती टार्गेट पूर्ण झाले याची स्पर्धा असते. या स्पर्धेत जे उत्तम कामगिरी करतील त्यांना अलिबागला स्टार नाईट कार्यक्रमात पुरस्कार मिळतील, असे जाहीर करण्यात आले. ते स्पर्धा वर्ष पूर्ण झाल्यावर एरिया मॅनेजरच्या दोन दिवसाच्या कॉन्फरन्समध्ये स्टार नाईट फंक्शनसाठी कोण पात्र ठरले, त्याची यादी जाहीर झाली. शेखरला मॅनेजरच्या यादीत त्याचे व वैद्यकीय प्रतिनिधींच्या यादीत त्याच्या टीममधील नावे दिसतील याची खात्री होती; कारण सलग तीन वर्षे तो आणि त्याची टीमच सर्वात उत्तम कामगिरीसाठी प्रसिद्ध होती. पण कोणत्याच यादीत त्याचे किंवा त्याच्या टीमचे नाव नव्हते. शेखर त्यावेळी शांत राहिला.

दुसऱ्या दिवशी तो सर्वांच्या आधी कंपनीत येऊन, त्याला हवे ते सगळे रेकॉर्ड्स प्रिंट करून घेतले. त्याचा अभ्यास केल्यावर त्याचा संशय खरा ठरला. विक्रीचे आकडे, मालाचा पुरवठा व पुरविलेली साधने यात त्याच्या टीमवर अन्याय करण्यात आला होता. तरीही कामगिरीत शेखर आणि टीमचा नंबर सर्वात वरच होता. पण पक्षपाती धोरणामुळे स्पर्धेत विजयी वीरांमध्ये त्यांचे नावच नव्हते. त्यात परदेशी कंपनीतून आलेली टीमच वरचढ आहे, हे दाखवायचा प्रयत्न होता. त्या दुसऱ्या दिवशीच्या मिटिंगमध्ये कंपनीचे मालक व वरच्या स्तराचे सगळे अधिकारी हजर होते.

योग्य वेळी शेखरने सर्वांसमोर धैर्याने मला व माझ्या टीमला अद्याप स्टार नाईट फंक्शनसाठी आमंत्रण मिळाले नसल्याचे सांगितले. त्याच्या वरच्या पोस्टवरचे सगळे अस्वस्थ झाले व डोळ्याने त्याला दाबायचा प्रयत्न केला. झोनल मॅनेजर म्हणाले, ''रेकॉर्डनुसार तुमचे त्यात नाव नाही.'' शेखरने नुकतेच काढलेले प्रिंट्स सरळ मालकांच्या समोर ठेवून त्यांना दाखवले. मालक व्हाईस प्रेसिडेंटला म्हणाले, ''चुकीची ताबडतोब दुरुस्ती करा व मला नंतर येऊन भेटा.'' (मालकाने नंतर त्यांना सुनावले) शेखरने लढाई जिंकली. त्याला व टीमला अलिबागला स्टार पुरस्कार मिळालेत. शिकायचे काय?

**अश्वं नैव, गजं नैव, व्याघ्रं नैव च नैव च।**
**अजापुत्रं बलिं दद्यात्?, देवो दुर्बल घातकः।।**

जेव्हा बळी द्यायचा असतो तेव्हा कुणीही घोडा, हत्ती किंवा वाघाचा बळी देत नाहीत. कारण ते सक्षम व ताकदवान प्राणी आहेत. बळी बकऱ्याचाच देतात. कारण तो असहाय्य व कमजोर प्राणी आहे. देवसुद्धा जो कमजोर असतो त्याला मदत करत नाही. जो स्वत:ला मदत करतो त्यालाच देव साहाय्य करतो.

तेव्हा कितीही प्रतिकूल परिस्थिती असली, तरी घाबरून कमजोर होऊ नका. धैर्याने परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण करा. त्यातून आपल्याला त्या प्रतिकूल परिस्थितीवर कशी मात करता येईल ते कळेल. मिळालेल्या माहितीचा उपयोग करून परिस्थितीला अनुकूल करता येईल व जिद्दीने विजय मिळविता येईल.

(लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## सात्त्विक छायेत । ध्यान करी ।।

चिंतन मनन । अखंड करावे ।।
विठ्ठेस भजावे । रात्रंदिन ।।१।।

आळस करतो । घात आयुष्याचा ।।
काळ तारूण्याचा । मौल्यवान ।।२।।

आळवाचा थेंब । यौवन जपावे ।।
संयमी रहावे । दोषमुक्त ।।३।।

सज्जनांचा संग । दुर्जनांचा त्याग ।।
उत्तम हा योग । सुखदायी ।।४।।

गुंतू नको मना । पाशवी मायेत ।।
सात्त्विक छायेत । ध्यान करी ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## रंग-श्रीरंग

श्रीरंग उडवितो रंग, गोपिकासंग ।
श्रीरंग खेळतो रंग, भक्ती गुणरंग ।।१।।
सतरंग उधळितो रंग, खेळे आनंद ।
सूररंग बासुरी दंग, नाद स्वानंद ।।२।।
स्वर्गंग राधिका नंद, नाद-रस-रंग ।
रसरंग मिसळला बुंद, हरी-सतरंग ।।३।।
हा छंद राधेगोविंद, हरी-सत्संग ।
हा नंदलाल आनंद होळीचा रंग ।।४।।
हा रंग तांबडा रक्तवर्ण गुणरंग ।
हा रंग नारंगी गुलाल उधळीत रंग ।।५।।
हा रंग पिवळा पीत-पितांबर रंग ।
हा रंग हरीत रेशमी शेला रंग ।।६।।
हा रंग असमानी हरीरंग श्रीरंग ।
नीलरंग मयुरगुणरंग शांतमनरंग ।।७।।
हा रंग जांभळा सप्तरंग स्वच्छंद ।
आनंद पसरितो धुंद भक्ती सुगंध ।।८।।
हा छंद भक्ती व्यासंग 'मनवा' मनसंग।
सारंग रंगबेरंगी वेणू श्रीरंग ।।९।।

डॉ. मिलिंद इंदूरकर

## सल्ला...

असाही संसार..! असाही संसार..
कष्टाने मांडलेला कचऱ्याचा संभार तारेवर लटकलेला...
असाही संसार..
चिकाटीने विणलेला पक्षिणीचा भर्तार पाहाऱ्यास नेमलेला...
असाही संसार..
वात्सल्याने भरलेला पिलांना देण्या
आकार चोचीत दाणा टिपलेला... असाही संसार..
घरट्यात रक्षिला निसर्गाचाच आधार पिलावळीस
वाहिलेला...

आशिष देव

# देशाला तारणारी उलाढाल वाट



**शेअर बाजाराला आग लागली असताना अन्य काही अर्थक्षेत्रांमध्ये मात्र बरकतीच्या बातम्या आहेत. अशीच एक महत्त्वाची बातमी म्हणजे देशातील किरकोळ बाजाराची उलाढाल १९० लाख कोटींवर जाण्याची शक्यता आहे. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे जीएसटीमधून दररोज सरासरी पाच ते सहा लाख कोटी रुपयांची कमाई होत आहे तर तिसरी बातमी म्हणजे ग्रामीण भागाने देशाच्या जीडीपीची लाज राखली आहे.**

अर्थोद्योग
महेश देशपांडे

शेअर बाजाराला आग लागल्यासारखी परिस्थिती अलिकडच्या काळामध्ये अनुभवायला मिळत असताना अन्य काही अर्थक्षेत्रांमध्ये मात्र बरकतीच्या बातम्या आहेत. अशीच एक महत्त्वाची बातमी म्हणजे देशातील किरकोळ बाजाराची उलाढाल १९० लाख कोटींवर जाण्याची शक्यता आहे. दुसरी लक्षवेधी बातमी म्हणजे जीएसटीमधून दररोज सरासरी पाच ते सहा लाख कोटी रुपयांची कमाई होत असल्याचे आकडेवारीमधून स्पष्ट झाले आहे तर तिसरी खास बातमी म्हणजे ग्रामीण भागाने देशाच्या जीडीपीची लाज राखल्याचे दिसून आले आहे.

देशातील किरकोळ बाजार तेजीत आहे. २०३४ पर्यंत हा बाजार १९० लाख कोटी रुपयांवर पोहोचण्याची अपेक्षा आहे. देशात मोठ्या प्रमाणात असलेल्या किरकोळ विक्रेत्यांना याचा फायदा होणार आहे. 'बोस्टन कन्सल्टिंग ग्रुप' आणि 'रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया'ने तयार केलेल्या अहवालात म्हटले आहे की, देशातील विविध विभागातील ग्राहकांच्या गरजाही भिन्न आहेत आणि किरकोळ विक्रेत्यांना त्या जाणून आणि समजून घेण्याची संधी मिळेल. सुजाण नागरिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. हा अहवाल पुढे सांगतो की, भारतातील किरकोळ बाजाराचा आकार २०१४ पर्यंत ३५ लाख कोटी रुपये होता. २०२४ पर्यंत तो वाढून ८२ लाख कोटी रुपये झाला. गेल्या दशकात ८.९ टक्क्यांहून अधिक वाढ झाली. यामागे देशाची आर्थिक वाढ आणि वेगाने वाढणारी बुद्धिमान आणि विविध श्रेणीतील ग्राहकांची संख्या आहे. कोरोनाच्या काळात भारताची उपभोगवाढ सारखीच राहिली; परंतु २०२४ ते २०३४ या काळात खपात सर्वाधिक वाढ दिसून येईल.



अहवालात पुढे म्हटले आहे की, भारताचा किरकोळ बाजार मोठा असून वेगाने वाढत आहे. तो २०३४ पर्यंत १९० ट्रिलियन रुपयांपुढे जाण्याची अपेक्षा आहे. भारतातील 'रिटेल कॅलिडोस्कोप' वातावरण अहवालात नमूद करण्यात आले आहे की, भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असली, तरी लोकसंख्येमध्ये अनेक विरोधाभास आहेत. झपाट्याने वाढणारा मध्यमवर्ग, श्रीमंत पण किमतीबाबत जागरूक ग्राहक, डिजिटली जागरूक जनरेशन झेड, ४५ वरील वयोगटातील वाढती लोकसंख्या हे घटक किरकोळ बाजारावर प्रभाव टाकतात. महिला कर्मचाऱ्यांच्या वाढत्या व्याप्तीमुळे खरेदीमागील कारणांनाही नवे स्वरूप प्राप्त होत आहे. हे सर्व मिळून एक असे वातावरण तयार करत आहेत, ज्याला रिटेल कॅलिडोस्कोप म्हणता येईल. त्यात अनेक संधी आहेत; परंतु गुंतागुंत कमी नाही.

दुसरी महत्त्वाची बातमी म्हणजे सरकारने फेब्रुवारी महिन्यात जीएसटीमधून भरपूर कमाई केली आहे. चालू आर्थिक वर्षात सहाव्यांदा १.८० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मासिक जीएसटी संकलन झाले आहे. चालू आर्थिक वर्षाच्या ११ महिन्यांमधील सरकारची कमाई २० लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली आहे.

फेब्रुवारीमध्ये एकूण जीएसटी संकलन ९.१ टक्क्यांनी वाढून सुमारे १.८४ लाख कोटी रुपये झाले. या कालावधीत सकल वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलनांतर्गत देशांतर्गत महसूल १०.२ टक्क्यांनी वाढून १.४२ लाख कोटी रुपये झाला. आयात महसूल ५.४ टक्क्यांनी वाढून ४१ हजार ७०२ कोटी रुपये झाला. आकडेवारीनुसार, केंद्रीय जीएसटीमधून ३५ हजार २०४ कोटी रुपये, राज्य जीएसटीमधून ४३ हजार ७०४ कोटी रुपये, एकात्मिक जीएसटीमधून ९० हजार ८७० कोटी रुपये आणि नुकसानभरपाई उपकरातून १३ हजार ८६८ कोटी रुपये जमा झाले आहेत. फेब्रुवारीमध्ये एकूण २० हजार ८८९ कोटी रुपये परतावा देण्यात आला. फेब्रुवारी २०२५ मध्ये निव्वळ जीएसटी संकलन ८.१ टक्क्यांनी वाढून अंदाजे १.६३ लाख कोटी रुपये झाले. वर्षभरापूर्वी याच महिन्यात एकूण आणि निव्वळ जीएसटी संकलन १.६८ लाख कोटी रुपये होते. चालू आर्थिक वर्षातील हा सहावा महिना आहे, जेव्हा देशाचे जीएसटी संकलन १.८० लाख कोटी रुपयांच्या पुढे गेले आहे. एप्रिलमध्ये जीएसटी संकलन २.१ लाख कोटी रुपये होते. ते आतापर्यंतचे सर्वाधिक आहे. जुलैमध्ये १.८२ लाख कोटी रुपये, ऑक्टोबरमध्ये १.८७ लाख कोटी रुपये, नोव्हेंबरमध्ये १.८२ लाख कोटी रुपये, जानेवारीमध्ये १.९६ लाख कोटी रुपये आणि फेब्रुवारीमध्ये १.८४ लाख कोटी रुपये जीएसटी संकलन झाले. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या व्यावसायिक महिन्यात जीएसटी संकलन १.९० लाख कोटी रुपयांच्या पुढे जाऊ शकते. आर्थिक वर्षाच्या ११ महिन्यांच्या एकूण जीएसटी संकलनाचा विचार केला तर ते २०.१३ लाख कोटी रुपये आहे. तज्ज्ञांच्या मते मार्च महिन्यातील अंदाजे आकडेवारी लक्षात घेता एकूण रक्कम २२ लाख कोटी रुपयांचा आकडा पार करू शकते. विशेष बाब म्हणजे आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात जीएसटी संकलनाचे लक्ष्य २२.६ लाख कोटी रुपये ठेवण्यात आले आहे. सरकारने एक आर्थिक वर्ष आधीच हा आकडा गाठला आहे. तज्ज्ञांच्या मते येत्या आर्थिक वर्षामध्ये जीएसटी संकलनाचा आकडा २५ ते २७ लाख कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतो. भारतावर कोणतेही संकट आले की, देशातील गावे खंबीरपणे उभे राहतात. त्यामुळेच जुलै- सप्टेंबर या तिमाहीमध्ये ५.६ टक्क्यांपर्यंत पोहोचलेला देशाचा जीडीपी विकास दर ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीमध्ये वाढला आणि गावांनी देशाची इभ्रत वाचवत जीडीपी वाढीचा दर ६.२ टक्क्यांवर नेला. गेल्या वर्षीच्या चांगल्या मान्सूनने देशाचा जीडीपी उत्तम राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. खेड्यापाड्यातील लोकांचे उत्पन्न वाढले असतानाच गावांचा खर्चही वाढला आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या आकडेवारीनुसार ग्रामीण वापराने आर्थिक वर्ष २०२४२५ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये जीडीपी वाढ ६.२ टक्क्यांपर्यंत नेण्याचे काम केले आहे.




दरम्यान, सरकारच्या वाढलेल्या खर्चामुळेही अर्थव्यवस्था सांभाळण्यास मदत झाली आहे. तथापि, गेले आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या याच तिमाहीमध्ये देशाच्या जीडीपीच्या ९.५ टक्के वाढीच्या तुलनेत हे प्रमाण खूपच कमी आहे. 'एनएसओ'ने ताज्या अंदाजात म्हटले आहे की, संपूर्ण चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ६.५ टक्के असू शकतो. जानेवारी २०२५ मध्ये 'एनएसओ'ने देशाचा जीडीपी वाढीचा दर ६.४ टक्के असण्याचा अंदाज वर्तवला होता. 'एनएसओ'ने गेल्या आर्थिक वर्षासाठी (२०२३-२४) जीडीपी वाढीचा दरदेखील सुधारला आहे. तो आता ९.२ टक्के झाला आहे. तो पूर्वी ८.२ टक्के होता. सरकारने देशातील आठ प्रमुख उद्योगांमधील वाढीची आकडेवारीही जाहीर केली आहे. जानेवारीमध्ये ८ मूलभूत उद्योगांची वाढ ४.६ टक्के होती.

गेल्या वर्षी जानेवारीमध्ये हा विकास दर ४.२ टक्के होता. तथापि, डिसेंबर २०२४ मधील मुख्य उद्योगांच्या ४.८ टक्के वाढीपेक्षा हे किरकोळ कमी आहे. जानेवारी २०२५ मध्ये देशात कोळसा उत्पादनात ४.६ टक्के, पोलाद उत्पादनात ३.७ टक्के आणि वीज उत्पादनात १.३ टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षी याच महिन्यात या उद्योगांचा विकास दर अनुक्रमे १०.६ टक्के, ९.२ टक्के आणि ५.७ टक्के होता. या कालावधीमध्ये रिफायनरी उत्पादनांच्या उत्पादनात ८.३ टक्के, खतांच्या उत्पादनात तीन टक्के आणि सिमेंट उत्पादनामध्ये १४.५ टक्के वाढ झाली आहे.

चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते जानेवारी या कालावधीमध्ये आठ प्रमुख उद्योगांचा विकास दर ४.४ टक्के होता, तर गेल्या आर्थिक वर्षाच्या याच कालावधीमध्ये हा दर ७.८ टक्के राहिला. देशातील प्रमुख उद्योगांमध्ये कोळसा, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, रिफायनरी उत्पादने, खते, पोलाद, सिमेंट आणि ऊर्जा क्षेत्राचा समावेश आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

**थंडी जवळपास निरोप घेऊन निघून गेलेली असतांना, फार क्वचित वेळी थंडीची झुळूक आपण अजून रिंगणात आहो याची जाणीव करून देत असते. पानांची पडझड थांबलेली असते. भुंड्या झाडातून नवी कोवळी पालवी अंकुरायला सुरुवात झालेली असते. पळसपांगारा, काटेसावरी असे झाडे हिरव्या गर्द पानांनी झाकलेली दिसतात काहीजण तर घाईघाईने लाल केशरी फुले घेऊन सजायला सुरुवात करतात. पळस तर आपला हिरवा पेहराव बाजूला ठेवून भगव्या रंगात आपल्या अस्तित्वाच्या रंगांनी खुलून आलेला असतो. वसंतामध्येही हिरवी शाल टाकून अनेकांनी लाल फुलांची चादर अंगावर ओढलेली असते. माघ महिन्यातील मूढपणा हळूहळू स्वच्छंद प्रवाहित होत आहे. निसर्गाचे रूप हळूहळू पालटत आहे नेमका शिशिर आणि वसंत या दोन्हीची सांगड घालण्याचे काम करणारा फाल्गुन आपले कार्य करू लागलेला आहे.**

# रंगांची उधळण करणारा फाल्गुन



ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

धु मृगजळांचे अस्तित्व मनाला भुलवित जसे लांब लांब घेऊन जाते, तसे फाल्गुनातील लहान मोठी चक्रवात वादळे स्वतःभोवती गिरक्या घेत हळूहळू आपला आनंद व्यक्त करत असतात. चिमण्या, साळुंक्या, पोपट ह्या पाखरांचा प्रणय साकार होऊन त्यांच्या खोप्या मधून पिलांची चिव चिव कानावर पडत आहे.

आजकाल चिमण्या आणि साळुंक्या फार क्वचित दिसतात. मात्र, कधीकाळी चिमण्यांचा थवाचा थवा अंगणात धान्य निवडायला बसलेल्या गृहिणीशी गप्पा मारायला येत असे. त्यातच पिवळ्या पायाची साळुंकी भलती आकर्षक दिसायचे. समप्रमाणात साळुंक्या दिसल्या की काहीतरी चांगले होणार आणि एक तीन पाच अशा विषम संख्येत त्यांचा थवा दिसला की नक्की काहीतरी बिघडणार हा एक समज कधीकाळी आमच्या बालमनात आमच्या मोठ्यानी रुजवून ठेवला होता. आज मात्र एक दिसो की तीन साळुंकी दिसली पाहिजे एवढीच इच्छा मनात असते. लहानपणी पोपटाचे पिल्लू पकडून आणून त्याला पिंजऱ्यात ठेवायचे, त्याच्या जिभेवर जेष्ठमध घासायचे म्हणजे त्याची जीभ पातळ होऊन तो खूप चांगला बोलतो, असाही एक विचार त्याकाळी आमच्या मनावर बिंबलेला होता, तसे छोटे मोठे प्रयोग आम्ही करूनही पाहिले. मात्र चित्रपटात बोलतो तितका सुस्पष्ट असा कोणताही राघू आमच्या ताब्यात असतांना बोलला नाही.

बहुतांश वेळी त्याच्या पिंजऱ्या बाहेर एखादा बोकोबा येऊन बसे त्याची शेपटी धरून त्याला ओढे आणि मग दुसऱ्या दिवशी तो पिंजऱ्यात मरून पडलेला दिसे. पुढे मी नोकरीत लागल्यावर खेड्यात सुरू असलेल्या शिक्षकी पेशामुळे सातवी आठवीतील मुले माझ्या लेकरांसाठी पोपटाची पिल्ले घेऊन येत. मात्र, तीही कधी टिकली नाहीत. नाही म्हणायला लवबर्ड नावाचे रंगीत पक्षी सहा जोड्या आणल्यावर ३० ते ४० पर्यंत त्यांची संख्या झाली. पुढे अचानक असते आठ पंधरा दिवसात एका मागे एक मरून पडले. मात्र त्या पिंजऱ्यात कधीतरी फाल्गुन महिन्यात विजेच्या तारावर ओळीने बसलेल्या पिवळ्या पोटाच्या सुगरणी धरल्या की त्यातील चार दोन सुगरणी आपल्या पिंजऱ्यात खोपा बांधतील का? असा निरर्थक प्रश्न मनात उभा राहतो. घराशेजाऱ्याच्या वड आणि पिंपळाच्या झाडावर राघूंची गर्दी मोठ्या प्रमाणात असते शिवाय वडाच्या झाडावर पानात लपून बसलेली कोकिळा हा तर नेहमीच आकर्षणाचा विषय....!

फाल्गुनात आंब्याला मोहर आलेला असतो आणि फुलचुख्यासारखे काही पक्षी त्या फुलात आपला जीवन रस शोधण्याचे काम करत असतात. दुपारच्या वेळी मोठ्या मोठ्या बिल्डिंगमध्ये मंदिरात पारव्याचे उगाच पंख फडफडत उडणे सुरू असते. फाल्गुनात कधीकाळी स्वच्छ निळ्या आकाशात उंचावर उडणारी घार हे आमच्या आकर्षणाचे स्थळ होते मात्र घार, गरुड असे पक्षी आता सहज कुठे दिसत नाहीत. अगदी काल परवा आग्रा दिल्ली दर्शनासाठी गेल्यावर आग्र्याला ताजमहालाच्या घुमटावर आणि कुतुब मिनारच्या उंचीशी स्पर्धा करणार्या घारी बर्यापैकी आढळून आल्या. गिट्टी खदान नावाच्या मेहकर नजिकच्या एक दोन ठिकाणी खरे तर यांत्रिकीकरणामुळे खडक फोडून तेथील गिट्टी काढता काढता पाणी कसे लागले? आणि कसे जमा झाले? हे कुणाला सांगता येत नसले तरी माझ्यासाठी ते ठिकाण निवांतपणाची जागा आहे. अगदी सकाळी किंवा दुपारच्या उन्हात किंवा संध्याकाळी त्या ठिकाणी गेले की राखडी रंगाची घुबड डौलदारपणे आपल्या डोक्यावरून उडून जाते. अनेकदा घुबड रात्रीच्या वेळी आमच्या घराच्या गच्चीवर येऊन बसते, एक-दोन वेळा मी तिला घरासमोरील नारळाच्या झाडावर आराम करतानाही पाहिले आहे.

फाल्गुनात सकाळ संध्याकाळ बऱ्यापैकी गारवा असला तरी दुपार मात्र उन्हाने स्वतःच्या ताब्यात घेतलेली असते. बहुतांश डोह आपल्या उदरातील पाण्याची दिवाळीखोरी जाहीर करून कोरडे झालेले असतात. नद्या लहान मोठे आचके देत कुठे निवांत पाण्यासह स्तब्ध तर कुठे कोरड्या झालेल्या असतात. पळसाच्या पानावरचा हिरवा साज डोळ्यात भरला की, आमच्या आजीला आईला किंवा शेजारच्या काकू किंवा मावशीला त्यावर कुरडया घालण्याची इच्छा निर्माण होत असे. मग आम्हाला लहान मुलांना गाव वस्तीपासून दूर असलेल्या पळसाच्या झाडाची पाने तोडून आणून देण्याचे काम लागले. ती हिरवी पाने धुवून त्यात तुमच्या दीड चमचा तेल टाकून त्यावर तिळाच्या कुरडया टाकल्या जात. मग पाहता पाहता संपूर्ण वस्तीत वाळवण वाळण्यास घातलेले दिसू लागे. नव्हाळीच्या कुरड्या पापड एकमेकांच्या घरात भाजण्याचे खमंग वास दरवळू लागत. काही गाणी काही उखाणे असा सुंदर मेळा कधीकाळी जमू लागेल. अजूनही काही ग्रामीण भागात हा मेळावा भरतो. मात्र मॉलमध्ये भेटणाऱ्या आयत्या पापड आणि कुरड्यांनी एक जिव्हाळ्याचा महोत्सव कमी झाल्याची जाणीव शहरातील महिलांना नक्कीच होत असेल. उखाण्यावरून आणखी आठवावी अशी फाल्गुन महिन्यातली महत्त्वाची बाब म्हणजे लग्न समारंभात हळद फोडण्याचा कार्यक्रम, गाणी उखाणे म्हणता म्हणता पिवळ्या रंगात माखलेल्या घरंदाज सवाष्णी पाहिल्या की चित्रपटातील बेगडी सौंदर्यवती त्यांच्यापुढे फिक्या वाटू लागतात.

फाल्गुनात बाजारात येणाऱ्या फळांची संख्या रोडावत असली तरी दुकाना दुकानावर द्राक्षाचे घोस लांबूनच आपल्याला मोहात पाडत असतात. लहानपणी हे द्राक्ष खात असताना द्राक्ष आणि कोल्हा ही कथा किती वेळ ऐकली? ते सांगणे कठीणच. मात्र जलाशयातील कमी होत चाललेल्या पाण्यामुळे जंगलातील जवळपास प्राण्यांनी गावा नजीकच्या धरणाकडे आपला मुक्काम हलवलेला दिसतो. रानात आंबा चिंच मोह अशा झाडाखाली गर्द सावली पाहून काही जंगली प्राणी या सावलीत निवांत पहुडलेले दिसतात. त्यांच्या अनेक कहानी आणि किस्से ऐकायला मिळतात. मोहाच्या झाडाखाली वाघ मोहाचे फुले खाऊन गुंगलेला असायचा असे अनेक किस्से अजूनही सांगितले जातात. पण वाघासारखा प्राणी मोहाचे फुले खात झिंगलेल्या दारुड्या सारख्या गुंगून बसत असेल यावर माझा अजूनही विश्वास नाही. मात्र मोहाच्या झाडाखाली ज्ञानगंगा अभयारण्यात अजूनही अस्वल मोहाची फुले वेचून खातात हे अनेकांनी पाहून सांगितले आहे. कधी कधी प्रश्न पडतो की फाल्गुन हा प्रणयाचा महिना म्हणून का ओळखला जात असावा? फाल्गुनातच बहुतांश वेळी फेब्रुवारी महिन्यातील व्हॅलेंटाईन डे येतो आणि तो संदर्भ आणखी गडद होत जातो.

फाल्गुन महिन्यातील महत्त्वाचा उत्सव म्हणजे रंगोत्सव, याला धुलीवंदन असे म्हटले जाते. गोप गोपिकांपासून हा रंग उत्सव आपल्या देशात साजरा केल्याचे सांगितले जाते. एकमेकांना रंग लावणे आणि परस्परातील स्नेहभाव दृढ करणे या संकल्पनेसह फाल्गुनातील उन्हामुळे तापलेल्या सजीव सृष्टीला गार वाटावे म्हणून एकमेकांच्या अंगावर पाण्याचे फवारे उडवणे हा संदर्भ सुद्धा बऱ्यापैकी पटायला लागतो. धुलीवंदन म्हणजे मातीच्या आपल्यावर असलेल्या उपकारामुळे तिचा गौरव करणे असा अर्थ अभिप्रेत असला तरी आजकाल रंगोत्सव सुद्धा एक प्रकारचा इव्हेंट मॅनेजमेंटचा भाग झाला आहे. फाल्गुनात पळसाची फुले तोडून आणून ती भिजायला घालणे त्यापासून नैसर्गिक असा केसरी रंग तयार करणे ह्या सर्व बाबी आता इतिहासजमा झाल्या आहेत. आपण जरी निसर्गाचे ही रंग उधळण दुर्लक्षित केली तरी फाल्गुनात निसर्ग आपली रंगपंचमी पिवळ्या लाल भगव्या फुलातून साजरी करत असतो हे नक्की. होलीका दहन हा ही एक उत्सव फाल्गुनात साजरा केला जातो. खरे म्हणजे पानगळीनंतर जमा झालेला पाचोळा, गोळा करून पेटवावा ऋतूंचे अंगण स्वच्छ करावे असा काहीसा विचार लहानपणी होळीच्या संदर्भात माझ्या मनात असेल. पुढे होलिका, भक्त प्रल्हाद, त्यातून वेगवेगळ्या विचारधारा अशा अनेक बाबी समोर येऊ लागल्या. विश्वी या ठिकाणी नोकरीला असताना बंजारा वस्तीतील होळीचा मी फार जवळून अनुभव घेतला. ती होळी खरोखरच आठवणीत राहणारी ठरली. तसे पंचवीस तीस वर्षांपूर्वी घरोघर जाऊन होळीसाठी लाकडे मागणे, ती जमा करून एरंडाच्या झाडाची डहाळी त्यात उभी करणे, होळीच्या नावाने बोंबा मारणे सकाळी त्या होळीची राख घरी घेऊन येणे.

(पान ६ वर)

पान१ वरून

## अमेरिकेला शिंक आणि जगाला सर्दी

यांच्या मतपेटीवर घाव घातला आहे.

अमेरिकेने युक्रेनला वाऱ्यावर सोडल्यामुळे युरोपमध्येही प्रचंड अस्वस्थता आहे. फ्रान्सने युरोपला स्वतःच्या अण्वस्त्रांचे संरक्षण पुरवण्याची तयारी दाखवली आहे, तर जर्मनीने 'नाटो'च्या धर्तीवर युरोपीय महासंघाची वेगळी रचना करण्याची भूमिका मांडली आहे. ट्रम्प यांच्या समर्थक असलेल्या इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनीही युक्रेनबाबत त्यांच्या भूमिकेला विरोध केला आहे. जी गोष्ट युक्रेनबाबत झाली, ती आपल्याबाबतही होऊ शकते, या भीतीमुळे सिंगापूर आणि तैवानमध्येही अस्वस्थता आहे. त्यामुळे जगाचे राखीव चलन असलेल्या अमेरिकन डॉलरला पर्याय शोधण्याचे प्रयत्न वेग पकडू शकतात. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात महत्त्वाचे बदल करण्याच्या प्रयत्नांना वेग दिला आहे. अमेरिकेच्या दृष्टीने चीन हा सगळ्यात महत्त्वाचा प्रतिस्पर्धी असून, सोव्हिएत रशियापेक्षा त्याचा धोका जास्त आहे. चीन आर्थिक, औद्योगिक आणि लष्करी महासत्ता असल्यामुळे त्याच्याशी स्पर्धा करताना अमेरिकेला आपले सर्वस्व पणाला लावावे लागणार आहे. युरोपीय देशांच्या दृष्टीने रशियाचा धोका अधिक असला, तरी त्यांच्यासाठी अमेरिका स्वतःच्या राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करू शकत नाही. पण, देशाच्या परराष्ट्र तसेच संरक्षण धोरणामध्ये मोठे बदल करताना त्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या परिणामांना जोखणे आवश्यक आहे. या घटनांकडे बघताना अमेरिकेतील डाव्या उदारमतवादी माध्यमांच्या कांगाव्याकडे दुर्लक्ष करणे आवश्यक आहे. ट्रम्प यांचा प्रचंड विजय पचवणे, त्यांच्यासाठी अवघड झाले असून, दररोज ट्रम्प यांची लोकप्रियता किती घसरली आहे, याचा जप केल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. परंतु, या घटनांकडे केवळ कांगावा म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. ट्रम्प यांच्या राजकीय विरोधकांची आर्थिक ताकद प्रचंड मोठी आहे. ज्या 'डीप स्टेट'विरुद्ध ते लढत आहेत, त्याची मुळे अमेरिकेच्या व्यवस्थेत खोलवर रुजली आहेत. ट्रम्प यांना मतदान करणाऱ्यांमध्ये जसे उच्च मध्यमवर्गीय आहेत, तसेच शेतकरी आणि श्रमिकही आहेत. ट्रम्प यांच्या विचारधारेशी जवळीक साधणार्या देशांमध्येही या बदलांमुळे अस्वस्थता आहे. भारतासारख्या १४० कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या देशासाठी जागतिक स्तरावर स्थैर्य असणे महत्त्वाचे आहे. त्यावर थेट परकीय गुंतवणूक, परदेशात स्थित भारतीयांकडून येणारी परताव्याची रक्कम, इंधनाचे भाव आणि महागाई दरही अवलंबून असतो. त्यामुळे अमेरिकेत ट्रम्प सरकारच्या ध्येय-धोरणांमध्ये स्थैर्य यावे, यासाठी भारतानेही प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## चैतन्याची अद्भुत खाण!

या सर्वांच्या पल्याडची त्यांची अजून एक ओळख म्हणजे, त्यांनी आयुष्यभर साधलेली आत्मविलोपी अध्यात्म साधना. कै. विमलाजी ठकार आणि स्वामी माधवनाथ, या दोघांचाही अनुग्रह त्यांना लाभला होता. 'अहंकाराचा वारा न लागो राजसा' म्हणजे काय, हे लताताईंच्या सहवासातल्या प्रत्येकाला कोणत्याही औपचारिक शब्दांशिवायच उमगले असणार, यात शंका नाही! परमात्म्याचा अंश प्रत्येकाच्या स्वरूपात आहे, हे सत्य सहवासात येणाऱ्या प्रत्येकाशी, त्यांच्या होणार्या वर्तनातून सहजपणे प्रतिबिंबित होताना आम्ही पुन्हा पुन्हा अनुभवले आहे. 'मृत्यू' या विषयावरीलही त्यांचे चिंतन दीर्घकाळ चालू असणार असेच वाटते.

सुमारे २५ वर्षांपूर्वी काहीशा धाडसाने त्यांना मी एक प्रश्न विचारला होता, माणसाचे अस्तित्व शरीराशिवाय वेगळे असते का? याबद्दल तुम्हाला काय वाटते? पुस्तकातील उत्तरे मला माहीत आहेत. पण, तुमचा अनुभव असेल तर तसे सांगा. आजही त्यांचे खणखणीत शब्द मला स्पष्ट आठवतात. त्या म्हणाल्या होत्या, होय. मी असा अनुभव घेतलेला आहे. त्यामुळे मी हे विश्वासाने सांगू शकते की, शरीर हे माणसाचे खरे अस्तित्व नाही. त्यानंतर त्याविषयी कोणतीही शंका माझ्या मनात उद्भवली नाही. गेली दीड वर्षे ज्या दुर्धर आजाराचा सहवास त्यांना लाभला, त्यालाही त्यांनी स्नेहभावाने कसे आपलेसे केले, हे त्यामुळे आता उमगते. अत्यंत समत्वचित्ताने स्वतःच्या निर्वाणानंतर काय करायचे याचे टिपण स्वःहस्ताक्षरात करून, पूर्ण तयारीनिशी या अनुभवाला त्या सज्ज झाल्या होत्या.

हे केवळ कल्पनेपलीकडील वास्तव आहे. अशा लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाला लौकिक जीवनात जे अनेक पुरस्कार मिळाले, त्याच्या कितीतरी पलीकडे आणि उंचावर असे स्थान त्यांना ओळखणाऱ्या, किंचित सहवासही लाभलेल्या किंवा त्यांच्याविषयी फक्त ऐकलेल्या हजारो-हजारो लोकांच्या हृदयात मिळालेले आहे. त्यांच्या कर्मयोगाचा आणि आत्मविलोपी वृत्तीचा वारसा जमेल तसा पुढे नेणे, हेच खरे तर त्यांचे पुण्यस्मरण आहे. लताताईंच्या स्मृतीस अभिवादन!

(लेखिका ज्ञान प्रबोधिनीच्या युवती कार्यकर्ती आहेत.)

## समृद्धीचे अर्थसोपान

सरकारने आर्थिक वाढीचा अपेक्षित दर, चलनवाढीचा दर आणि बेरोजगारीचा दर यांसारख्या घटकांचा अंदाज घेतला असून, त्या आधारे आर्थिक धोरण निश्चित केले आहे, असे म्हणता येते. या तरतुदींच्या दीर्घकालीन परिणामांचा विचार करणे, अत्यंत महत्त्वाचे आहे. मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी म्हणून जगात सर्वत्र ओळखली जाते. बँकिंग, वित्त, माहिती तंत्रज्ञान, मनोरंजन आणि पर्यटन यांसारख्या सेवा क्षेत्रातील उद्योगांचा, यात लक्षणीय वाटा आहे. या क्षेत्रातील वाढ आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूक यामुळे, अर्थव्यवस्थेत वाढ होण्याला चालना मिळते. केवळ मुंबई शहराचा नव्हे, तर संपूर्ण प्रदेशाचा विकास करण्याचे धोरण म्हणूनच सरकारने आखले आहे.

मुंबई एक महत्त्वाचे व्यापार आणि वाणिज्य केंद्र असून, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणुकीत वाढ झाल्यास अर्थव्यवस्थेचा वेग वाढू शकतो, या दृष्टीने सरकारने विशेष योजना हाती घेतलेली दिसून येते. आर्थिक वाढ आणि त्यातून रोजगार निर्मिती, हे सरकारचे मुख्य लक्ष्य असल्याचे स्पष्ट होते. तसेच, नवीन औद्योगिक धोरण राज्यात ४० लाख कोटींची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवणारे आहे. त्यातूनच, येणार्या काळात महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य म्हणून, स्वतःचा लौकिक कायम ठेवेल. मुंबईतील पायाभूत सुविधांसाठी करण्यात आलेली उच्चांकी तरतूद, मुंबई महानगराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी ठरणार आहे. वाढवण बंदर हे राज्याच्या आर्थिक विकासात लक्षणीय योगदान देणारे असून, त्यासाठीच या बंदरावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. कृषी क्षेत्रासाठीही भरीव तरतूद करण्यात आली असून, 'एआय'चा वापरही क्रांतीकारी ठरेल, असे म्हणता येईल. लाडक्या बहिणींचे योगदान लक्षात घेता, महायुती सरकारने त्यांच्याप्रति कृतज्ञता ठेवलेली दिसून येते. विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून, महिलांना सक्षम करण्यावर सरकारने भर दिला आहे. कूणच रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा, अक्षय ऊर्जा आणि महिला कल्याण यावर लक्ष केंद्रित करणारा हा अर्थसंकल्प असून, तो महाराष्ट्राची आर्थिक स्थिती मजबूत करणारा आहे. तसेच, जनतेचे जीवनमान आमूलाग्र बदलणारा आहे, हे निश्चित.

समाजभान

महेश रायखेलकर

छावा चित्रपट सर्वत्र गाजतोय. कधी नव्हे ते चित्रपटगृह परत एकदा प्रेक्षकांनी तुडूंब भरलेली आहेत. त्याला कारण ही तसेच आहे. या चित्रपटात सर्वांचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुत्राची म्हणजेच शुरवीर छत्रपती संभाजी महाराजांची कहाणी. त्यांच्या बलिदानाची कहाणी. विकी कौशल याने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका नुसती केली नाही तर भूमिका जगणे म्हणजे काय हे त्याच्या अभिनयातून त्याने दाखवून दिले आहे. औरंगजेबाच्या भूमिकेत अक्षय खन्ना जबरदस्तच. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर ज्यांनी एवढा उत्कृष्ट चित्रपट बनविला ते अभिनंदनास पात्र आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे निर्माण केलेले स्वराज्य जिथे सर्व जाती धर्माची माणसे सुखाने, आनंदाने राहू शकतील. स्त्रियांचा सन्मान केला जाईल. जाती-धर्माला कोणतीही हानी पोहोचणार नाही. त्यांचाच वसा घेतलेला त्यांचा छावा छत्रपती संभाजी महाराज स्वराज्याची धुरा मोठया हिंमतीने गनिमाशी मूख्यत्वे औरंगजेबाची दोन हात करत सांभाळत असतात. दुर्दैवाने फितुरीमुळे त्यांना कैद होते आणि शेवटी स्वराज्यासाठी, धर्मासाठी अत्यंत्य हालअपेष्टा, छळ सोसत वीरतेचे प्रतीक होत ते आपल्या प्राणाची आहुती देतात. केवढा मोठा हा त्याग,

# 'या' ऊर्जेचे करायचे काय?



केवढे मोठे हे शौर्य. शेवटचा प्रसंग पाहतांना प्रेक्षक भावनाशील होतात. हा चित्रपट छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम, स्वराज्याप्रती असलेली त्यांची निष्ठा, त्यांचे बलिदान यातुन एक नवीन ऊर्जा निर्माण करतो. पण या ऊर्जेचे नेमके करायचे काय? काय आपण फक्त चित्रपट पाहण्यापुरते स्वतःला मर्यादित ठेवणार आहोत? छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांनी स्वराज्य मोठया कष्टातून त्यागातून निर्माण केलेले आहे याची जाणीव आपण पावलोपावली ठेवणे आवश्यक आहे.

सुमारे दीडशे वर्ष आपला देश पारतंत्र्यात होता. इंग्रजांच्या जुलुमी राजवटीला येथील जनता पुरती विटली होती. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या घराची, आपल्या प्राणांची राखरांगोळी केली. त्यांच्या त्यागातून आज हे सुंदर स्वातंत्र्य आपण उपभोगत आहोत याची जाणीव सदैव ठेवणे आवश्यक आहे. कोणती प्रेरणा असेल यांच्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागात नक्कीच छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणा प्रताप बाकीचे ऐतहासिक महापुरुष. ऐन तारुण्यात हसत हसत स्वातंत्र्यासाठी फासावर जाणारे भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या मागे कोणती प्रेरणा असेल? कोणत्या प्रेरणेतून नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची उभारणी केली असेल. काळ्या पाण्याची शिक्षा भोगतांना सावकरांना कोण प्रेरित करत असेल. असे अनेक जण आहेत ज्यांनी आपले सर्वस्व अर्पण केले फक्त आणि फक्त देशासाठी, देशाला इंग्रज राजवटीतून मुक्त करण्यासाठी. आज आपण स्वतंत्र्य आहोत. लोकशाही मानणारा देश म्हणून जगात आपल्याला मान आहे. अनेक क्षेत्रात जगात आपण नाव कमावले आहे. पण हे सर्व नक्कीच एकदम झालेले नाही. यासाठी अनेक जण अक्षरशः खपले आहेत. या सर्वात आपली भूमिका नेमकी काय? हे समजून घेणे गरजेचे आहे. नागरिक म्हणून आपण आपले हक्क तर मोठ्या दिमाखात मागतो मग कर्तव्याचे काय? त्या बाबतीत आपण एवढे निरुत्साही का? महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतीथ्या, मिरवणुका एवढ्या पुरते आपण स्वतःला बांधून घेतले आहे. त्यांनी घालून दिलेले आदर्श आचरणात आणण्यास आपण कुठेतरी कमी पडत आहोत असे खेदाने म्हणावे लागेल.

आजही सार्वजनिक स्वच्छते बाबत आपण कमी पडत आहोत. सार्वजनिक शिस्त पाळण्याबाबतीत आपण उदासीन आहोत. कितीही प्रयन्त केले तरी मतदान जे की आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे त्याची टक्केवारी वाढत नाही. पाश्चात संस्कृतीचा अनुसरण करत आपल्या संस्कृतीचा र्हास आपण आज उघड्या डोळ्याने पहात आहोत. अभिव्यक्ती स्वातंत्र्याखाली आम्हाला कसे व्यक्त व्हावे याचे तारतम्य राहिले नाही. जाती-धर्मातील दरी वाढविण्यात आम्ही स्वतःला धन्य मानत आहोत. सरकारी नियम कसे धाब्यावर बसवता येतील यांच्याकडे आमचा जास्तीचा कल असतो. मी आणि माझे कुटूंब आणि त्यांचे सुख अशी चौकट आम्ही घातलेली आहे. शिव्या देत स्त्रियांचा अनादर आम्ही पावलोपावली करत आहोत. हे सर्व जर टाळायचे असेल तर हक्कासोबत आपली कर्तव्ये काटेकोरपणे बजवावी लागतील.


चित्रपटातून मिळालेली ऊर्जा समाजाच्या विधायक कामासाठी खर्च करावी लागेल. देश आमच्यासाठी काय करतोय यापेक्षा आम्ही देशासाठी काय करू शकतो हे पहावे लागेल. सरकार सर्वकाही करेल असे म्हणून चालणार नाही. समाजासमोर असलेल्या समस्या आपण सोडवू शकतो का याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. आपल्याकडे असलेली जबाबदारी मग ती सरकारी किंवा खाजगी नोकरी असू, व्यवसाय असू काटेकोरपणे बजावली ती देखील मोठी देशसेवा होऊ शकते. शांतिप्रय, मजबूत, बळकट साऱ्या जगाला दिशा दाखविणारा विश्वगुरू भारत बनण्यासाठी आम्हाला चहुबाजूने प्रयन्त करावे लागतील. असा सर्वश्रेष्ठ भारत बनविणे हीच खरी आपल्या छावाला दिलेली आदरांजली असेल.

**संस्कृत साहित्यात एकसे एक थोर नाटककार झाले, त्यामध्ये 'कालिदास' हा सर्वाधिक लोकप्रिय व सर्वश्रेष्ठ मानला जातो म्हणून त्याचा 'कवीकुलगुरू' असाही गौरव केला जातो. कालिदास हे संस्कृत साहित्याला पडलेले सुरम्य स्वप्न आहे. त्याच्या उपमांना विश्वसाहित्यातही तोड नाही. कवी कालिदासाचा काळ, स्थळ, जन्म आणि तो कोणत्या राजदरबारात होता यावर अनेक वाद आहे पण त्याच्या साहित्यकृती हाच त्याचा खरा परिचय आहे. तीन अभिजात नाटके, २ महाकाव्ये आणि २ खंडकाव्ये साहित्यकृती हाच त्याचा खरा परिचय आहे. तीन अभिजात नाटके, २ महाकाव्ये आणि २ खंडकाव्ये साहित्यकृती हाच त्याचा खरा परिचय आहे. तीन अभिजात नाटके, २ महाकाव्ये आणि २ खंडकाव्ये असे विपुल साहित्य त्याच्या श्रेष्ठतेची अक्षरलेणी आहेत. 'रघुवंश' महाकाव्यात त्याने केवळ रामाचेच नव्हे तर रघुवंशातील २९ राजांचे वर्णन केलेले आहे. १९ सगारचे हे महाकाव्य सूर्यवंशीय रघुकुलाच्या महानतेचे गुणसंकीर्तन आहे.**

लेखांक ६२

# कवीकुलगुरू कालिदासाचे 'रघुवंश'

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५




संस्कृत साहित्याने भारतवर्षाला जे महान साहित्यिक दिले. त्यामध्ये आदिकवी वाल्मिकी, व्यासांप्रमाणेच नाटककार कवीकुलगुरू 'कालिदास' एक जगविख्यात महाकवी आहे. संस्कृत साहित्यविश्वाला पडलेले सुरम्य सुंदर स्वप्न म्हणजे कालिदास! असा त्याचा केलेला गुणगौरव सार्थ व समर्पक आहे.

संस्कृत अभिजात साहित्यात 'पंचमहाकाव्यम' म्हणून ज्या काव्यग्रंथांना सर्वोच्च सन्मान- दर्जा दिला जातो. त्या पंचमहाकाव्यात कवीकुलगुरू कालिदासकृत 'रघुवंश' आणि 'कुमारसंभव' अशा दोन महाकाव्यांचा समावेश आहे, हे कालिदासांच्या परमोच्च स्थानाचे व श्रेष्ठतेचे दर्शन आहे.

कालिदासाच्या साहित्यिक गुणसमुच्चयातील 'उपमा' जगविख्यात आहेत. म्हणून 'उपमा कालिदासस्य' असाही त्याचा गौरव साहित्यविश्वात अजरामर आहे.

**अनेक मतमतांतरे :-**

भारतातील अनेक ऋषि, संत, थोर साहित्यिक याच्याप्रमाणेच कवी कालिदासाची ठोस, सबळ आधाराधिष्ठित माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे कालिदासाचा जन्म, गाव, काळ या साऱ्या गोष्टी वादग्रस्त आहेत. काहींच्या मते तो उज्जैनी (मध्य भारत) येथील असावा. राजा विक्रमादित्याच्या इसवीसन पूर्व काळात तो राजकवी होता. पण काहींच्या मते तो ४ थ्या शतकात गुप्त घराण्यातील समुद्रगुप्त- चंद्रगुप्त यांच्या दरबारात राजकवी होता.

काहींच्या मते तो कालीमातेचा उपासक होता म्हणून त्याने 'कालिदास' नाव धारण केले होते, तर काहींच्या मते तो कट्टर शिवभे होता. उज्जैनी येथील एका शिवमंदिरातील शिवाचे नाव 'कालिन' आहे, शिवभे दास या अर्थाने 'कालिदास' नाव पडले असावे. त्यांच्या साहित्यातील विशेषत...

मेघदूतमधील वर्णनावरून काही अभ्यासक त्याला महाराष्टातील रामटेक येथे तो रहात असावा असेही म्हणतात. सध्या तेथे (रामटेक) कालिदास विद्यापीठ, स्मारक आहे. काही अभ्यासक सम्राट विक्रमादित्याची कन्या 'विद्योत्तमा' ही त्याची पत्नी आणि गुरू होती असेही म्हणतात. खरतर हा एकूण भारतीय सनातन परंपरेतील विचाराचाच परिपाक आहे की बहुतेक कवी, संत, चिंतक यांनी खूप काही ग्रंथलेखन केले पण स्वत...बद्दल न लिहिण्यातच धन्यता मानली.

आत्मलोपी वृत्तीने ईश्वराची उपासना- केली म्हणून त्यांनी हे अक्षरवाङःमय निर्माण केले व त्याचे श्रेय ईश्वरी कृपेला देऊन स्वतःला निमित्तमात्र मानले. त्यावेळी हा आत्मलोपीपणा सदगुण असेलही पण आता त्यामुळे अभ्यासकांना त्या थोर महापुरुष साहित्यिकाबद्दल नेमकेपणाने साधार काहीही सांगता येत नाही ही अडचण आहे. असो!

कवी कालिदासांच्या नावावर अधिकृत-विनावाद ज्या साहित्यकृती सर्वमान्य झाल्या आहहेत त्यामध्ये एकूण ७ साहित्यकृती अजरामर झालेल्या आहेत. कालिदासाची ही 'अक्षर सप्तपदीच' आहे. या सात साहित्यकृतींमध्ये 'अभिज्ञान शाकुंतल', 'विक्रमोवरशीयम' आणि 'मालविका मित्र' अशी तीन अभिजात नाट्यकृती आहेत. तसेच 'रघुवंश', आणि 'कुमारसंभव' ही दोन महाकाव्ये आहेत आणि 'मेघदूत', 'ऋतुसंहार' ही दोन खंडकाव्ये आहेत.

**'रघुवंश' महाकाव्याचे विशेषत्वः-**

'रघुवंश' हे कालिदासाचे महाकाव्य श्रीरामाच्या सूर्यवंशी रघुकुलातील राजांची दिव्य जीवनगाथा आहे. आपल्या इतिहासात अनेक मोठमोठी राजघराणी होऊन गेली आहेत. त्यापैकी 'श्रीरामांचे' सूर्यवंशीय रघुवंश घराणे आणि श्रीकृष्णाचे चंद्रवंशीय यदुकुल घराणे हे राजवंश विशेष प्रसिद्ध आहेत. 'रघुकुल रीत सदा चली आयी। प्राण जाय पर बचन न जायी।' अशा सत्याधिष्ठित जीवनमूल्यावर रघुकुलातील राजांची जीवने समर्पित होती. 'रघुवंश' या महाकाव्यात १९ सर्ग आहेत. त्यामध्ये रघुवंशातील ख्यातनाम अशा २९ राजांची जीवनचरित्रे समाविष्ट आहेत. त्यामध्ये राजा दिलीप, राजा रघु, राजा अज, राजा दशरथ आणि राजा राम हे पाच प्रमुख आहेत. त्याशिवाय रामानंतरचे लव, कुश आणि उत्तरकालिन काही राजे यांचाही कालिदासाने समावेश केलेला आहे. रघुवंशाचा प्रारंभ राजा दिलीप पासून होता आणि शेवटचा राजा अग्निवर्ण यांच्या मनमानी-विलासी राजवटीने या महान रघुवंशाचा शोकात्मिक अंत होतो. या राजांचे तपस्वी जीवन, या राजाचा पराक्रम, राजधर्म, परोपकारी-सेवा समर्पित वृत्ती, सत्यनिष्ठा, भूतदया अशा मानवी जीवनातील श्रेष्ठ मूल्याचे दर्शन तसेच अध...पतन आणि अंत याची बहुविध रसांनी रसरसलेली गाथा कालिदासाने रघुवंशातून अक्षरांकित केलेली आहे.

**वागर्थाविव सम्पृक्त्कौ वागर्थप्रतिपत्तये ।**
**जगत... पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरी ।।**

रघुवंशाचा आरंभ कालिदासाने शिवपार्वती वंदनेने केलेला आहे. एकूण १५६४ श्लोक-छंद असलेल्या १९ सर्गात्मक या महाकाव्यातील पहिले १ ते ९ सर्ग, हे श्रीरामाचे पूर्वज राजा दिलीप, राजा रघु, राजा अज आणि राजा दशरथ यांची जीवनगाथा कथन करणारे आहेत.

त्यानंतर सर्ग १० ते सर्ग १० ते सर्ग १० ते १५ असे सलग ६ सर्ग एकट्या प्रभु रामचंद्राची परम पुरुषार्थी रामायण कहाणी आहे. श्रीरामाला ६ सर्ग देऊन कालिदास हे महाकाव्य प्रामुख्याने रामकथाच आहे हे दर्शवितो. सर्ग ९ मध्ये दशरथाचे हातून श्रावणबाळ वधाचा प्रसंग येतो आणि सर्ग १० मध्ये श्रीरामाचा विष्णुचा अवतार म्हणून जन्म होतो हा कथाभाग मुख्य आहे. सर्ग ११ मध्ये सीता स्वयंवर आदी कथाभाग, सर्ग १२ मध्ये रामाचा वनवास, सीता अपहरण आणि थेट राम-रावण युद्ध इतका मोठा कथाभाग आहे. सर्ग १३ मध्ये लंकेहून राम सीताचे पुष्पक विमानाने अयोध्या आगमन. सर्ग १४ मध्ये रामाचा राज्याभिषेक, सीता डोहाळे, सीता त्याग असा कथा भाग आहे. सर्ग १५ मध्ये लवकुश जन्म, सीता भूमीप्रवेश, श्रीरामाची अवतार समाप्ति ने हा सर्ग समाप्त होतो. थोडक्यात कविकुलगुरू कालिदासाचे 'रघुवंश' संस्कृत महाकाव्यातील 'गौरीशंकर' शिखर आहे.




प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते असं म्हणतात. ती स्त्री त्याची आई, बहीण, पत्नी, कन्या, त्याची मैत्रीण कोणीही असू शकते. तसेच काही यशस्वी स्त्रियांच्या मागे एक पुरुष असतो. तो तिचा पिता, बंधू, पती, पुत्र, मित्र कुणीही असू शकतो.

भारतातील पहिली स्त्री डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या पाठीशी त्यांचे पती गोपाळराव जोशी खंबीरपणे उभे राहिले. आपली पत्नी डॉक्टर व्हावी, ही गोपाळरावांची इच्छा होती. आनंदीबाईंशी विवाह झाल्यानंतर त्यांनी आनंदीबाईंना अक्षर ओळख करून देण्यापासून तर वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्लंडला पाठवण्यापर्यंत ते पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. आनंदीबाई डॉक्टर होऊन इंग्लंडहून परतल्या, पण त्यांचे क्षयाने निधन झाले.

डॉ. आनंदीबाईंना प्रॅक्टिस करता आली नाही; मात्र त्यांच्या समकालीन रखमाबाई राऊत या डॉक्टर झाल्या. रखमाबाई राऊत यांनी बरीच वर्षे प्रॅक्टिस केली. रखमाबाईंच्या शिक्षणाच्या प्रवासात त्यांना साथ लाभली ती त्यांच्या वडिलांची. सखाराम अर्जुन हे रखमाबाईचे सावत्र वडील. त्यांनी रखमाबाईंच्या शिक्षणाला नेहमीच प्रोत्साहन दिले. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणातील मोलाचे योगदान सर्वविदित आहे. रमाबाई रानडे यांना शिक्षित केले ते त्यांचे पती न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी. न्या. रानडेंनी रमाबाईंच्या शिक्षणाचा पाया घातला आणि सेवासदनच्या रूपाने रमाबाईंनी त्यावर कळस चढविला.

लक्ष्मीबाई टिळकांना अक्षर ओळख करून देण्यापासून तर त्यांना लिहिते करण्याचे व्रत लक्ष्मीबाईंचे पती कवी नारायण वामन टिळक यांनी घेतले अन् पार पाडले. लक्ष्मीबाईंच्या लेखनात मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक होते बालकवी म्हणजे त्र्यंबक बापुजी ठोंबरे. लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' हे आत्मचरित्र प्रत्येकाने जरूर वाचायला पाहिजे. स्त्रियांच्या माणूस म्हणून जगण्याच्या मार्गातील अडथळे पुरुषांनी दूर केले. सतीची चाल बंद करण्यासाठी लढा दिला तो राजा राममोहन राय यांनी.

गरोदरपण-बाळंतपण या चक्रातून वरचेवर जावे लागणाऱ्या स्त्रियांना त्या चक्रातून सोडविण्यासाठी र. धों. कर्वे पुढे झाले. संतती नियमनाचा प्रचार-प्रसार त्यांनी केला. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला स्त्रिया लिहायला लागल्या. त्यांचं लेखन शिवराम महादेव परांजपे यांनी त्यांच्या वर्तमानपत्रात छापले. ताराबाई शिंदे यांनी स्त्री-पुरुष तुलना हा सडेतोड निबंध लिहून सगळ्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. बापुजी हरी शिंदे हे त्यांचे वडील ते महात्मा फुले यांचे सहकारी होते. बापुजी शिंदे यांनी ताराबाईंना खंबीर पाठबळ दिलं. पुरुषांनी स्त्रियांच्या प्रगतीसाठी पुढाकार घेतला; मात्र स्त्रियांनीच स्त्रियांना मागे ओढत तिला रूढी-परंपरांच्या वरवंट्याखाली भरडून टाकले.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी स्त्रीला शिक्षणाचे दार बंद होते. घरातील स्त्री शिकली तर वंशांचा नाश होतो, हा तत्कालीन स्त्रियांचा समज होता. या गैरसमजापोटी शिकण्याची इच्छा असलेल्या, शिकणाऱ्या स्त्रियांचा घरातील सासू- नणंद- जावा या स्त्री वर्गांनी अतोनात छळ केला. डॉ. आनंदीबाई जोशींच्या शिक्षणासाठी त्यांचे पती गोपाळराव यांचा पाठिंबा होता; नव्हे त्यांचाच पुढाकार होता, पण आनंदीबाईंच्या सासरच्या स्त्रीवर्गाने त्यांना अतिशय छळले. तत्कालीन स्त्रियांवर रूढींचा जबरदस्त पगडा होता.

एका बाजूला पुरुष स्त्रियांच्या बाजूने लढा देत होते. तिच्या प्रगतीच्या वाटा मोकळ्या करीत होते; त्याचवेळी स्त्रियाच स्त्रियांच्या मार्गात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होत्या. हा विरोध किती पराकोटीचा होता याबद्दल कुठेतरी वाचलेल्या लेखातला काही मजकूर मला आठवतोएका महानगरात बाहुलीचा हौद होता. या हौदासमोर एका डॉक्टरांचा वाडा होता. या डॉक्टरांना त्यांच्या एकुलत्या एक मुलीला शिकवण्याची इच्छा होती. मुलीचं नाव बाहुली. अर्थात बाहुलीच्या शिक्षणाला घरातल्या स्त्रियांचा कडाडून विरोध होता.

बाहुलीच्या वडिलांनी त्या विरोधाला जुमानलं नाही. बाहुलीचं शिक्षण सुरू ठेवलं म्हणून घरातल्या स्त्रियांनी बाहुलीला जेवणातून कुटलेल्या काचा खाऊ घातल्या. त्यात ती वारली. तो हौद 'बाहुलीचा हौद' म्हणून प्रसिद्ध झाला. इतका पराकोटीचा शिक्षणद्वेष असलेल्या काळात काही समाजसुधारक पुरुषांनी पुढे होऊन स्त्रीला रूढी-परंपरांच्या जोखडातून मुक्त करून तिला शिक्षणाच्या पर्यायाने प्रगतीचा मार्ग दाखवला. स्त्रीला मुक्तीचा मार्ग दाखवला तो पुरुषांनी आणि स्त्रीला परंपरांच्या अंधारात लोटण्याचं काम केलं ते स्त्रियांनी. नाही म्हणायला पंडिता रमाबाई यशोदाबाई कानिटकर यांनी स्त्रियांना त्या अंधारातून बाहेर काढण्याचे प्रयत्न केले. स्त्री शिकली. उंबरठ्याबाहेर गेली. अर्थार्जन करायला लागली. ती इंजिनीअर झाली. डॉक्टर झाली.

सुनीता विलियम्स होऊन तिने अवकाशात झेप घेतली. पुरुषांची म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सर्व क्षेत्रात तिने प्रवेश केला. ती किरण बेदी झाली. ती मल्लेश्वरी झाली. मी सविता पुनिया झाली. ती इंदिरा गांधी, सुषमा स्वराज झाली. ती तुरुंगाधिकारी झाली. तिने ट्रेन चालवली. ट्रक चालविला, देश चालविला. वैद्यकीय क्षेत्रात तिचा ठसा तिने उमटवला. कधी पुरुषप्रधान समाजाला बरोबर घेऊन तर कधी त्या समाजाला न जुमानता ती पुढे जात राहिली. तिची घोडदौड सुरू झाली. समाजात तिचं स्थान पक्कं झालं. स्त्रियांनी स्वत:च्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला. तिच्यासाठी शिक्षणाची सर्व क्षेत्रे खुली झाली आहेत. त्या क्षेत्रांमध्ये तिने यशस्वी उड्डाण केले. ती उच्चशिक्षित झाली. चूल आणि मूल एवढ्ययापुरतंच तिचं कर्तृत्व मानणाऱ्या पुरुषांच्या पुढे ती निघून गेली.


समाजाच्या धारणा बदलत गेल्या. बाई म्हणजे पायातील वहाण अशी विचारसरणी असलेल्या समाजाला मागे सारून स्त्री ही सहचारिणी असते, असा नवा विचार रुजवणारा पुरुष वर्ग पुढे आला. आजचा तरुण आपल्या पत्नीला पायातील वहाण समजत नाही. तो तिला आपली लाईफ पार्टनर समजतो. तसा वागतो. स्वयंपाकघरात तिला कामात मदत करतो. त्यांच्या बाळांची नॅपी बदलण्यापासून तर बाळाला झोपवण्यापर्यंत सगळे करतो. आपली बापाची भूमिका व्यवस्थित पार पाडतो. तिच्या कष्टाची त्याला जाणीव आहे. सरसकट सगळेच तरुण असे असतील असे नाही; यातही काही अजूनही सरंजामी वृत्तीचे तरुण आहेत तसेच स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार समजणाऱ्या तरुणीही आहेत. १८ व्या-१९ व्या शतकात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तिला न्याय मिळवून देण्यासाठी पुरुष पुढे आले. आज २१ व्या शतकात काळाने कूस बदलली आहे. माजघर-शेजघर एवढेच तिचं कार्यक्षेत्र राहिलेलं नाही. तिच्या कार्यक्षेत्रात तिचं कर्तृत्व मान्य करणारा तिला प्रोत्साहन देणारा आजचा तरुण आहे. चूल आणि मूल ही क्षेत्रं त्यानं आपलीशी केली आहे.

(पान ६ वर)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग ३८)




शब्दांचा चित्रकार असलेल्या रवींद्रनाथांना आपण खरेखुरे रेषांचा चित्रकार व्हावे, असे प्रकर्षाने वाटू लागले. कारण त्यांच्यातील कलावंत एवढा मोठा होता की केवळ शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होणे त्याला कुठेतरी अपूर्ण वाटत होते आणि त्यातूनच चित्रकार रवींद्रनाथांचा जन्म झाला असे म्हणावे लागेल. वयाच्या ६५ व्या वर्षी त्यांनी चित्रकलेच्या आराधनेला सुरुवात केली आणि नंतर त्यात कोणालाही तोंडात बोट घालायला लावेल एवढे प्राविण्य प्राप्त केले. यावरून आपल्या हे लक्षात येते की चित्रकलेचे औपचारिक शिक्षण घेण्याचे त्यांचे वय निघून गेले होते. आपल्याला कोणतीही नवीन गोष्ट शिकायची असेल तर वयाचे बंधन कधीही आडवे येत नाही. कोणत्याही वयात एखादी नवीन गोष्ट शिकण्याची सुरुवात आपण करू शकतो हेच रवींद्रनाथांच्या या उदाहरणावरून दिसते.

चित्रकलेसाठी लागणारे वातावरण खरंतर त्यांच्या घरात पूर्वीपासूनच होते. त्यांचे मोठे बंधू ज्योतीरिंद्रनाथ हे उत्तम चित्रकार होते. तसेच त्यांच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान असलेले अवनींद्रनाथ यांनी बेंगॉल स्कूल ऑफ आर्टची स्थापना केली होती. त्यांची ही शाळा रवींद्रनाथांच्या निवासस्थानाच्या परिसरातच होती. अवनींद्रनाथांचा स्टुडिओ हा विविध चित्रकारांचे एक आकर्षणाचे केंद्र होता. अनेक देशी-विदेशी चित्रकार या स्टुडिओला भेट देत असत. पण तरीही त्यावेळी चित्रकला हा विषय रवींद्रनथांना आकर्षित करू शकला नाही. त्याचे कारण म्हणजे रवींद्रनाथ साहित्य लेखनामध्ये गुंतले होते. त्यामुळेच वयाची साठी उलटल्यानंतर त्यांच्यातील कलाकाराला चित्रकलेच्या माध्यमातून व्यक्त व्हावे असे वाटू लागले. ते मोठ्या ओढीने चित्रकलेकडे जरी वळले तरी साहित्य निर्मितीकडे त्यांचे दुर्लक्ष झाले नाही. पण त्यानंतर झाले एवढेच की साहित्य निर्मिती हे त्यांचे एकमेव आकर्षण राहिले नाही. त्यांच्या चित्रकलेचा हळूहळू विकास होत गेला आणि त्यांचे चित्त वेधून घेणारे ते एक महत्त्वाचे माध्यम ठरले. त्यांनी चित्रकलेचे औपचारिक शिक्षण घेतले नव्हते. या गोष्टीचा तसा त्यांना फायदाच झाला कारण त्यांना आपल्या मनाने ह्या कलेचा विकास करण्यासाठी नवनवीन प्रयोग करता आले. त्यासाठी त्यांच्यावर कोणतेही बंधन नव्हते. परंपरेला चिकटून राहण्याची आवश्यकता नव्हती. त्यांच्या चित्रात जे वेगळेपण दिसते त्याचे कारण त्यांनी आपल्या चित्रकलेत पारंपारिक दृष्टिकोन अवलंबला नाही हे असावे.

आपल्या साहित्य लेखनात दुरुस्ती करण्यासाठी किंवा नको असलेला भाग दर्शविण्यासाठी रवींद्रनाथ लहानपणी निळ्या रंगाच्या पेन्सिलचा वापर करीत असत. १९२४ पासून आपल्या लेखनातील अशा चुकांच्या दुरुस्त्यांकडे आणि खाडाखोडीकडे त्यांचे प्रकर्षाने लक्ष जाऊ लागले. या दुरुस्त्या त्यांना बघवत नसल्यामुळे त्या दुरुस्त्यांना एक चांगला कलात्मक आकार देण्याची इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली आणि त्यातूनच ते चित्रकलेकडे वळले. चित्रकलेच्या प्रकटीकरणात रवींद्रनाथांनी नवनवीन प्रयोग केले.

कुंचला हाताळण्याचे शिक्षण घेतले नसल्यामुळे रवींद्रनाथांनी त्यांच्या प्रथम चित्र रेखाटनात आणि रंगकारीत एका वेगळ्याच तंत्राचा अवलंब केला. त्यांच्याजवळ उपलब्ध असलेले साहित्य म्हणजे लेखणी आणि शाई. त्याचाच वापर त्यांनी सुरुवातीला करून घेतला. जेव्हा त्यांना कागदाच्या पृष्ठभागावर शाई पसरवायची असे तेव्हा ते लेखणीचा (म्हणजेच टाकाचा) मागचा भाग वापरत. नंतरच्या काळात मात्र त्यांनी आपल्या बोटांची टोके आणि कापडी बोळे किंवा चिंधीचाही वापर केला. त्यानंतरच्या पुढील काळात रंगीत पेन्सिली, ब्रश आणि रंगांचा उपयोग त्यांनी चित्र रंगवण्यासाठी केला.

एकलव्याप्रमाणे ते शिकत गेले, साधना करीत राहिले आणि त्यांच्या तंत्रात सुधारणा होत गेली. परिणामी त्यांच्या चित्रकलेचाही विकास होत गेला. वास्तव जगतातील प्राणी आणि पक्षी यांच्यापेक्षा नवनवीन आकार आणि आकृत्या त्यांच्या चित्रांमधून उदयाला येत होत्या. त्यांच्या विचार आणि भावनातून स्त्रियांचे चेहरे आणि मुखवटे आकार घेऊ लागले होते आणि ही नंतरची वाटचाल वास्तवतेकडे होणारी होती. त्यानंतरच्या त्यांच्या निसर्गचित्रांनी चित्रकलेच्या प्रांतात महत्त्वपूर्ण स्थान मिळ त्यांच्या बर्याचशा चित्रांमध्ये सोनेरी रंगात तळपणारे दुपारचे निरभ्र आकाश आणि त्या प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर रेखाटलेल्या झाडांच्या विविध आकृत्या पाहायला मिळतात. त्यांच्या अनेक चित्रांमध्ये घुंघट घेतलेल्या स्त्रीचा लांबट चेहरा, धारदार नाक, पाणीदार बोलके डोळे या गोष्टी विशेषत्वाने आढळतात. त्यांच्या चित्रकलेतील या अविष्कारामागे कोणाची प्रतिमा त्यांच्या मनात असावी असा प्रश्न सर्वांना पडत असे. प्रसिद्ध चित्रकार नंदलाल बोस यांनी त्यांना एकदा हा प्रश्न विचारला होता. तेव्हा रवींद्रनाथांनी हे रहस्य उघड केले. ते म्हणाले की त्यांच्या चित्रातील घुंघट घेतलेल्या स्त्रीचा चेहरा, धारदार नाक, बोलके आणि पाणीदार डोळे या सगळ्या गोष्टी त्यांची वहिनी कादंबरीदेवी हिची प्रतिमा त्यांच्या मनात असल्यामुळे त्यांच्या चित्रात सहजपणे आल्या. वहिनीची प्रतिमा त्यांच्या मनामध्ये चिरकाल टिकून होती. ते म्हणाले की वहिनीचे डोळे माझ्या मनावर इतके खोलवर ठसले होते की मी ते कधीच विसरू शकत नाही आणि जेव्हा जेव्हा मी चेहरा काढतो तेव्हा नेहमीच तिचा चेहरा आणि डोळे माझ्या दृष्टीसमोर साकार होतात. यातून त्यांचे आपल्या वहिनीवर असणारे प्रेम देखील आपल्याला दिसते. हा वहिनींचा चेहरा अगदी उतारवयात देखील त्यांच्या स्मृतीत अगदी लख्ख होता. त्यांची पूर्वी लिहिलेली एक कविता बघा. त्यातून ही जाणीव होते. ही कविता त्यांच्या जोराशांको वाड्यातील एका संध्याकाळी केलेली आहे. ते म्हणतात-

**खांद्याच्या आधाराने**
**टेकलेल्या व्हायोलिनवर**
**रियाझ चाले दादाचा**
**त्याचवेळी वरच्या गच्चीवर**
**चमकून उठे संध्यातारा**
**संपताच इंग्रजीचे अध्ययन**
**जाई सांगाया मी वहिनीस**
**तेव्हा तिच्या घुंगटाची लाल**
**दिसे किनार साडीची.** (क्रमशः )

# ग्रहसंकेत

## (रविवार, १६ मार्च ते २२ मार्च २०२५)

**नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर**

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १६ मार्च-** संत तुकाराम बीज, महाराजा मल्हारराव होळकर जयंती, यशवंत महाराज पुण्यतिथी, साटम महाराज पुण्यतिथी, विश्वेश्वर महाराज छबीना उत्सव महाड ✻ **सोमवार, १७ मार्च-** संकष्ट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २१:२०, अहिल्यानगर- २१:१२, कलबुर्गी-२१:०१, कोल्हापूर-२१:११, जालना-२१:०८, धाराशिव- २१:०५, नांदेड-२१:०१, पंढरपूर-२१:०८, परभणी-२१:०४, पुणे-२१:१५, बीड-२१:०८, बीदर-२०:५९, लातूर-२१:०४, विजापूर-२१:०५, छत्रपती संभाजीनगर-२१:११, सांगली-२१:१०, सातारा-२१:४३, सोलापूर- २१:३५).), शिवजयंती (तिथीप्रमाणे), कल्पादि ✻ **मंगळवार, १८ मार्च-** श्री वेढे महाराज पुण्यतिथी परांडा, श्री शहाजीराजे भोसले जयंती, लक्ष्मीदेवी यात्रा हसरचंपू (गडहिंग्लज) ✻ **बुधवार, १९ मार्च-** रंगपंचमी, शुक्राचा पश्चिमेस लोप, रेणूका यात्रा सौंदलगा, कानिफनाथ यात्रा मढी, अर्जुश्वर यात्रा अर्जुनवाड, सुगंधादेवी यात्रा सौंदत्ती बुवाची, भैरवनाथ बगाड यात्रा बावधन ✻ **गुरुवार, २० मार्च-** विषुव दिन, संत एकनाथमहाराज षष्ठी, श्री नाथषष्ठी यात्रा पैठण ✻ **शुक्रवार, २१ मार्च-** कणकेश्वरी उत्सव कणकगिरी, जागतिक वनीकरण दिन, काळभैरव यात्रा शिरसी ता. शिराळा ✻ **शनिवार, २२ मार्च-** कालाष्टमी, भारतीय चैत्र मासारंभ व शके १९४७ प्रारंभ, शुक्र पूर्ण दर्शन, जागतिक जलदिन, वर्षी तपारंभ (जैन)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १६, १८ मार्च (१८ पर्यंत), २० मार्च ✻ **डोहाळ जेवण-** १६ मार्च (१२ पर्यंत), ✻ **बारसे-** १६ मार्च ✻ **जावळ-** १६ मार्च ✻ **गृहप्रवेश-** १६ मार्च, २० मार्च

### मेष- महत्त्वाची कामे करावीत

नातं जोडणं ही एक कला आहे. पण, नातं टिकवणं ही एक आध्यात्मिक साधना आहे. उद्योग- व्यवसायातील महत्त्वाची कामे या सप्ताहात करून घ्यावीत. हर्शल धनस्थानी येत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीतही बेफिकीर राहू नका. सरकारी कामांचा योग्य प्रकारे पाठपुरावा करावा. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. १६, २३

### वृषभ- उष्णतेपासून त्रास

आपण किती बरोबर किती चूक हे फक्त देव व अंतरात्मा यांनाच माहित असते. दोघेही दिसत नाहीत. राशीत हर्शल येत आहे. त्यामुळे सर्व बाबतीत विचाराने रहावे. अनावश्यक खर्च टाळावेत म्हणजे एक प्रकारची बचत होय. बोलून वाद वाढवू नका. उष्णतेपासून त्रास संभवतो. काळजी घ्यावी. महत्त्वाची कामे मनासारखी होतील. शुभ ता. २०

### मिथुन- आर्थिक स्थितीत सुधारणा

शब्दांपेक्षा काही तिखट नाही, मौनासारखं उत्तम साधन नाही. राशीत मंगळ त्यामुळे घाई गडबडीत काही निर्णय घेऊ नका. ठाम विचाराने वाटचाल करावी. प्रगती होत जाईल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. शुभ ता. १६

### कर्क- मार्ग चांगला ठेवावा

आपण हारत नसतो, आपला विचार आपणास हरवित असतो. विचार बदला. शनि, मंगळाची प्रतिकुलता आपल्या कार्यात अडचणी आणित आहे. आपला मार्ग चांगलाच ठेवा. प्रगती होत जाईल. अनावश्यक खर्च टाळावेत. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नवे विचार विचाराने स्वीकारावेत. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २०

### सिंह- आरोग्याकडे दुर्लक्ष नको

आपले विचार बदला. आपले भविष्यही बदलू लागेल. कर्मस्थानी हर्शल येत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात अधिक हुशारीने रहावे. नियोजनपूर्वक वाटचाल करावी. पुढे प्रकृती वाढणार आहेत. त्यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. महत्त्वाच्या कामांना अधिक वेळ द्यावा लागेल. अर्थिक प्रगतीच्या संधी लाभतील. घाईने निर्णय घेऊ नका. शुभ ता. १६

### कन्या- नव्या कामांना गती

ज्या दिवशी आपण आई- वडिलांना घाबरणार नाही, तिथून पुढे आयुष्याची घसरण सुरू होते. कौटुंबिक जीवनात अधिक लक्ष घालावे. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. उष्णतेपासून त्रास संभवतो. कार्यक्षेत्रात चिकाटीने प्रगती साधता येईल. नव्या विचारांना चालना मिळेल. नव्या कामांना गती मिळेल. शुभ ता. २०

### तुला- अपेक्षित कामे होतील

दयाळु बना. आपण ज्यांना ज्यांना भेटता ते कोणती, ना कोणती लढाई लढत असतात. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. नव्या संधी लाभणार आहेत. अपेक्षित घटना घडतील. अनावश्यक खर्च टाळावेत. स्पर्धांमध्ये यश मिळेल. विधी, कारखानदारी अशा क्षेत्रात चांगली वाटचाल करू शकाल. अपेक्षित कामे होतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २०

### वृश्चिक- अपेक्षित घटना

जीवन आपले असते. ते चांगले बनवा किंवा बिघडवा. चांगले करू इच्छित असाल तर आताच वेळ आहे. नव्या कामांना गती देता येईल. नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात भाग्यवृध्दिंगत करणाऱ्या घटना घडतील. कला-गुणांचा विकास होत जाईल. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २०

### धनु- अडचणींवर मात कराल

दगडांचं काळीज असलेल्या लोकांना जीव लावण्यात काहीच अर्थ नसतो. राशी समोर मंगळ त्यामुळे सर्व मनासारखेच घडेल, असे नाही. नोकरी, कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. महत्त्वाची कामे या सप्तहात करून घ्यावीत. अडचणीवर मात करू शकाल. सुसंधी लाभतील. शुभ ता. २०

### मकर- चांगल्या संधी लाभतील

ध्यास हा छोटासा शब्द आहे. तो ज्यांचेकडे आहे, त्यांचे जीवनच बदलते. कार्यक्षेत्रात चिकाटीने चांगली प्रगती करू शकाल. मार्ग निश्चित करून वाटचाल करा. यश मिळेल. मार्ग नसताना चालू नका. अडचणीत याल. नोकरी, व्यवसायात आता चांगल्या संधी लाभतील. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १६, २१

### कुंभ- प्रगती होईल

पुस्तक असो, वा आयुष्य शेवटपर्यंत संयम ठेवायचा असतो. कारण कहाणी शेवटच्या पानातही बदलू शकते. राशीतील शनि पुढील सप्ताहात राशी संक्रमण करणार आहे. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी होईल. प्रगती होईल. शुभ ता. २०

### मीन- आत्मविश्वासाने रहावे

स्वतःसाठी जगण्याला शिका, इथं कोणी कोणाचं नसते. शनि, मंगळाचे सध्या सहकार्य नाही. त्यामुळे सर्वबाबतीत विचाराने रहावे. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. आत्मविश्वासाने रहावे. अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती होत जाईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. फार दगदग करू नका. फार चिंता करू नका. शुभ ता. २०

!! शुभ भवतु !!



# मिरी मसाल्याचा औषधी उपयोग

**आजीचा बटवा**

नारायण कारंजकर

भ्र. ९४२३७५८४०१

**तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, हरभरा, मूग, मसूर आदी विविध प्रकारची धान्ये व कडधान्ये, अळू, मेथी, पालक, दोडका, घोसाळी, घेवडा, गाजर, भोपळा, वांगे, बटाटा आदी पालेभाज्या व फळभाज्या तसेच आंबा, केळ, पेरु, डाळींब, पपई, मोसंबी, सफरचंद आदी फळे तसेच विविध ओल्या वनौषधी व सुक्या वनौषधी आदींचे आयुर्वेदात कितीतरी औषधी उपयोग आहेत. दैनंदिन जीवनात या वनस्पती आपल्या वापरात आहेत. परंतु या वनस्पतींचे औषधी उपयोग थोड्यांना माहित आहेत. वनौषधींचे ज्ञान गुप्त राखण्याच्या प्रवृत्तीमुळे आज मोठ्या प्रमाणात ते लुप्त झाले आहे. जाणकारांनी पुढे येऊन हे ज्ञान विविध मागनि जनतेला दिले तर निश्चितच घरोघरी 'आजीबाईच' बटवा' पुन्हा सुरू होऊ शकेल.**

निसर्गाने आपणासाठी कितीतरी विविध प्रकारच्या वनौषधी निर्माण केल्या आहेत. त्यांचा किरकोळ आजारांवर आवश्य उपयोग केला पाहिजे. स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्याने आज कित्येक वनौषधी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अशा वनौषधींचे संरक्षण व संवर्धन होणे आज नितांत आवश्यक आहे. वनौषधींचे ज्ञान जनतेला मोठ्या प्रमाणात मिळाले तर वनौषधींचे खात्रीने संवर्धन होऊ शकेल. आयुर्वेद क्षेत्रातील संस्थांनी व्यक्तींनी पुढाकार घेऊन कार्यास प्रारंभ केला तर फार मोठे कार्य होणार आहे. अशा कार्यास जनतेचे निश्चित सहकार्य मिळेल. दैनंदिन वापरातील वस्तुंचा व आपल्या परिसरातील वनस्पतीच्या औषधी गुणधर्माची माहिती जनतेस करून देण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. कोल्हापूर येथील हरिश्चंद्र मेहता पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टद्वारा वनौषधी प्रचारार्थ 'समाचार' मध्ये 'उपयुक्त वनौषधी' या सदराद्वारे कित्येक वनौषधींची माहिती जनतेपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. आता 'दै. तरुण भारत'च्या 'आसमंत' पुरवणीद्वारे वनौषधी प्रचाराचे कार्य करण्याचे सद्भाग्य मला लाभले आहे. त्यामुळे वनौषधींचे ज्ञान आता व्यापक स्वरूपात जनतेपर्यंत जात आहे. प्रत्येक पातळीवर व मोठ्या शहरात 'वनौषधी प्रदर्शने भरविण्याची प्रथम पासूनच तीव्र इच्छा आहे. असो, परमपिता परमेश्वर वृत्तपत्राद्वारे हे कार्य मज हातून घडवत आहे, हेही माझे भाग्यच समजतो. वेळ आली म्हणजे सर्व काही मनाप्रमाणे घडत जाईल, असे मनोमन वाटते.

आज आपण 'मिरी मसाल्याचा औषधी उपयोग' याबाबत माहिती घेणार आहोत. स्वयंपाकात मिरी मसाल्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. अन्नपचनासाठी व शरिराला आवश्यक त्या रसाच्या पूर्तीसाठी मिरी मसाल्याची योजना आपल्या पूर्वजांनी केली आहे. भगिनींना तर मसाल्याचे विविध पदार्थ तर ओळखीचेच आहेत. त्यांचा औषधी उपयोग त्यांना समजला तर ती आज अत्यंत महत्त्वाची बाब ठरणार आहे. घरातील रुग्णांची माता-भगिनींनाच विशेष करुन सेवा करावी लाग-ते. महिलांनी 'आजीबाईच्या बटव्याद्वारे घरगुती औषधोपचाराने ज्ञान विविध मार्गाने मिळविले तर आजच्या महागाईच्या दिवसात ते मोलाचेच ठरणार आहे. मिरी मसाल्याचे कितीतरी विविध प्रकार आहेत. येथे महत्त्वाच्या मिरी मसाल्याचे महत्त्वाचेच औषधी उपयोग देत आहे.

**लवंगः-** 'हिंग, जिरे मसाला, चार शिंगे कशाला?' असा उखाणा आम्हा लहानपणी मित्रांना घालीत असे. लवंग हे त्याचे उत्तर असले तरी कित्येकांना तो ओळखता येत नसे. लवंग मसाल्याच्या पदार्थात प्रामुख्याने वापरली जाते. औषधी द्रव्य म्हणूनही लवंग अत्यंत महत्त्वाची वनस्पती आहे. लवंग सुगंधी द्रव्यात मोडते. ती कफकारक आहे. ती कृमिघ्न व जंतूनाशक, तीक्ष्ण, उष्ण, रुचिप्रद, मळमळ दूर करणे इ. लवंगाचे गुणधर्म आहेत. सर्दीवर लवंग, सुंठ, अष्टमांश काढा करून त्यात थोडा मध घालून प्यावा. मोठ्या रुग्णांना लवंग, सुंठ एकत्र उगाळून ते गरम करून नाकावर लेप करावा.

**पांढरी आवः-** पांढरी आव, मुरडा, पोट दुखणे यावर लवंग पूड मधातून चाटवावी. त्यामुळे आव कमी होते.

**दंतशूलः-** दात, दाढा दुखणे, सुजणे, ठणका लागणे यावर लवंग तेलाचा बोळा दातात धरावा.



**रातांधळेः-** रातांधळे झालेल्या व्यक्तीच्या डोळ्यात, शेळीच्या मुत्रात लवंग उगाळून ते अंजन फारच थोडे घालावे. डोळ्यास चटका बसतो पण विकार दूर होतो. जाणकाराकडूनच हा उपाय करून घ्यावा.'

**मळमळ वांतीवरः-** कोणत्याही कारणाने झालेली मळमळ, वांती यावर २/३ लवंगा तोंडात धरून चघळाव्या. म्हणजे मळमळ व वांती थांबते.

तसेच दमा, संग्रहणी आदी विकारावरही लवंगाचा उपयोग होतो. लवंगादि वटी, लवंगादि चूर्णही लवंगापासून तयार केले जाते.

**दालचिनीः-** दालचिनी हे मौल्यवान सुगंधी द्रव्य आहे. मसाल्यात ती प्रामुख्याने वापरली जाते. दालचिनी दीपन असून पोटात वात धरत नाही. दालचिनीमुळे रक्तातील श्वेतकण वाढतात.

**संधिवातः-** सांधेदुखीवर दालचिनीचे तेल सांध्यावर लावावे व वाफेने शेकावे. थोडेसे पोटातही घ्यावे. त्यामुळे सांध्याची सूज व वेदना कमी होतात.

**डोकेदुखीः-** सर्दीमुळे अनेकदा डोके दुखते, त्यासाठी दालचिनी उगाळून ते गंध कपाळावर सौम्य स्वरुपात लावावे. (सुंठीचे गंध लावतो त्याप्रमाणे) तसेच दालचिनीची थोडी पूड मधातून पोटात घ्यावी. सर्दी कमी डोऊन डोकेदुखी थांबते.

**दातदुखीः-** कळा येणे, दात दुखणे, थंड अथवा गरम पदार्थ लागू न देणे या विकारावर तिळाच्या तेलाच्या प्रथम गुळण्या कराव्या. नंतर दालचिनीचे तेल कापसाच्या बोळ्यात घेऊन दातात धरावे. आराम वाटतो.

**आमातिसारः-** या विकारात दालचिनी बेलफळाचा गर, बडिशेप, प्रत्येकी एक एक मासा घेऊन दह्याच्या सायीबरोबर खावा. तसेच ज्वर, क्षय, गर्भाशय दोष, आदि विकारावर दालचिनी उपयोगी आहे.

**जिरेः-** जिरे हा मसाल्यातील एक महत्त्वाचा पदार्थ आहे. जिरे थंड व उष्णता शामक आहे. तोंड आल्यावर जिरे व खंडीसाखर चेचून तोंडात धरावी. त्यामुळे अंगातील कडकी नाहीशी होते व आलेले तोंडही बरे होते.

**खोकलाः-** खोकल्याच्या विकारावर एक ग्रॅम सुंठीची पूड व एक ग्रॅम जिर्याची पूड मधातून सकाळ-संध्याकाळ घ्यावी. त्यामुळे लवकरच खोकला बरा होतो.

**धुपणीः-** अनेक महिलांना धुपणीचा विकार असतो. त्यांनी जिरे व खंडीसाखर याचे चूर्ण अर्धा तोळा तांदूळाच्या धुपणात घालून २१ दिवस सकाळ संध्याकाळ घ्यावयास दिले असता महिलांची धुपणी बरी होते.

**तापावरः-** हाडकुर्मी. तापावर जिर्याचे चूर्ण अर्धा तोळा व जुना गुळ अर्धा तोळा ही कालवून त्याच्या सुपारीएवढ्या तीन गोळ्या कराव्या.

सकाळ, दुपार व संध्याकाळ मिळून ३ गोळ्या खाव्या. याप्रमाणे ७ ते २१ दिवस हे औषध घ्यावे.

**शहाजिरेः-** शहाजिरे हे सुगंधी असल्यामुळे मसाल्यात वापरतात. त्यामुळे पदार्थाला उत्तम स्वाद येतो. ते कांतिदायक आहे. शहाजिरे रुचिदायक, तोंडाला खमंगपणा आणणारे आहे.

शहाजिरे दुधात वाटून रात्री तोंडास लावावे व सकाळी कोमट पाण्याने तोंड धुवावे. लवकरच चेहरा सतेज झाल्याचे दिसून येईल.

**हगवणीवरः-** शहाजिरे थोडे तव्यावर परतून त्याची वस्त्रगाळ पूड करावी व दरवेळी चिमूटभर पूड मधात कालवून वारंवार चाटवावी. म्हणजे मुलांची हगवण थांबते.

**हिंगः-** हिंग कृमिघ्न, रुचिप्रद, कडू, पाचक, जंतूनाशक असून अपचन, अजीर्ण यावर हिंगाचा उपयोग होतो.

हिंगापासून हिंगाष्टक चूर्ण करतात. अजीर्णावर ते प्रभावी औषध आहे.

**दंतकृमीः-** दंतकृमीवर भाजलेला हिंग कापसात गुंडाळून दाढेखाली धरावा. त्रास दूर होतो.

**हिवतापः-** हिवतापावर हिंग व कापूर एकत्र करून द्यावा. नुसता ताप आला व तो ताप दूषित होण्याची चिन्हे दिसू लागली. तर हिंग व कापूर द्यावा.

**पोटदुखीः-** पोटदुखीवर हिंग, ओवा व सुंठ याचे समभाग चूर्ण द्यावे. त्यांमुळे पोटदुखी, पोटफुगी आदी त्रास दूर होतात.

**मिरेः-** मसाल्याचे पदार्थात मिर्याचे फार महत्त्व आहे. मिरे उष्ण, तिखट, वातहारक, अग्निदीपकं असतात.

**सर्दी पडशावरः-** पावतोळा मीर पूड, पाव तोळा खडीसाखर यांचे एकत्र चूर्ण करून गरम दुधात घालून ते दूध प्यावे.

**खोकल्यावरः-** दुधात ४-५ मिरे घालून ते कढवावे व साधारण गरम गरम असतानाच ते दूध प्यावे.

**हिवतापावरः-** ५० ग्रॅम मिरे चेचून घ्यावे व त्याचा एक लिटर पाण्यात अष्टमांश काढा करावा व गाळून घ्यावा. थंड झाल्यावर दिवसातून ४ वेळा तो घ्यावा. सप्ताहात ताप कमी होतो.

**ओवाः-** ओव्याचे विविध औषधी उपयोग आहेत. ओवा कृमिनाशक व पाचक आहे. पोट फुगल्यास चिमूटभर ओवा गरम पाण्याबरोबर घ्यावा.

**अजीर्णः-** वेळी अवेळी खाणे, अति आहार यामुळे अजीर्ण झाल्यावर चिमूटभर ओवा खाण्यास द्यावा.

शौचास साफ होण्यासाठी रात्री थोडासा ओवा चावून चावून खावा. सकाळी शौचास साफ होते.

( मेहता ट्रस्ट सौजन्याने)

पान ४ वरून

# रंगांची उधळण करणारा फाल्गुन

दिवाळी सारख्या नव्या कपड्याचा मान असलेल्या सणाच्या अगदी विरुद्ध गाठोड्यातील जुनाट कपडे काढून ती अंगावर घालून आमची सेना रंगांच्या पिचकारीने मित्रांची शिकार करण्यासाठी निघत असे. मोठे भाबडे दिवस होते ते, टीव्ही पेक्षा रेडिओवर दिवसभर सुरू असलेले, होली आई देखो होली आई रे, किंवा होळीचा रंग लुटा रे असे गाणे मनाला मोहून टाकत. हा फाल्गुन नेमका शिशिर ऋतूचा की वसंत ऋतूचा हा संभ्रम माझ्या मनात नेहमी निर्माण होतो. वाढत्या उन्हाच्या लाटांमध्ये बहुतांश जत्रा यात्रा फाल्गुनामध्ये दिसत नसल्या तरी बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी येथे राज्यभर प्रसिद्ध असलेली मोठी यात्रा भरते. ही एक यात्रा सोडली तर फाल्गुन विशेष यात्रा उत्सवासाठी उत्सुक नसावा असे वाटते. फाल्गुन जसा माघाला माघारी सोडून येतो तसा स्वतःच्या आगमना बरोबर चैत्राला हाका मारतच येतो. वसंत आला म्हणजे चैतन्य येणार अशा जाणिवेत आपण नव्या ऋतूचे स्वागत करण्यासाठी सज्ज होतो आणि १७ नखरे असलेला चैत्र आपल्यासमोर उभा राहतो.

पान २ वरून

# व्यथा

आपल्या मुलींमध्ये, सुनेमध्ये फरक करतात. घराला सुरुंग लावतात. अशा महिलांचंही कोणीतरी चांगलं समुपदेशन करायला पाहिजे. त्यांच्या विचारात परिवर्तन आणायला पाहिजे.

अगं, घर निरोगी विचारांचे असेल तर त्याचे पडसाद आपल्या जवळपासच्या समाजावर पडतात. त्या समाजाचे पडसाद गावावर पडतात, नंतर जिल्ह्यावर, देशावर अनुक्रमाने जगावरसुद्धा पडतात. हे काय महिला सबलीकरण आहे का?'' ''नाही ना, नीव पक्की असेल तरच त्यावरची इमारत पक्की होणार, हो की नाही? आपण झाडाच्या फांद्या कापून आकार देतो ना? अगदी तसेच. आपल्या मनाच्या नकारात्मक फांद्या कापून सुंदर आकार दिला पाहिजे... मग बघ किती सुंदर जग होईल ते! सावित्रीबाई फुले, जिजाऊ माँसाहेब, आनंदीबाई गोपाळ, झाशीची राणी, कल्पना चावला... अशा अनेक महिलांनी समाज घडवला आहे. त्यांची शिकवण डोळ्यासमोर ठेवायला हवी.

वेळीच आवर नाही घातला तर समाजात महिलांसाठी असलेल्या कायद्यांची तलवार व्हायला वेळ लागणार नाही! सावित्रीबाई फुलेंनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्यांना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जायचे. सावित्रीबाई आणि त्यांचे पती हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. आनंदीबाई गोपाळ या पहिल्या महिला डॉक्टर झाल्या. नवऱ्याच्या निधनानंतर राणी लक्ष्मीबाईंनी मुलाला कमरेला बांधून युद्ध केलं होतं. मग तू ही या समाजात अष्टभुजा होऊन का लढत नाहीस?'' माझ्याही मनातील उद्वेग आता थोडा कमी झाला होता. अचानक आमच्या दोघींमध्ये शांतता पसरली... थोड्या वेळाने ती डोळे पुसत म्हणली... ''हो जी मॅडम, आता थोडं थोडं लक्षात यायला लागलं हाय.

'अरे ला कारे' केलंच पाहिजे.'' ''पण सविता पुन्हा तेच सांगते की, चूक आणि बरोबर यामध्ये बारीक लाईन असते. त्याची मात्र आपल्याला काळजी घ्यायला पाहिजे. हो की नाही?'' ''जी मॅडम जी.. थोडा थोडा डोसक्यात परकाश पडला हाय. लय हलकं झाल्यागत वाटतय जी. ही वाट लय दूरची हाय, पण खात्रीची हाय.. थँक्यू जी!'' तिचा चेहेरा आता प्रकाश पडल्यासारखा उजळून निघाला होता. आकाश मोकळं झाल्यासारखं वाटत होतं. तिने माझ्याकडे बघितले आणि मी तिच्याकडे! दोघींच्याही मनातील मळभ आता स्थिरावली होती. मी म्हणाले, ''चल सविता ऊठ... चल आज आपण दोघीही या छान विचारांची मेजवानी घेऊन निघू या... आनंदाने तुझ्या मुलींसाठी पुस्तके, वह्या आणि फराक पण घेऊया...''

ती खळखळून हसायला लागली. जणू एखाद्या वस्तूला लागलेली धूळ पुसून सूर्यकिरणात लखलखावी अगदी तशीच. ज्ञानाच्या सूर्याने जादूची कांडी फिरवावी अगदी तशीच...! मला म्हणावेसे वाटले... 'तू छुन छुन पैंजण, गंधार मंत्रमुग्ध कर्णरंध्रा अनुभवते, आत्मसुख वरदान तू दुग्ध पांढरा मोगरा, सुगंधित अंधार घेऊन पोटी उमलते, कोमल मंदार...'

पान ४ वरून



# ती आणि तो

एवढंच नव्हे, तर संसारातील प्रत्येक लहान-मोठ्यया निर्णयामध्ये तिला सहभागी करून घेतले. आजच्या स्त्रीला विवाहासाठी जोडीदार निवडीचं स्वातंत्र्य आहे. विवाहानंतर मूल केव्हा होऊ द्यायचे, होउ द्यायचे की नाही याचेही स्वातंत्र्य तिला आहे. फक्त सुशिक्षित स्त्रियांमध्येच नाही तर झोपडपट्टीत राहणाऱ्या स्त्रीलाही आत्मभान आले आहे.

दारूड्या नवऱ्याला न जुमानता आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी रक्ताचं पाणी करणारी आई, तुझ्या दारूसाठी मी कमवत नाही, असा सज्जड दम देणारी स्त्री या वस्त्यांमध्ये तुरळक का होईना दिसायला लागली आहे. दूरदर्शन मालिकांमधली स्त्री प्रतिमा आजही १९ व्या शतकातील दाखवली जाते. कुठलीही मालिका घ्या. त्यात एक खूप शिकलेली, पण गरीब सोशिक अशी सून असते आणि तिला छळणाऱ्या सख्खी सासू, चुलत सासू, लग्न होऊनही कायम माहेरी मुक्काम ठोकून असणारी नणंद, एखादी खडूस जाऊ असा सगळा मसाला भरलेला असतो. जमाना बदलला आहे. स्त्रीने अनेक क्षेत्रात भरारी घेतली आहे, हे मालिकेच्या दिग्दर्शकाना, निर्मात्यांना अजून कळलेलं नसावे. प्रचंड कपट कारस्थान करणाऱ्या, सुनेला विषबिष देऊन मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रिया हे लोक कुठल्या कथाकहाण्यांमधून उचलतात, ते त्यांनाच ठाऊक. हे सगळं कमी म्हणून की काय, एका नवऱ्याला दोन बायका, एका बाईला दोन नवरे नाहीतर प्रियकर असेही प्रकार सर्रास दाखवले जातात. हा यांचा पुरोगामीपणा म्हणायचा का? आजची स्त्री इतकी कमकुवत नाही. परिस्थिती कशीही असो; त्याला तोंड देण्याची योग्यता आणि धमक तिच्यात आहे आणि हे समजून घेणारा 'तो' आपल्याला समाजात दिसतो, हा नक्कीच सकारात्मक बदल आहे.

# मूल्ये- कथनी आणि करणी !

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २५८

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com



स्वी कृती आणि बांधिलकी उपचारपद्धती असं मानते- आयुष्याची भरभराट हवी असेल तर जीवनाला ध्येय असायला हवेच आणि पुढे जाऊन फोरसिथ आणि एइफर्ट यांचे २०१६ चे संशोधन दोनच प्रश्न विचारते-

**१) मला माझे आयुष्य कसे हवे आहे?**

**२) माझ्यासाठी सगळ्यात महत्वाचे काय आहे?**

याच्या आधारे बांधिलकी, वाटेतील अडथळे आणि त्यासाठीच्या रणनीतीचे नियोजन करता येते. एका आराखड्याच्या मदतीने खालील गोष्टी समजून घेण्यात मदत होते-

अ) ध्येय आणि त्याच्या पूर्तीसाठी बांधिलकी (आपल्या ध्येय आणि नीतिमूल्ये यांच्यातील जोडरचना)

ब) या मार्गात काय अडचणी येऊ शकतील? (संभाव्य अडथळे, जे ध्येयापर्यंत पोहोचणे अवघड/अशक्य करू शकतील?)

क) त्यावर कायमस्वरूपी उत्तरे शोधणे (कृती आराखडा तयार करणे)

१) उद्दिष्टाचे ठोस विधान आणि त्याची व्यक्तिगत मूल्याशी जोडणी

(अ)

(ब)

(क)

(ड)

(इ)

२) संभाव्य अडथळे (या ध्येयपूर्तीच्या मार्गात काय अडचणी येऊ शकतील याची यादी)

(अ)

(ब)

(क)

(ड)

(इ)

३) व्यूहरचना (या अडचणींचा सामना कसा करता येईल याबाबत रणनीती)

(अ)

(ब)

(क)

(ड)

(इ)

**मूल्यांच्या वाटेतील समस्या**

बांधिलकीच्या मार्गावरील लढे आणि त्रास कमी करणे हे उपचारपद्धतीच्या यशाचे घटक असतात. सुरुवात होते- त्रासदायक विचारांच्या शोध कार्यापासून. त्यांच्या जागी मूल्याधारित उद्दिष्ट्ये आणि कृती योजना यांची बेगमी करावी लागते.

**(अ) त्रास देणारे विचार आणि भावना -** कोणत्या नकारात्मक, निरुपयोगी प्रक्रिया, मनाच्या संरचना यांच्याशी झगडावे लागते?

**(ब) जीवनमूल्ये -** जीवनातील सर्वात महत्वाचे काय?

**(क) ध्येय आणि कृती पावले-** दीर्घकालीन उपाययोजना करून जगण्याची गुणवत्ता कशी वाढविता येईल यांवर विचारमंथन

या टप्प्यांना प्रयत्नपूर्वक उत्तरे दिली तर चित्र स्पष्ट होण्यास मदत होईल आणि अर्थपूर्ण दिशेने पावले टाकण्यास सुरुवात करणे शक्य होईल.

व्यक्तीसाठी नीतीमूल्ये जितकी महत्वाची, तितकीच ती संस्थेसाठीही असतात. संस्थेतील सर्वोच्च स्थानावर असलेल्या व्यक्तीच्या काही जीवननिष्ठा असतात आणि त्यांची स्वतःच्या जीवनातच नव्हे तर स्वतःच्या संस्थेतही काटेकोर अंमलबजावणी व्हावी याकडे कटाक्ष असतो.

बरेचदा संस्थेचे नेतृत्व नीतीमूल्यांच्या बाबतीत इतके आग्रही असते की त्याच्याशी तडजोड झालेली त्यांना खपत नाही. संस्थेत निरामय, उच्च कार्यक्षमतेची संस्कृती रुजविण्यासाठी कृतिबद्ध आणि काहीशी सक्तीची मूल्ये असावीत असा त्यांचा अट्टाहास असतो.

अलीकडे याला अनैसर्गिक मानले जात नाही. बरेचदा आकर्षक, लक्षवेधी मूल्यांची निर्मिती केली जाते, त्यासाठी वेळ आणि ऊर्जा खर्ची घालून तर काहीवेळा एखाद्या सल्लागाराच्या मदती- ने संस्था मूल्यव्यवस्थेची पायाभरणी केली जाते. पण संस्थेच्या दैनंदिन कामकाजात त्यांचे पालन होतेच असं नाही. उदा. एखादी कंपनी भलेही पारदर्शकतेची जाहिरात करीत असते पण प्रत्यक्षात मात्र त्यांना प्रामाणिक अभिप्रायांचे वावडे असते. किंवा एखादी संस्था नवसर्जनाचा गवगवा करते पण कर्मचाऱ्यांना संरचनेत, जोखीम घेण्यात मात्र मागे खेचते. सर्जकतेला प्रोत्साहन देण्यात कमी पडते. अशावेळी मूल्यांचे पोस्टर फक्त भिंतीवर ठेवण्यात काय हशील?

**कर्मचाऱ्यांना आढळते-** मूल्ये फक्त संकेतस्थळांवर चमकत असतात पण कार्यस्थळांवर त्यांच्याकडे सर्रास दुर्लक्ष केले जाते. मग कर्मचारी निराश होतात आणि कामातून, प्रामाणिक प्रयत्नांमधून अंग काढून घेतात. कथनी आणि करणीत अंतर असेल तर मूल्यांचा अपमृत्यू होतो. कारण मूल्यांचे पालन हे फक्त वर्तनातून होत असते. त्यांमधून संस्थेची भावी वाटचाल जशी प्रतीत होते तसेच त्यांतून पुनर्विचार संभवत नाही असाही सर्व पातळ्यांवर संदेश जात असल्याने निर्णय प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शी होण्यास मदत होते.

कथनी आणि करणी यामधील फरकाचे एक डोळस उदाहरण म्हणजे- एनरॉन ही कंपनी! वरकरणी जगाला दाखवायला, मिरवायला त्यांची नीतिमूल्ये होती- प्रामाणिकपणा, अखंडता, सुसंवाद, आदर, आणि कामातील सर्वोच्च कर्तबगारी! प्रत्यक्षात त्या संस्थेत अंमलात येणारी मूल्ये होती- कोणतीही किंमत देऊन व्यवसाय हस्तगत करायचा (साम / दाम /दंड /भेद यापैकी एका मार्गाने), पैसे कमविणे, नियमांची सोयीस्कर पायमल्ली आणि न झेपणाऱ्या जबाबदाऱ्या/ जोखिमा अंगावर घ्यायच्या.

हे एक टोकाचे उदाहरण झाले पण बव्हंशी संस्था चांगल्या मूल्यांची निवड करायची आणि ती मूल्ये झेपली नाहीतर बिनदिक्कत त्याविरुद्ध वर्तन करायचे. मग आपोआप उपहास, निंदा, विश्वासार्हता गमावणे आणि नेतृत्वाच्या विश्वसनीयतेमध्ये घट असे परिणाम दिसायला लागतात.

तेव्हा लिखित मूल्ये आणि प्रत्यक्षातील मूल्ये यांच्यातील अंतर आधी शोधून काढावे लागते. संस्थेतील सर्व पातळ्यांवरील कर्मचाऱ्यांच्या मुलाखती घेऊन दोनच प्रश्न विचारावेत-

(१) सध्याचे कोणते मूलभूत मूल्य तुमच्यासाठी महत्वाचे आहे?

(२) कोणते मूल्य कोणीही पाळत नाही किंवा त्याकडे सरसकट दुर्लक्ष केले जाते?

मिळणाऱ्या उत्तरांवरून स्पष्ट संकेत मिळतात- कोणती मूल्ये चिरंतन, अबाधित आहेत आई कोणती बदलण्याची गरज आहे.

बरेचदा कर्मचाऱ्यांना वास्तवात येणारे अनुभव विचारात घेऊन संस्थेला तिची मूल्यव्यवस्था आमूलाग्र बदलावी लागते. कारण मूल्यांमधून संस्थेची कार्यसंस्कृती झळकते तेव्हा काय भावी विचारांची दिशा आहे यापेक्षा सध्याचे विचार काय आहेत हे पडताळून पाहणे गरजेचे बनते. कधीकधी कागदावर सादर केली जाणारी मूल्यांची यादी दणकट असते पण अंमलबजावणीत नेतृत्वाकडून त्या मूल्यसाखळीला अपेक्षित महत्व दिले जात नाही आणि मग आपोआप सगळ्यांचा विश्वास उडतो.

जर एखादी संस्था प्रामाणिकपणे आपल्या मूल्यांचे सुस्पष्ट प्रशिक्षण देत असेल आणि त्यांचे महत्व सातत्याने अधोरेखित करीत असेल तर आपोआप निरामय संस्कृतीची प्रतिष्ठापना होते, तेथे उत्पादकता वाढते, मानसिक सुरक्षेत वाढ होते. मात्र प्रत्यक्षात असे झाले नाही तर मूल्यांची विधाने पोकळ गर्जना/ घोषवाक्य ठरतात आणि त्यापासून कदाचित अधिक इजा संभवते.

मूल्ययादीतून संस्कृती आकाराला यावी अशी अपेक्षा असेल तर नेतृत्वाने ती दैनंदिन कामकाजात अंगिकारली जाताहेत का नाही याच्यावर काटेकोर लक्ष ठेवणे महत्वाचे ठरते. खाली काही कार्यक्षेत्रे दिलेले आहेत, ज्यामध्ये मूल्यांचे स्थान वरचे असायला हवे-

**(१) कर्मचारी नियुक्ती-** मुलाखतीमधील प्रश्नोत्तरातून उमेदवाराची विचारसरणी आणि त्याच्या आयुष्यात महत्वाचे काय याबद्दल कळू शकते. मग संस्थेच्या मूल्यव्यवस्थेशी ते ताडून बघता येते आणि निवडप्रक्रिया सुलभ होते. चुकीच्या उमेदवाराची निवड करून पश्चात्ताप करण्यात काय अर्थ?

**(२) कामकाजाचे मूल्यमापन-** कर्मचाऱ्यांची व्यक्तिगत आणि सांघिक कामगिरी तपासताना मूल्यांची जाण आणि त्यांचे कसोशीने पालन याकडे लक्ष ठेवावे लागते. चुकीच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ किंवा पदोन्नती बहाल केल्यास संस्थेत चुकीचा संदेश जातो.

**(३) कौतुक, दाद-** अनौपचारिक मार्गाने कर्मचाऱ्यांना दाद मिळाली तर त्यांचे सद्वर्तन ठाम बनते आणि वारंवार त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता वाढते.

**(४) उत्तरदायित्व-** मूल्यांचे जाणता- अजाण- ता कोणाच्याही हातून उल्लंघन झाले तर त्यासाठी त्याला जबाबदार धरणे, उचित कारवाई करणे आणि त्या माध्यमातून इतरांना कठोर संदेश देणे तितकेच आवश्यक असते.

**(५) निर्णय प्रक्रिया-** व्यवसायातील अग्रक्रम आणि रणनीती ठरविताना अनेक निर्णय घ्यावे लागतात, त्यांचा पाया संस्थेची मूल्यसाखळी असली तर पश्चात्तापाची वेळ येत नाही.

जेव्हा कथनी आणि करणी एकसमान असतात तेव्हा आपोआप मूल्यांना महत्व येते आणि ती व्यक्तिमत्वाचे प्रमुख अंग बनतात. मूल्यांचा रोजच्या कामात अनुभव येत असेल तर ना पाठांतराची गरज भासते ना संकेत स्थळावर जाऊन चाचपणी करण्याची.

याचे एक सकारात्मक उदाहरण म्हणजे- साऊथवेस्ट एयरलाईन्स! त्यांनी आपल्या संस्कृतीच्या पायाशी मूल्यसाखळी ठेवली आहे आणि तिचा सन्मान करणाऱ्यांचीच निवड करायची असे त्यांचे तत्व आहे.

याचे एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे एकदा विमानातून निघालेल्या एका प्रवाशाला घरून महत्वाचा संदेश आला- मुलाच्या दुर्दैवी निधनाचा. विमानाच्या कर्मचाऱ्यांनी त्वरेने त्या प्रवाशाची दुसऱ्या विमानाने घरी जाण्याची सोय केली, तिकिटाचे पैसे परत केले आणि नवीन तिकीट मोफत कडून दिले. सोबतीला भोजनाचा डब्बा दिला.

खरंतर अशी परिस्थिती हाताळायची ना त्यांना सवय होती, ना कोठे त्यांच्या धोरणात हे लिखित स्वरूपात होते. पण संस्थेचे एक मूल्य- ग्राहकसेवा आणि दुसरे सेवकाचे मन एवढ्यांचे पालन त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आणि एक कायम उदाहरण नजरेसमोर ठेवले. संस्थेची मूल्ये आणि कर्मचाऱ्यांचे वर्तन जुळले तर अशी उदाहरणे सापडतात.

कार्यसंस्कृती अशी हळूहळू पण निश्चितपणे विकसित होत जाते. मात्र शब्द आणि कृती यांच्या फट पडली तर समोर दोनच पर्याय उरतात- शब्द बदलायचे किंवा कृतीत बदल करायची पाळी आली तर त्याचे उत्तरदायित्व स्वतःच्या खांद्यावर घ्यायचे, विनातक्रार.

कार्ल जुंग यांचे यासंदर्भातील एक वचन सुप्रसिद्ध आहे-

तुम्ही जे करता, त्यावरून तुम्ही कोण हे ठरते, तुम्ही जे बोलता यावरून नव्हे!

# संतांच्या पंगती । श्रेष्ठ जाणा ।।

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

(भाग-५१)



खरं तर आपुली आपण करा सोडवण म्हटल्याप्रमाणे कोणत्याही दुःखातून किंवा अडचणीतून बाहेर पडून सुखी व्हायचं असेल तर त्यासाठी स्वत:लाच प्रयत्न करावे लागतील. कुणीतरी येईल आणि आपली सोडवणूक करेल ही आशाच मुळात चूकीची आणि घातक आहे. व. पु. काळे म्हणतात त्याप्रमाणे वेळ, योग्य व्यक्ती आणि पैसा या तीन गोष्टीच्या पलीकडे जगातला कोणताही प्रश्न नसतो. कितीही जटील प्रश्न असला तरी त्याचे उत्तर या तीन गोष्टीतच असते. त्यापलीकडे अनुत्तरित असा कोणताच प्रश्न असत नाही. आणि आयुष्यात कोणता प्रशनच पडु नये किंवा पडलाच तर तो वेदनादायक किंवा जटिल न होता सहजपणे सुटावा आणि त्यापासून सुखाचीच प्राप्ती व्हावी असे वाटत असेल तर आपण वांगल्याची (वाईटाची) संगत टाळून चांगल्याचीच संगती करावी. म्हणजे आयुष्यातील ९९ टक्के प्रश्न सहज सुटतील. यावर विश्वास ठेवावा.

मोरोपंतांनी आपल्या केकावलीत फार प्रेरणादायी असे सांगितले आहे की, ज्यामुळे आपल्यातली नकारात्मकता जाऊन सकारात्मकतेचा उगम होतो. आणि जिथे सकारात्मक विचारांचे पालन केले जाते तिथे प्रश्नांचे वास्तव्य फार काळ टीकत नसते. कारण नकारात्मकतेत प्रश्नांची अर्थात दुःखाची निर्मिती होते तर सकारात्मकतेत प्रश्नांची सोडवणूक अर्थात दुः खाचे निवारण केली जाते. म्हणूनच मोरोपंतांच्या केकावलीतील,

**सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो!** हे वाक्य त्रिकालाबाधी सत्य असून आयुष्य घडविण्यासाठी आणि ते उज्वल करण्यासाठी अतिशय प्रेरणादायी आहे असे वाटते. इथे सुसंगती म्हणजे दुसरे तिसरे काही नसून देवा, मला फक्त साधु संतांची, सज्जनांचीच संगती घडु दे हे मोरोपंतांचे देवाकडे मागणे तर आहेच पण त्याचबरोबर तुम्ही आम्हीही अशांचीच संगती करावी हेही अपेक्षित आहे. यामुळे काय होईल तर सुजन वाक्य कानी पडेल त्यामुळे बुद्धी विकसीत होऊन मनावर चांगले संस्कार आपोआप घडतील. त्यामुळे अलांच्छित, तापहीन अशा संत संगतीमुळे आपलेही आचरणही तसेच होईल.

परिणामतः विकार रहित अशी आदर्श समाज व्यवस्था निर्माण होईल आणि 'सर्वे सुखीन:संतु सर्वे संतु निरामय...' अशी परिस्थिती निर्माण होईल आणि दुःखाची गटार, गंगेसारखी पवित्र होऊन सर्वत्र सुखाच्या बागा फुलतील आणि अशा सुखाच्या बागेत आमच्या आनंदाचे फुलपाखरू मुक्तपणे विहार करेल.

संत संगतीत सर्व दुःखाची निवृत्ती आणि सर्व सूखाची प्राप्ती होत असते. आपल्या हातात दुसरे काही नसले तरी आपण संगत कूणाची करावी हे तर निश्चितच असते. म्हणूनच 'आपली आपण करा सोडवण' हे जर साध्य करायचे असेल आणि सुखी जीवन जगायचे असेल तर जशी संत जनाबाई म्हणते की, दळीता कांडीता तुज गाईन अनंता म्हणजे तुझे नाम घेतले की तुझा संग, तुझा सहवास मला सदासर्वकाळ लाभेल. त्यामुळे माझ्यामनात इतर सर्व विषय टळून फक्त तुझाच एक विचार येईल. आणि माझे आयुष्य उजळून निघेल.

तुम्हाला आम्हाला देखील असाच सदासर्वकाळ संतांचा सहवास लाभावा, आपल्या जगण्याचा आनंदोत्सव व्हावा म्हणूनच आज आपण संत संगतीची महती विषद करणाऱ्या **संतांच्या पंगती । श्रेष्ठ जाणा ।।** या अभंग रचने विषयी सविस्तर विचार करूया.

**काय सांगु तुम्हा । संगतीचे गुण ।।**
**दाखवते खुण । प्रारधाची ।।१।।**

संत संगतीची महती पाहण्या आगोदर संत म्हणजे काय? संत कुणाला म्हणावं? हे पाहु...

* सत्याशिवाय इतर सर्व गोष्टींचा ज्यांच्या ठायी अंत झालेला असतो ते संत म्हणून भाजावे किंवा ज्याच्या ठायी रज आणि तमोगुणांचा लय होऊन फक्त सत्वगुणच सदासर्वकाळ वास करतो तोच संत हे जाणावे.
* जगाच्या कल्याणाचा ध्यास घेतात, जगाच्या उद्धारासाठी जे तळमळतात ते संत. अगदी सोप्या भाषेत म्हणजे जगद्गुरु तुकोबारायांच्या शब्दात सांगायचे झाले तर...


**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।**
**देह कष्टविती । परोपकारे ।।**


संत हे जगाचा उद्धार करण्यासाठीच अवतार घेत असतात. ते सतत आपल्यासोबत राहतात, आपल्यासारखेच वागतात, बोलतात पण अंतरी मात्र ते ईश्वरासी एकरूप होऊन संवाद साधत असतात. आम्हाला हे कधीच कळत नाहीत हीच आमची खरी अडचण आहे. आपण ज्या कार्यासाठी मानव जन्म घेतला आहे, त्याचा विसर न पडता संत आपले कार्य अव्याहतपणे करत असतात. पण आपल्यासारख्या सामान्य माणसाच्या त्यांचं असामान्यत्व कधीच ध्यानात येत नाही, आणि जेव्हा ध्यानी येतं तेव्हा संतांनी आपला निरोप घेतलेला असतो.

कोणत्याही संताचा इतिहास आभ्यसला तर आपल्या एक गोष्ट लक्षात येईल की, जीवंतपणी त्यांच्या आतोनात हालअपेष्ठा झालेल्या आहेत. त्या त्या काळातील समाजाने त्यांचा मानसिक, शारीरिक व सामाजिक छळ केलेला आहे. तरीपण संत हे कधीही कुणाबद्दल तक्रार करत नाहीत किंवा कुणाला एका शब्दानेही दुखवत नाहीत. कारण त्यांना माहित असतं की, ईश्वरीय कार्य करतांना अशा किरकोळ गोष्टी होतच राहणार. याकडे फारसं लक्ष द्यायचं नसतं. आणि त्याच्याकडे लक्ष दिलं तर आपण त्यातच अडकून पडु. त्यामुळे ईश्वरीय कार्याकडे दुर्लक्ष होईल. म्हणून या जगाच्या दुःखाचं निवारण करून त्यांचं कल्याण कसं होईल याचाच ते रात्रंदिन विचार करतात. परोपकारासाठीच सदासर्वकाळ आपला देह झिजवत असतात.

बा.भ.बोरकरही हेच म्हणतात की, **दास डोंगरी राहतो, चिंता विश्वाची वाहतो ।।**

थोडक्यात एकांतात असो की लोकांतात असो संतानी काया, वाचा, मने केलेली साधना ही केवळ आणि केवळ जगाच्या कल्याणासाठीच असते हे मात्र खरे आहे. अशा या महान संताचे गुण म्या पामराने आपणास काय सांगावे? पण एक मात्र गोष्ट निश्चितच खरी आहे की, आपल्या या जन्मात काही होवो अथवा न होवो पण संतांचा सहवास मात्र निश्चितच घडावा. कारण जगाचे कल्याण करणाऱ्या संतांचा संग जर आपल्याला घडला तर आपलेही कल्याण का होणार नाही? अहो या संत संगतीत एवढी ताकद असते की, आपले प्रारब्ध तर कोणीच बदलु शकत नाही पण आपल्या प्रारब्धाच्या खुणा मात्र संत आपल्याला दाखवून देतात, आपल्याला सावध करतात. आणि प्रारब्ध भोग भोगण्यासाठी पाठबळही देतात. त्यामुळे प्रारब्ध भोग कितीही तिव्र असले तरी त्यातील तिव्रता सौम्य होते. आणि हे प्रारब्ध भोग भोगणे सुसह्य होते. हेच खऱ्या अर्थाने संतसंगतीचे फलित आहे. **(क्रमशः)**




# नैसर्गिक दिशादर्शक

माहिती
डॉ. मधुकर आपटे

अथांग सागरातील जहाजांना रात्रीचे वेळी बरोबर दिशा समजणे बरेच अवघड असते. दूरवरचे भूखंड दिसू शकत नसल्याने योग्य दिशेने प्रवास करणे जमू शकत नाही. अशा प्रसंगी आकाशातील चमकणाऱ्या चांदण्या योग्य दिशा दर्शविण्याचे काम करीत असल्याने त्या काही चांदण्यांच्या समुदायाला 'नैसर्गिक दिशादर्शक' असे समजले जाते.

सप्तर्षी मंडळ आणि शर्मिष्ठा ही ती दोन प्रमुख दिशादर्शक नक्षत्रे आहेत. त्या दोन नक्षत्रांची प्रथम ओळख करवून घेऊन त्यांच्या साहाय्याने दिशादर्शन कसे होते, हे समजून घेऊया. सप्तर्षी मंडळ हे नक्षत्र ९० अंश उत्तरपासून दक्षिण गोलार्धात विषुववृत्तापासून १० अंश दक्षिण गोलार्धापर्यंत आकाशात दिसू शकते. आकाराने ते तिसऱ्या क्रमांकाचे असले, तरी वासुकी आणि कन्या ही आकाराने अनुक्रमे पहिले आणि दुसरे नक्षत्र दक्षिण गोलार्धात असल्याने सप्तर्षी नक्षत्र उत्तर गोलार्धातील सर्वात विशाल नक्षत्र म्हणून गणले जाते. या नक्षत्रातील सात प्रमुख तारे ठळकपणे साध्या डोळ्यांनी रात्रीच्या आकाशात जवळ जवळ पूर्ण वर्षभर दिसतात. या सात ताऱ्यांना प्राचीन ऋषींची नावे देण्यात आल्याने या नक्षत्राला 'सप्तर्षी' हे नाव देण्यात आले आहे.

या नक्षत्रातील क्षितिजावर पहिला उगवणारा तारा 'क्रतू' (Dubhe) या नावाने ओळखला जातो. नक्षत्रातील हा तारा सर्वात विशाल असल्याने तो नक्षत्रातील तारा र असे उल्लेखिले जाते. तेजस्वितेत आणि वस्तुमानात मात्र क्रतूचा क्रमांक पहिला नसून दुसरा आहे. (आकृती १) सप्तर्षी नक्षत्रातील ताऱ्यांची सूर्यापासूनची अंतरं भिन्न असल्याने या ताऱ्यांच्या दृश्य प्रखरता वेगवेगळ्या दिसून येतात.

या नक्षत्रात मरिची (Alcaied) हा नक्षत्रातील सर्वात प्रखर तारा असून तो सूर्याचा ५९४ पट प्रखर आहे. सप्तर्षींमधील सहा तारे आकाराने बरेच गोलाकार आहेत, परंतु अत्री (Megrez) या ताऱ्याची विषुववृत्तीय त्रिज्या ध्रुव प्रदेशाच्या त्रिज्येपेक्षा बरीच मोठी असल्याने हा तारा चपट्या आकाराचा दिसून येतो. त्याच्या तापमानातदेखील अक्षांशानुसर फरक दिसून येतो. असाच तापमानातील फरक पुलस्त्य (Phecda) ताऱ्यात दिसून येतो. सप्तर्षी नक्षत्रात क्रतू (Dubhe), पुलह (Merak), पुलस्त्य (Phecda) आणि अत्री (चश- सीश्) हे चार तारे एका चौकोनाकृती आकृतीच्या चार कोपऱ्यांवर असून अत्री ताऱ्यापासून चौकोनाच्या बाहेर अंगिरा (Alion), वसिष्ठ (Mizar) आणि मरीची (Alkaid) हे तीन तारे वक्राकार रेषेत स्पष्टपणे दिसून येतात. नक्षत्रातील चौकोनाकृती भागात जवळ जवळ ३०० तेजोमेघ आणि काही अति लहान तारे असल्याचे समजले जाते. वसिष्ठ ताऱ्याच्या जवळ अरुंधती हा एक लहान तारा आहे. चांगली दृष्टी असणाऱ्या व्यक्तींना हा तारा साध्या डोळ्यांनी वसिष्ठ ताऱ्याजवळ स्पष्टपणे वेगळा दिसू शकतो. रात्रीच्या कोणत्याही वेळी सप्तर्षीमधील पुलह आणि क्रतू या ताऱ्यांना जोडणारी रेषा पुढे वाढविल्यास त्या रेषेवर पुलह-क्रतू अंतराच्या साधारणपणे साडेपाचपट अंतरावर पोलॅरीस हा सध्याचा ध्रुवतारा दिसून येतो. त्यामुळे रात्रीचे वेळी उत्तर दिशा समजण्यास सप्तर्षीमुळे मदत होते. म्हणूनच सप्तर्षी नक्षत्राला 'दिशादर्शक नक्षत्र' असे म्हटले जाते. शर्मिष्ठा उत्तर गोलार्धात दीर्घकाळ उत्तर-पश्चिम आकाशात आकाशगंगेच्या पांढुरक्या पट्ट्यात या नक्षत्रातील पाच तारे इंग्रजीतील डब्ल्यू आकाराचे चित्र निर्माण करतात. हेच ते शर्मिष्ठा नक्षत्र (Cassiopeiae) आकृती २ मध्ये दाखविल्याप्रमाणे हे तारे अनुक्रमे α, β, Γ, δ आणि ε या अक्षरांनी दर्शविले जातात. त्यातील पहिल्या तीन ताऱ्यांची नावे अनुक्रमे शेदार (Sche- dar), काफ (Caph) आणि कीह (Cih) अशी आहेत. आकृती २ मध्ये दाखविल्याप्रमाणे या नक्षत्रातील Γ आणि δ या ताऱ्यांच्या मध्य बिंदूतून एक रेषा काढल्यास त्या रेषेवर ध्रुवतारा दिसून येतो. म्हणूनच शर्मिष्ठा नक्षत्र सप्तर्षींप्रमाणे 'दिशादर्शक' नक्षत्र म्हणून संबोधिले जाते अशा प्रकारे रात्रीचे वेळी अथांग सागरातील जहाजांना या दोन नक्षत्रांच्या मदतीने उत्तर ध्रुव शोधता येतो. त्या ताऱ्यांकडे तोंड केले असता उजव्या हाताकडील पूर्व दिशा, डाव्या हाताकडील पश्चिम आणि पाठीकडे दक्षिण दिशा हे लक्षात आल्याने जहाजांना योग्य मार्गाने जाणे बरोबर साधते.




# जाऊ आनंदाच्या गावी...




**सुखाचा एक तर दु:खाचे शंभर या प्रमाणात विणलेल्या आयुष्याच्या वस्त्रात दु:ख पैशाला पासरीभर मिळणारच! काही रंग उन्हात प्रकर्षाने चकाकणार तर काही सावलीत खुलून दिसणारे. त्या प्रत्येकाचा विचार करीत बसले तर संपूर्ण आयुष्य बेरंगी होण्यास वेळ लागणार नाही. म्हणूनच हाती आलेल्या प्रत्येक क्षणावर आनंद पांघरूण आयुष्य आपलेसे करणे हेच जीवनाला निखळतेने सामोरे जाण्यामागचे खरे मर्म आहे. म्हणूनच २० मार्चच्या जागतिक आनंद दिवस साजरा करत असतानपा आपणही आनंदाभिमुख राहण्याचा संकल्प सोडायला हरकत नाही.**

निमीत्त
मधुरा कुलकर्णी

सामान्यांची अस्तित्व रक्षणाची लढाई हातघाईवर येत असताना आयुष्यातल्या आनंदाचा स्तर खालावणे ओघानेच आले. त्यात दुष्काळात तेरावा महिना, म्हणतात त्याप्रमाणे अनेक वादळ येतात आणि जोरदार वाऱ्याने झाडोरा विस्कटून जावा त्याप्रमाणे जवळपास प्रत्येकाचे आयुष्य विस्कटून जाते. पण म्हणून का आपण आनंदाला विन्मुख व्हावे? 'हरिदूता का विन्मुख व्हावे?' या काव्यपंक्तींच्या धर्तीवरचा हा प्रश्न स्वत:लाच एकदा विचारून पहा बरं! उत्तर नक्कीच 'नाही' असेच असणार. म्हणूनच एकीकडे २० मार्चच्या जागतिक आनंद दिवस साजरीकरणाविषयीचे वृत्त वाचत असताना आपणही आनंदाभिमुख राहण्याचा संकल्प सोडायला हरकत नाही.

सुखाचा एक तर दु:खाचे शंभर या प्रमाणात विणलेल्या आयुष्याच्या वस्त्रात दु:ख पैशाला पासरीभर मिळणारच! हा तानाबाना विणीतले सगळे रंग आलटून पालटून आपल्यापुढे आणणार. काही रंग उन्हात प्रकर्षाने चकाकणार तर काही सावलीत खुलून दिसणारे. त्या प्रत्येकाचा विचार करीत बसले तर संपूर्ण आयुष्य बेरंगी होण्यास वेळ लागणार नाही. म्हणूनच हाती आलेल्या प्रत्येक क्षणावर आनंद पांघरूण आयुष्य आपलेसे करणे आणि मनापासून जगणे हेच जीवनाला निखळतेने सामोरे जाण्यामागचे खरे मर्म आहे. काहींची वृत्ती मुळातच आनंदी असते. ते अगदी छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधू शकतात.

एखादा रत्नपारखी पैलू पाडून साध्याशा रत्नाला झळाळी देतो तद्वतच त्यांची आनंदी वृत्ती सामान्य आयुष्यावरही सोनेरी वर्ख चढवून जाते. लौकिकार्थाने मागे राहिलेले हे लोक आनंदाच्या परिमाणात मात्र खूप पुढे निघून गेलेले असतात. कारण मुळात आनंद कुठल्याही बाजारात विकत मिळत नाही.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे तो वृत्तीत असावा लागतो. ही वृत्ती असणारा माणूस एखाद्या रसाळ भजनात, एखाद्या चुटक्यात, एखाद्या चारोळीत, गाण्याच्या एखाद्या कडव्यात, रंगाच्या एखाद्या फटकाऱ्यात, गायकाच्या एखाद्या तानेत, वाद्याच्या एखाद्या झंकारात, निसर्गाच्या एखाद्या आविष्कारातही इतका पराकोटीचा आनंद शोधतो की त्याची पारायणे करण्यासाठी परत परत तो अनुभव घेत राहतो आणि पुन्हा तितकाच आनंद मिळवत राहतो. अशा प्रकारे चक्रवाढ व्याजाच्या नियमाने त्याच्या आनंदावर आनंदाचे व्याज चढत जाते आणि आनंदाच्या तळ्यात आनंदाचेच तरंग उमटवत त्याचे आयुष्य हळुवार लाटा पसरवत जाते.

आजचे व्यवहारी जग आनंदी दिवस साजरा करताना उत्पन्न, निरोगी जीवन, सामाजिक अहवाल, स्वातंत्र्य, विश्वास आणि उदारता या निकषांच्या आधारे एखाद्या देशातले नागरिक स्वत:ला किती आनंदी समजतात, याची पाहणी करून एका तक्त्यात देशांची नोंदणी करतेय. त्याप्रमाणे पहिले पाच देश सर्वात आनंदी तर शेवटचे पाच सर्वात दु:खी असे लेबल लावून एक अहवाल पूर्ण होतो. आश्चर्य म्हणजे जगातला सर्वात श्रीमंत समजला जाणारा अमेरिकेसारखा देश या यादीत पहिल्या पाचात दिसत नाही. म्हणजेच आपल्या अध्यात्मात मांडलेला आनंद आणि पैसा यांचा संबंध नसतो, हा विचार इथे सबळतेने स्पष्ट होताना दिसतो. या विचारधारेमुळेच भूतानसारख्या नागरिकांच्या आनंदीपणाचा स्तर महत्त्वाचा मानणाऱ्या आणि त्याच निर्देशांकाच्या आधारे देशाच्या विकासाची व्याख्या आधारभूत मानणाऱ्या देशाबद्दल आपल्याला कुतूहल वाटते. तेव्हा तेच परिमाण प्रमाण मानून आपणही त्यांचा आदर्श पुढे ठेवायला काहीच हरकत नाही.

अनेक विनोदवीरांनी आपल्याला हसायला शिकवले, आनंद लुटायला शिकवले आणि दैनंदिन जीवनातल्या व्यथा-विवंचना बाजूला ठेवून भरभरून कसे जगायचे याचे अनौपचारिक धडे दिले. त्यामुळेच कधी काळी 'गंभीर' अशी असणारी मराठी माणसाची ओळख बदलली. आपण सकस आणि कसदार विनोदावर मनसोक्त हसलो. द्वयर्थी शब्दातली गंमत कळल्यावर एकच कल्लोळ केला.

अनेक हास्यमहर्षींनी आपल्या स्थितप्रज्ञ आणि चिंताक्रांत चेहऱ्यावरील जाळ्यात हास्याचे रंग भरले. आपण वक्तृत्वातल्या विनोदावर हसलो, लेखनातल्या कोट्यांवर हसलो, कोपऱ्यातले व्यंगचित्र पाहून हसलो. शारीरिक आणि वाचिक अभिनय पाहून हसलो. विदुषकाच्या फसव्या आविष्कारावर हसलो तसेच विनोदसम्राटाच्या चेहऱ्यावरच्या एखाद्या मिश्कील भावावरही हसलो. एकूण काय, तर जगताना समोर येणाऱ्या अडचणींवर मात करताना हास्यामुळे मिळणारे तणावमुक्तीचे क्षण हेच संचित आहे, हे आता आपल्याला पुरते उमगले आहे. म्हणूनच दु:ख झाकून ठेवण्याच्या प्रयत्नात हसण्याचा गडगडाट दिवसेंदिवस वाढतोय. आपण आनंदी असलो की ओठांवर आपोआप हळुवार हास्य येते. म्हणजेच हसणे हा प्रयोग नाही तर निष्कर्ष आहे. हसणे ही मनस्वास्थ्य मिळाल्याची पोचपावती आहे.

मिटलेले ओठ विलग होतात तेव्हा मनाचा कुठलासा कोपरा सुखावलेला असतो. कधी त्यामागे कारण असते तर कधी कारण नसले तरी या कमळाच्या पाकळ्या आपोआप उमलतात. अर्थातच त्यासाठी मन आनंदी असायला हवे आणि त्यासाठीच दु:खाचे मळभ दूर करण्याचे कसबही जमायला हवे.

सुखदु:ख या नाण्याच्या दोन बाजू आहेत. तेव्हा कुठली बाजू सतत समोर ठेवायची हे ठरवणेही गरजेचे आहे. सुखाची अनेक ठाणी आहेत, अनेक झरे आहेत. मनात आणले तर आपणही त्याखाली भिजू शकतो आणि अवघे आयुष्य सुहास्य वदनाने राहू शकतो. आनंद आणि निरागस, निखळ आणि निर्मळ हसू कुठल्याही खजिन्यापेक्षा मौल्यवान आहे. कारण कितीही पैसे मोजले तरी ते काही मिळत नाही. आयुष्य पुढे सरकते तसा अभ्यासाचा ताण वाढतो. मी-तू पणाची जाणीव होते. सुखाबरोबर दु:ख या स्वनिर्मित कल्पनेची ओळख होते. नंतरच्या काळात नियती नावाच्या अदृश्य शक्तीची विविध रूपे वेगवेगळ्या प्रकारे समोर येत जातात आणि परिस्थितीला सामोरे जाताना चेहऱ्यावरचे हसू आणि मनातला आनंद दुर्मिळ होतो. कपाळावर आठ्यांचे आणि मनावर जबाबदारीचं ओझे वाढले की हसणे, आनंद संकोचतो. देखल्या देवाला दंडवत या उक्तीप्रमाणे हसू येईलही; पण ते कसनुसं वाटते, उपरं वाटते. त्यात प्राण नसतो. ती केवळ एक शारीरिक क्रिया होऊन राहते. मुळात कोणत्याही साध्यासुध्या परिस्थितीत दु:ख शोधण्याची आणि त्यामुळे व्यथित होण्याची मानसिकता या निखळ आनंदाचा गळा घोटते आणि माणूस अधिकाधिक गंभीर होत जातो. म्हणूनच निखळ आनंद महाग व्हायला जेवढी परिस्थिती कारणीभूत आहे तेवढाच माणूस स्वत:ही. भौतिक सुखांच्या शोधापायी आणि हव्यासापोटी धावपळ वाढली तेव्हापासून माणसाच्या मनातला आनंद लोप पावायला सुरुवात झाली, असे म्हणता येईल. ही सुखे मिळाली की आनंद होतो, नाही असे नाही, पण तो बराच फसवा असतो, अल्पजीवी असतो. कारण सुखाची भूक शमत नाही. लगेचच दुसऱ्या सुखाची भूक लागते आणि आनंदावर आरूढ होऊन असमाधान त्याला दाबून टाकते. हे दुष्टचक्र कधीही न संपणारे! पण अशा परिस्थितीतही आनंद जपू शकणारे भाग्यवान म्हणावे लागतील. परिस्थितीचा दाह त्यांची प्रसन्नता जाळू शकत नाही. द्रव्याची चणचण अथवा कमतरता त्याचे हसू झाकोळून टाकू शकत नाही. आपणही अशा भाग्यवानांच्या पंक्तीत बसण्याचा प्रयत्न करायला हवा. चला तर, मग आनंदी राहू या...



पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

# सत्ता जाण्यास नदी प्रदुषणही कारणीभूत!

**लोकसभा, विधानसभा वा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रदूषण, पर्यावरणासारख्या मुद्यांना महत्त्व मिळत नाही. दिल्ली निवडणुकीमध्ये मात्र यमुना नदीच्या प्रदूषणाचा मुद्दा चर्चेत राहिला. 'आप'ची सत्ता जाण्यात प्रदूषणाचाही वाटा आहे. गंगेसह अन्य नद्यांच्या प्रदूषणमुक्तीवर हजारो कोटी रुपये खर्च होऊनही महाकुंभात नदीचे पाणी आंघोळीलायक नसेल, तर हे पैसे गेले कुठे, हा सवाल बराच गाजला.**

दिल्लीच्या निवडणुकीत यमुना प्रदूषणाचा मुद्दा अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या पक्षासाठी आत्मघातकी ठरला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या पक्षानेच यमुना स्वच्छतेचा मुद्दा उपस्थित केला आणि तीन निवडणुका त्यावर जिंकून यमुना अस्वच्छच राहिली. स्वच्छतेच्या नावाखाली ७४ कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला. काळ बदलला, सत्ता बदलली आणि यमुना स्वच्छ करण्यासाठी अचानक मशिन्स तैनात करण्यात आल्या. या मशिन्ससह काही परिस्थिती बदलणे चांगले आहे; पण असे होणार नाही. ही यंत्रे फक्त कचरा साफ करू शकतात. उदाहरणार्थ, तरंगणारा कचरा जो पाण्याच्या वर तरंगत राहतो. पाण्यात स्वच्छता आणायची असेल तर अनेक पातळ्यांवर प्रयत्न करावे लागतील.

नद्यांचा वापर नाल्यांप्रमाणे करणाऱ्या प्रत्येक व्यक्ती, संस्था किंवा उद्योगाला शिक्षा द्यावी लागेल. मग ती गंगा, नर्मदा, महानदी, चंबळ, गोदावरी किंवा इतर कोणत्याही नदीबद्दल असो; त्यांच्या काठावर असलेले शहर त्यांच्यामध्ये कचरा टाकत आहे. नाल्यातील पाण्याचे 'सीवरेज ट्रिटमेंट प्लांट'मध्ये शुद्धीकरण करून शुद्ध पाणी नदीत सोडण्याची चर्चा केवळ कागदावरच परिणामकारक वाटत होती. दररोज हजारो लिटर सांडपाणी नदीच्या सोडले जाते, हे उघड सत्य आहे. धार्मिक महत्त्व असलेल्या नद्यांच्या काठावर वसलेले काही उद्योग भक्तांपेक्षा जास्त प्रदूषण करतात. हे उद्योग सातत्याने नद्यांचे शुद्ध पाणी वापरून नदीत घाण सोडत आहेत. विकासाच्या नावाखाली प्रत्येक नदीच्या काठावर उद्योगांची संख्या वाढत आहे. नद्यांच्या बाजूंची झाडे नाहीशी होऊ लागली आहेत आणि त्यांची जागा शेतांनी घेतली आहे. ते नदीतून पाणी घेतात आणि त्या बदल्यात त्यात युरियामिश्रित पाणी नदीत येते. युरिया पाणी खराब होण्याचे सर्वात मोठे कारण आहे. झाडे तोडल्याने मातीची धूप होत असून नदी मोठ्या प्रमाणात गाळ वाहून आणत आहे. हा गाळ या नद्यांवर बांधलेल्या धरणांसाठी घातक ठरणार आहे.

धरणाजवळ राहणाऱ्या निष्पाप लोकांनाच त्याचे परिणाम भोगावे लागतील. कठोर शिक्षेनेच या सर्व कारवाया थांबवता येतील. एकाला झालेली शिक्षा इतरांसाठी आदर्श ठरेल. शिक्षा अशा असाव्यात की, लोकांना त्या आठवतील. 'नमामि गंगे' आणि 'नमामि नर्मदे' मोहिमेवर खर्च होत असलेल्या कोट्यवधी रुपयांपैकी काही रक्कम नद्यांच्या पाण्याचा विनाकारण वापर करणाऱ्यांकडूनही वसूल करण्यात यावी. नुकत्याच झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत प्रदूषित यमुना नदी हा मुख्य मुद्दा होता किंवा दुसऱ्या शब्दात आम आदमी पक्षाच्या पराभवाचे प्रमुख कारण यमुना होते. आप प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी यमुना नदी स्वच्छ करण्याचे आश्वासन दिले होते; परंतु ते पूर्ण करण्यात ते अपयशी ठरले. त्याच वेळी भारतीय जनता पक्षानेदेखील आश्वासन दिले होते की, त्यांचे सरकार बनल्यास ते यमुना स्वच्छ करण्याचे काम सुरू करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्यांच्या निवडणूक सभांमध्ये यमुना स्वच्छ करण्याचे आश्वासन दिले होते. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून केजरीवाल यांचा पराभव करणारे भाजपा नेते परवेश वर्मा म्हणाले की, यमुना नदीकाठच्या विकासाला त्यांच्या पक्षाचे सर्वोच्च प्राधान्य असेल.

दिल्लीत सरकार बनण्यापूर्वीच दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी यमुना नदीच्या स्वच्छतेचे काम सुरू केले होते. १७ फेब्रुवारीपासून कचरा काढण्यासाठी आणि तण काढण्यासाठी मशीन कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. याशिवाय ड्रेज युटिलिटी क्राफ्ट साफसफाईच्या कामात गुंतलेली आहेत. सुमारे तीन वर्षांत नदी स्वच्छ करण्याचे या महत्त्वाकांक्षी योजनेचे उद्दिष्ट आहे. यमुना ही सर्वात प्रदूषित नदी आहे. दिल्लीतील यमुना नदीचे पाणी अत्यंत प्रदूषित असून ते पिण्यास योग्य नाही. त्यात पांढऱ्या फेसाचा जाड थर तयार होतो आणि दुर्गंधी येते. यमुना नदीतील प्रदूषणामुळे नद्या, तलाव व इतर जलस्रोत अस्वच्छ झाले आहेत. शहरातील सांडपाणी आणि औद्योगिक प्रदूषण नाल्यांद्वारे त्यात मिसळते. असे मानले जाते की, यमुना नदीत सापडलेली घाण प्रणालीच्या अंतर्गतच स्वच्छ करत असे; पण नंतर शहर वाढले तसा नदीवरील दाब वाढू लागला. यमुना नदी स्वच्छ करण्याची मोहीम सुरू झाली आहे; पण दिल्लीकरांनी युरोपातील प्रमुख नदी असलेल्या ऱ्हाईन नदीपासून प्रेरणा घ्यावी. ऱ्हाईन नदी खूप प्रदूषित आणि दुर्गंधीयुक्त होती. आज ती तीन कोटींहून अधिक लोकांना उच्च दर्जाचे पिण्याचे पाणी पुरवते. गेल्या १० वर्षांत ऱ्हाईन नदीची मोठ्या प्रमाणात स्वच्छता झाली आहे. ऱ्हाईन नदी आल्प्समध्ये उगम पावते आणि उत्तर समुद्राला पोहोचण्यापूर्वी स्वित्झर्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि नेदरलँडमधून जाते. ऱ्हाईन हा पश्चिम युरोपमधील सर्वात महत्त्वाचा जलमार्ग आहे. ही नदी १,३२० किलोमीटर लांब वाहते. स्वित्झर्लंडमधील बासेल ते नेदरलँड्समधील रॉटरडॅमपर्यंत पाण्याच्या उत्कृष्ट प्रवाहामुळे ती युरोपमध्ये जलवाहतुकीचा महामार्ग म्हणून काम करते. ऱ्हाईन एकेकाळी युरोपमधील पर्यावरणीय काळ्या ठिपक्यांपैकी एक होती. जड उद्योग, हायड्रो-इलेक्ट्रिक धरणे आणि मोठ्या प्रमाणात मालवाहू नौकांनी नदीच्या पर्यावरणाचा बराचसा भाग नष्ट केला होता. मासे आणि झाडे गायब झाली आणि ऱ्हाईनमध्ये पोहणे आरोग्यासाठी धोकादायक मानले गेले. तिच्या काठावर वसलेले तुळस शहर रासायनिक आणि औषधी उद्योगांसाठी प्रसिद्ध आहे. व्यवसायांमुळे बासेलला आर्थिक यश मिळाले; परंतु उद्योगांनी धोकादायक कचरा नदीत सोडला. १९६० पर्यंत, बासेलमध्ये जलशुद्धीकरण केंद्र नव्हते. त्यामुळे घरातील कचरा थेट नदीत वाहून जायचा; परंतु लोकांच्या दबावामुळे अखेर नदीच्या स्वच्छतेसाठी कठोर नियम आणि कायदे करण्यात आले. उद्योग नियंत्रित करणाऱ्या कठोर नियमांव्यतिरिक्त, बासेल आणि आसपासची खा-सगी घरे आता जलशुद्धीकरण प्रणालींशी जोडलेली आहेत. त्यामुळे घरातील कचरा थेट नदीत वाहून जात नाही. परिणामी, बासेलच्या सभोवतालच्या ऱ्हाईनच्या पाण्याची गुणवत्ता आता खरोखर चांगली झाली आहे. औद्योगिक परिसरातून वाहणारी नदी पूर्णपणे स्वच्छ असू शकत नाही; परंतु ती किती स्वच्छ झाली आहे, हे पाहून पर्यावरणप्रेमीही आश्चर्यचकित झाले आहेत.

आता त्यात पोहणे तर सुरक्षित झाले आहेच; शिवाय मासेही परत येऊ लागले आहेत. ऱ्हाईनमध्ये मासे परतणे हे पाण्याची गुणवत्ता सुधारल्याचे लक्षण आहे. आता नदीत ३७ विविध प्रकारचे मासे आहेत. या पृष्ठभूमीवर यमुना स्वच्छतेसाठी चार पातळ्यांवर धोरण अवलंबण्यात आले आहे. सर्वप्रथम यमुना नदीत साचलेला कचरा, गाळ आणि घाण काढली जाईल. यासोबतच नजफगढ नाला, पूरक नाला आणि इतर मोठ्या नाल्यांची सफाईही सुरू केली जाणार आहे. सध्याच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची क्षमता आणि कार्यप्रणालीचे दररोज निरीक्षण केले जाईल. त्यामुळे ते व्यवस्थित काम करत आहेत, याची खात्री करता येईल. याशिवाय, दिल्ली प्रदूषण नियंत्रण समिती औद्योगिक युनिट्सद्वारे नाल्यांमध्ये टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यावरही देखरेख ठेवेल. सुमारे तीन वर्षांत नदी स्वच्छ करण्याचे या महत्त्वाकांक्षी योजनेचे उद्दिष्ट आहे. हा प्रश्न फक्त यमुनेपुरता मर्यादित नाही. पुढच्या दोन वर्षांत नाशिकला कुंभमेळा आहे. गंगा, यमुनेच्या प्रदूषणातून धडा घेऊन किमान दोन वर्षांत गोदावरी तरी स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त व्हायला हवी. नदी स्वच्छ झाल्याचे तिच्या पाण्याच्या गुणवत्तेतून दिसले पाहिजे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

